हर्षवर्धन

आणि

बहिर्जी नाईकांचे बालशिलेदार

लेखिका: गायत्री साळवणकर



हर्षवर्धन

आणि बहिर्जी नाईकांचे बालशिलेदार

लेखिका:

सौ.गायत्री साळवणकर

ई साहित्य प्रतिष्ठान

हर्षवर्धन आणि बहिर्जी नाईकांचे बालशिलेदार

सौ.गायत्री साळवणकर

172/ब, 'केदार,' जवाहरनगर,
कोल्हापूर, 416012,
महाराष्ट्र.
इमेल: gayatri.salvankar@gmail.com
मोबाईल क्रमांक: 8446800213

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)
प्रकाशन : २३ सप्टेंबर २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. ४५०/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- गायत्री साळवणकर 8446800213

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा

वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

लेखिका परिचय

सौ. गायत्री गिरीश साळवणकर

पुर्वाश्रमीची मी, उज्वला दिगंबर गुहागरकर,

जन्म: 16 जानेवारी 1963

शिक्षण: BCom.

पत्ता: 172/ब, 'केदार,' जवाहरनगर, कोल्हापूर, 416012, महाराष्ट्र.

हे माझे पाचवे पुस्तक. पहिली चार पुस्तके कव्हर्स आणि त्यांची लिंक सोबत दिली आहेत. त्याशिवाय काही बाल कविताही लिहिल्या आहेत. दै. लोकसत्तामध्ये नियमितपणे 'लोक मानस' सदराखाली पत्रलेखन केले आहे. लोकसत्ता चतुरंग पुरवणी मध्ये 'सोने चांदी आम्हा मृत्तिके समान' हा आपल्या शिक्षकांप्रती आदरभाव प्रगट करणारा लेख, तसेच 'दृष्टी आणि कोन"या सदराखाली लेख प्रसिद्ध. आकाशवाणी कोल्हापूर वर "माझे जीवन गाणे" या सदरात मुलाखत प्रक्षेपित.

'स्वांत सुखाय' या ब्लॉगवर काही स्फुट लेखन प्रसिद्ध केले आहे. https://swantsukhay2245533.wordpress.com/

मला सकस, वैचारिक वाङ्मयाची विशेष आवड आहे.

या पुस्तकावरील आपल्या प्रतिक्रिया जाणून घ्यायला आवडेल. कृपया 8446800213 या क्रमांकावर त्या कळवाव्या. कोणाला याची छापिल प्रत विकत हवी असल्यास कळवावे.

गायत्री गिरीश साळवणकर

अर्पणपत्रिका

छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणादायी स्मृतीस आणि स्वराज्याचे अद्वितीय गुप्तहेर बहिर्जी नाईक यांच्या शौर्य, बुद्धिमत्ता व अतुलनीय कार्यास विनम्र अर्पण.

प्रस्तावना

बालमित्रांनो,

आज तुमच्या भेटीला तुमच्यासारखाच एक मुलगा आला आहे—आनंदी, उत्साही, कल्पक, विचारी, शोधक आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे कमालीचा धाडसी! खूप दूरवरून—थेट जर्मनीहून तो तुम्हाला भेटायला आला आहे. विशेष म्हणजे, त्याला मराठी मुलुखात पोहोचायला एक-दोन नव्हे, तर जवळजवळ शंभर वर्षे लागली आहेत.

ही कादंबरी जर्मन लेखक एरिक कॅस्टनर (Erich Kästner) यांच्या 'एमिल अँड द डिटेक्टिव्ह्ज' (Emil and the Detectives) या जगप्रसिद्ध बालकादंबरीवर आधारित आहे. मराठी वाचकांना ही कथा अधिक जवळची आणि आपलीशी वाटावी, या उद्देशाने तिचे शब्दशः भाषांतर न करता रूपांतर करण्यात आले आहे. जर्मन भाषेतील कथेचे मराठीवर कलम करण्याऐवजी, मी ते कथाबीज मराठी मातीत पेरून रुजविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

मूळ कादंबरी एरिक कॅस्टनर यांनी 1929 साली लिहिली असून तिची पार्श्वभूमी प्रामुख्याने बर्लिन शहरावर आधारित आहे. हे पुस्तक प्रसिद्ध होताच त्याला वाचकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पुढे या पुस्तकाच्या लाखो प्रती विकल्या गेल्या आणि ते जगभरातील बालसाहित्यातील एक अभिजात कलाकृती म्हणून ओळखले जाऊ लागले. एरिक कॅस्टनर यांच्या सुरुवातीच्या साहित्यापैकी नाझी सेन्सॉरशिपमधून सुटलेली ही एकमेव कलाकृती होती.

ही कादंबरी जर्मनमधून मराठीत येण्यापूर्वी तिने इंग्रजी भाषेतील भाषांतराचा महत्त्वाचा टप्पा पार केला; पुढे या इंग्रजी पुस्तकाच्या असंख्य आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या असून 60 पेक्षा अधिक भाषांमध्ये त्याचे अनुवाद झाले आहेत.

मे मासी (May Massee) यांनी 1930 साली केलेला इंग्रजी अनुवाद आज 'विकीसोर्स' या ऑनलाइन डिजिटल ग्रंथालयात पब्लिक डोमेनमध्ये उपलब्ध आहे.

या पुस्तकाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे ते तत्कालीन बालसाहित्यासारखे केवळ उपदेश न करता मुलांच्या वास्तव जगाचे चित्रण करते. साहस, विनोद, मैत्री आणि रहस्य यांचा सुंदर संगम या कथेत आढळतो. या कथेवर जर्मनी, ब्रिटन, अमेरिका आणि बांगलादेशसह विविध देशांत चित्रपट, दूरचित्रवाणी

मालिका आणि रंगमंचीय रूपांतरे झाली आहेत. विशेषतः बांगलादेशातील 'एमिलेर गोएन्दा बाहिनी' या चित्रपटाला पाच राष्ट्रीय पुरस्कार मिळाले.

बादल रहमान यांनी या चित्रपटामुळे बांगलादेशी बालचित्रपट चळवळीचा पाया रचला, ज्यामुळे आजही त्यांना तिथे आदराने स्मरले जाते.

2001 मध्ये आधुनिक बर्लिनच्या पार्श्वभूमीवर नव्याने चित्रपट साकारण्यात आला.

या कादंबरीने पुढे मुलांच्या गुप्तहेर कथांच्या स्वतंत्र प्रकारालाही प्रेरणा दिली.

कथा जर्मनीतील असो वा भारतातील, माणसांच्या मूलभूत भावना सारख्याच असतात. प्रेम, माया, मैत्री, सहकार्य, धैर्य आणि प्रामाणिकपणा या मूल्यांना सीमा नसतात. त्याचप्रमाणे लोभ, फसवणूक आणि गुन्हेगारी प्रवृत्तीही जगभर आढळतात. म्हणूनच जवळपास शतकभरापूर्वी लिहिलेली ही कथा आजच्या मराठी वाचकालाही तितकीच जवळची वाटते. या रूपांतरामागील उद्देश मूळ कथेची जागा घेणे नसून, तिची ओळख मराठी वाचकांना करून देणे हा आहे. मूळ कथेचे सर्व श्रेय अर्थातच लेखक एरिक कॅस्टनर यांनाच जाते.

या रूपांतरात मूळ कथेचा नायक एमिल याच्या जागी आपल्याला भेटतो हर्षवर्धन मोहिते. पश्चिम महाराष्ट्रातील हातकणंगले गावात राहणारा तेरा वर्षांचा हर्षवर्धन प्रथमच एकट्याने मुंबईला निघतो. प्रवासादरम्यान त्याची फसवणूक होते आणि त्याचे पैसे चोरीला जातात. मात्र, हार न मानता तो चोराचा पाठलाग करण्याचा निर्णय घेतो. मुंबईतील काही नव्या मित्रांच्या मदतीने तो केवळ स्वतःचे पैसे परत मिळविण्याचाच प्रयत्न करत नाही, तर एका मोठ्या गुन्ह्याचाही उलगडा करतो.

कथेतील सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुलांची एकजूट, परस्पर सहकार्य आणि न्यायासाठीची धधपड. कोणत्याही प्रौढ व्यक्तीच्या नेतृत्वाशिवाय मुलांनी दाखवलेली संघटनशक्ती आणि जबाबदारी ही कथेची खास ताकद आहे. हर्षवर्धनला मिळणारे यश हे केवळ त्याच्या धाडसामुळे नव्हे, तर अनेक मुलांनी एकत्र येऊन केलेल्या प्रयत्नांचे फळ आहे.

या कादंबरीत मैत्री, प्रामाणिकपणा, धैर्य, चिकाटी आणि सामाजिक जबाबदारी यांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. त्याचबरोबर लोभ, फसवणूक आणि गुन्हेगारी यांचाही वास्तववादी वेध घेतला आहे. लेखकाने कोणताही उघड उपदेश न करता पात्रांच्या कृतीतूनच ही मूल्ये वाचकांसमोर प्रभावीपणे मांडली आहेत.

तर चला, आता हर्षवर्धन आणि त्याच्या मित्रांसोबत मुंबईच्या गजबजलेल्या रस्त्यांवर, रेल्वे स्थानकांवर आणि एका रोमांचकारी पाठलागाच्या साहसात सहभागी होऊया!

– गायत्री साळवणकर.

ही प्रस्तावना युट्यूबवर ऐकण्यासाठी खालील लिंकवर क्लिक करावे.
https://youtu.be/i03n8SCaPYc?si=awn4pqIFTmRzgN-P

**"थोडक्यात पुस्तक परिचय:

मुंबईच्या गर्दीत एका चोराचा पाठलाग करणाऱ्या तेरा वर्षांच्या हर्षवर्धनची ही रोमांचकारी कथा आहे. नव्या मित्रांच्या मदतीने तो केवळ स्वतःचे पैसे परत मिळवण्याचाच प्रयत्न करत नाही, तर एका मोठ्या गुन्ह्याचाही उलगडा करतो. मैत्री, धैर्य, साहस आणि मुलांच्या एकजुटीची ताकद दाखवणारे हे रहस्यपूर्ण रूपांतर जगप्रसिद्ध Emil and the Detectives या कादंबरीवर आधारित आहे.

हर्षवर्धन

आणि बहिर्जी नाईकांचे बालशिलेदार

प्रकरण 1: हर्षवर्धन: एक गुणी मुलगा

बालमित्रांनो, आज मी तुम्हाला एक गोष्ट सांगायचे ठरवले आहे. पण नेमकी कुठली गोष्ट सांगावी बरे? परीराणीची, भुताखेतांची, पशुपक्ष्यांची, जादुगाराची की तुमच्यासारख्या छोट्या मुलांची?

मला वाटते, तुम्हाला हर्षवर्धन आणि त्याच्या धाडसी बालमित्रांची गोष्ट नक्की आवडेल.

आपल्याला कोल्हापूर हे शहर चांगलेच परिचित आहे, याची मला कल्पना आहे. इथले करवीर निवासिनी अंबाबाईचे मंदिर भारतातील महत्त्वाच्या शक्तिपीठांपैकी एक मानले जाते. कोल्हापूरची कुस्तीची परंपरा, रंकाळा तलाव, पन्हाळ्याचा ऐतिहासिक किल्ला, दख्खनचा राजा जोतिबाचे पुरातन मंदिर, कोल्हापूरचा गूळ, इतकेच नव्हे तर आता विदेशातही प्रसिद्ध झालेली कोल्हापुरी चप्पल — आणि या सगळ्यांपेक्षाही मनात घर करून राहतात ती इथली रांगडी, प्रेमळ आणि कलासक्त माणसे.

तर अशा या कोल्हापूरपासून बावीस-तेवीस किलोमीटरवर हातकणंगले नावाचे तालुक्याचे ठिकाण आहे. हा भाग वारणा आणि पंचगंगा नद्यांच्या खोऱ्यात येत असल्यामुळे येथील जमीन अत्यंत सुपीक आहे. येथे प्रामुख्याने ऊस, सोयाबीन आणि भुईमुगाची शेती केली जाते. तर मित्रांनो, या हातकणंगले गावात आपला कथानायक हर्षवर्धन मोहिते आपल्या आईबरोबर राहतो. वय वर्षे बारा. सध्या त्याची सहावीची वार्षिक परीक्षा संपत आली आहे.

पाच वर्षांपूर्वी त्याचे बाबा निरंजन मोहिते करोनाच्या साथीत निवर्तले. ते तेथील हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून काम करत असत. शाळा खाजगी असल्याने निर्मलाताईंना पेन्शन वगैरे सुविधा मिळाल्या नाहीत. पतीच्या निधनानंतर हर्षवर्धन आणि त्याची आई निर्मलाताई हे दोघेच घरी राहत होते. तसे काही दिवस निर्मलाताईंची आई, म्हणजे हर्षवर्धनची आजी कमलाबाई, त्यांच्या सोबतीला होत्या; पण त्यांच्या वाढत्या तब्येतीच्या तक्रारी आणि निर्मलाताईंची तुटपुंजी मिळकत पाहता, त्यांची मोठी बहीण— मायाताई आईला आपल्या मुंबईच्या घरी घेऊन गेली.

हर्षवर्धनचे बाबा हयात असताना निर्मलाताईंनी एका सरकारी संस्थेतून ब्युटीपार्लरचा कोर्स केला होता. आता तोच कोर्स त्यांच्या उपयोगी पडला. आपल्या तीन खोल्यांच्या छोट्याशा घरात त्यांनी

ब्युटीपार्लर सुरू केले होते. तसेच घराच्या मागच्या मोकळ्या जागेत भाजीपाल्याची लागवडही सुरू केली होती. त्यातून त्यांना थोडेफार पैसे मिळत होते. निर्मलाताई काटकसरीने खर्च करून अडीअडचणीला उपयोगी पडावी म्हणून थोडीफार शिल्लक टाकत असत. एकंदरीत एकटीच्या जीवावर संसाराचा गाडा ओढताना त्या माऊलीची कधीकधी दमछाक होई.

हर्षवर्धन अत्यंत समजूतदार मुलगा होता. अभ्यासात तो खूप हुशार होता. वर्गातील त्याचा पहिला नंबर कधीच चुकत नसे. अगदी एखाद्या चाचणी परीक्षेतही तो नेहमी पहिलाच असे. याशिवाय मैदानी खेळ, वक्तृत्व स्पर्धा यांत भाग घेऊन तो आंतरशालेय स्पर्धांमध्येही बक्षिसे मिळवत असे.

(वार्षिक स्नेहसंमेलनात सर्वोत्तम विद्यार्थी म्हणून शाळेच्या अध्यक्षांच्या हस्ते त्यांचा सत्कार होताना)

त्याला वाचनाची अतिशय आवड होती. शाळेतील वाचनालयातून तो पुस्तके आणून वाचत असे. शिवाय जवळच असलेल्या सार्वजनिक वाचनालयात निर्मलाताईंचे नाव नोंदवलेले होते. तेथूनही हर्षवर्धन आठवड्यातून एखादे पुस्तक आणून बसल्या बैठकीत वाचून काढत असे. शेरलॉक होम्सचे मराठी भाषांतर, व्योमकेश बक्षी, फास्टर फेणेच्या साहसकथा, मालगुडी डेज अशी अनेक पुस्तके त्याने वाचली होती.

घरातील कामांतही तो आईला मदत करत असे. घराची साफसफाई, अंगणातील भाजीपाल्याला पाणी देणे, वाणसामानाची खरेदी, गिरणीतून दळण आणणे, पाणी भरणे ही सर्व कामे तो जबाबदारीने करत असे. आपल्या आईला मदत करताना त्याला आनंद वाटे. एखाद्या दिवशी आईला बरे वाटत नसले, तर वरणभाताचा कुकर लावणे आणि आम्लेट बनवणेही तो शिकला होता.

तर बालमित्रांनो, असा हा आईचा लाडका मुलगा शेजारपाजाऱ्यांना मदत करायलाही नेहमी तत्पर असे. त्याच्या मित्रपरिवारातही तो अतिशय प्रिय होता. कुणाला अभ्यासात अडचण आली, तर तो आनंदाने ती सोडवून देत असे.

सध्या त्याची वार्षिक परीक्षा संपत आली होती आणि बालमित्रांनो तुमच्यासारखेच त्यालाही उन्हाळ्याच्या सुट्टीचे वेध लागले होते.

प्रकरण 2: परीक्षा संपली

वार्षिक परीक्षेचा शेवटचा पेपर संपला आणि हर्षवर्धन मित्रांच्या घोळक्यातून घराकडे निघाला. नेहमीप्रमाणे त्याला पेपर अगदीच सोपा गेला होता. दुपारच्या रणरणत्या उन्हात मुख्य रस्त्याने न जाता सर्वजण जवळच्या पायवाटेने निघाले होते. अचानक कोकिळेचा पंचम स्वर कानी पडला आणि मुलांचे लक्ष रस्त्याच्या शेजारच्या आंब्याच्या डेरेदार वृक्षाकडे गेले. हिरव्यागार कैऱ्या झाडावर वाऱ्याच्या झुळुकेसरशी डौलाने डुलत होत्या. ते पाहून मुलांच्या तोंडाला पाणी सुटले नसते तरच नवल होते.

एका क्षणात कैऱ्या लंपास करण्याचा पक्का बेत ठरला. हर्षवर्धनने मित्रांना खूप समजावून सांगायचा प्रयत्न केला. "आपल्याला पूर्वीप्रमाणे आता कैऱ्या तोडता येणार नाहीत," असे त्याने मित्रांना सांगण्याचा प्रयत्न केला, पण कोणीच त्याचे म्हणणे ऐकण्याच्या तयारीत नव्हते.

पूर्वी त्या जागेचे मालक परगावी असल्याने तेथील इमारतीची आणि बागेची देखरेख करण्यासाठी कोणी नव्हते. त्यामुळे त्या

झाडावर जणू सार्वजनिक मालकी असल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली होती. पण गेल्याच वर्षी त्या रिकाम्या इमारतीत गावातील पोलीस ठाणे स्थलांतरित झाले आणि त्यामुळे मागच्या बाजूला असलेल्या आंब्याच्या झाडाजवळ गावातील मुले फिरकायची एकदम बंद झाली. अधूनमधून खरोखरची माकडधाड येई, पण मुले मात्र खाली पडलेल्या एखाद्या कैरीवरच चुटपुटते समाधान मानत.

हर्षवर्धनच्या मित्रांनी आज मात्र त्याचा सल्ला मानला नाही. उलट आपापली दप्तरे त्याच्या ताब्यात देऊन सगळे कुंपणावरून उडी मारून आत गेले. जयेश उर्फ जयने झरझर झाडावर चढून कैऱ्या खाली फेकायला सुरुवात केली आणि खाली उभे असलेले पाचजण त्या कैऱ्या अलगद झेलून खिशात भरू लागले. बाहेर उभ्या असलेल्या हर्षवर्धनने त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला, पण कोणीच ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते.

शेवटी जे घडायचे होते तेच घडले. दबक्या आवाजातील मुलांचा गोंधळ शेवटी पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचला आणि इन्स्पेक्टर प्रधान बाहेर आले. त्यांनी मुलांना हटकताच झाडाखाली कैऱ्या गोळा कयणाऱ्या मुलांनी धूम ठोकली. झाडावर चढलेला जयेश व बाहेर मुलांची दप्तरे सांभाळत उभा असलेला हर्षवर्धन हे दोघे इन्स्पेक्टर प्रधानांच्या दृष्टीस पडले. तसे इन्स्पेक्टर

प्रधानांनी हवालदार राणेंना जयेशला झाडावरून उतरवण्यासाठी मदत करायला सांगितले आणि हर्षवर्धनला आत बोलावून घेतले.

इन्स्पेक्टर प्रधान हर्षवर्धनला ओळखत होते. त्यांची मुलगी मिताली त्याच्याच वर्गात शिकत होती. वर्गात पहिल्या क्रमांकासाठी त्यांच्यात नेहमीच चढाओढ असे. हर्षवर्धन नेहमी गणितात पैकीच्या पैकी मार्कस् मिळवत असल्याने बहुतांश वेळी मितालीला दुसऱ्या नंबरावर समाधान मानावे लागत असे. एकदा पालक सभेच्या वेळी इन्स्पेक्टर प्रधान आणि निर्मलाताईंची ओळख झाली होती. तेव्हापासून ते कुठे भेटले तर त्यांची आपुलकीने चौकशी करत असत. आज मात्र हर्षवर्धनवर वेगळाच प्रसंग ओढवला होता. इन्स्पेक्टर प्रधानांनी हर्षवर्धन आणि जयेशला 'पुन्हा असे घडता कामा नये,' अशी सक्त ताकीद दिली.

"परवानगीशिवाय दुसऱ्यांच्या वस्तूला हात लावणे ही मोठी चूक आहे," इन्स्पेक्टर प्रधान म्हणाले. अर्थात, हर्षवर्धननेही आपल्या मित्रांना तेच समजावण्याचा परोपरीने प्रयत्न केला होता; पण सध्याच्या परिस्थितीत ती गोष्ट त्याला इन्स्पेक्टर प्रधानांना सांगता आली नाही. बिचारा हर्षवर्धन अगदीच बावरून गेला. त्याचे डोळे पाण्याने डबडबले आणि पुन्हा असे करणार नाही, असे सांगून तो खाली मान घालून तेथून निघाला.



('पुन्हा असे घडता कामा नये,' अशी सक्त ताकीद हर्षवर्धनला देताना इन्स्पेक्टर प्रधान)

थोड्याच अंतरावर पळून गेलेली मुले पुन्हा त्याच्या भोवती गोळा झाली आणि झालेल्या प्रकाराबद्दल माफी मागून त्याला आपल्या लुटीतील वाटा देऊ लागली. हर्षवर्धनने काहीच उत्तर दिले नाही. त्यांची दप्तरे त्यांच्या हवाली करून तो तिथून धावत निघाला आणि तडक आपल्या घरी गेला.

निर्मलाताई त्याची वाट पाहत दारातच उभ्या होत्या. पेपर संपल्यानंतर घरी यायला त्याला बराच उशीर झाला होता. आई दारात उभी असल्याचे पाहून हर्षवर्धन अजूनच हिरमुसला. त्याचे उतरलेले तोंड पाहून काहीतरी बिनसले असावे, अशी

निर्मलाताईंना शंका आली. त्यांनी त्याला पेपर कसा गेला याची चौकशी केली.

"पेपर नेहमीप्रमाणे अगदी सोपा होता. मी धावतधावत आल्याने थोडा दमलो आहे, इतकेच," हर्षवर्धनने वेळ मारून नेली.

निर्मलाताईंनी मुद्दाम आज त्याच्या आवडीचा स्वयंपाक बनवला होता. पण जेवताना हर्षवर्धनचे फारसे लक्ष दिसत नव्हते. तो थोडा बेचैन झाल्यासारखा वाटत होता. राहूनराहून त्याला इन्स्पेक्टर प्रधानांचे बोलणे आठवत होते.

थोडे विषयांतर व्हावे या हेतूने निर्मलाताईंनी मुद्दाम त्याच्या मुंबईला जाण्याचा विषय काढला. या सुट्टीत त्याला एकट्यालाच मुंबईला माया मावशीकडे पाठवायचे कधीचे ठरले होते. आता परीक्षा संपल्यावर आठवडाभरात सगळी तयारी करून हर्षवर्धनला मुंबईला पाठवायचे, असे निर्मलाताईंनी ठरवले.

त्याच्याजवळ ठेवणीतल्या कपड्यांचे दोनच जोड होते. ते धुवून इस्त्री करायचे होते. शिवाय त्याच्यासोबत भेट म्हणून देण्यासाठी चिवडा आणि लाडू बनवायचे, असेही निर्मलाताईंनी ठरवले होते; आणि हे सर्व त्यांना आपल्या ब्युटी पार्लरचे काम सांभाळून करावे लागणार होते.

एक-दोन दिवसांत रेल्वे स्टेशनवर जाऊन तिकीटही काढावे लागणार होते. निर्मलाताईंनी हर्षवर्धनला सर्व गोष्टींची यादी करण्याचे काम सांगितले आणि त्या नादात हर्षवर्धन दुपारचा अप्रिय प्रसंग विसरून गेला.

रात्री झोपेत त्याला आपण एकटाच रेल्वेतून मुंबईला निघाल्याचे स्वप्न पडले आणि तो एकदम दचकून अर्धवट जागा झाला. शेजारी आई झोपलेली पाहून त्याला थोडे हायसे वाटले. तिचा हात जवळ घेऊन तो पुन्हा झोपी गेला.

निर्मलाताईंनाही तशी झोप लागत नव्हती. त्याला एकट्याला एवढ्या लांब प्रवासाला पाठवायचे त्यांच्या जीवावर आले होते. पण काय करणार? लग्नसराई जवळ आली होती. पार्लरचे काम वाढले होते आणि त्याकडे दुर्लक्ष करून भागणार नव्हते.

झोपलेल्या हर्षवर्धनला त्यांनी अलगद आपल्या जवळ घेतले आणि त्याला थोपटता थोपटता कधी त्यांचा डोळा लागला, हे त्यांनाही कळले नाही

प्रकरण 3: प्रवासाची तयारी

दुसऱ्या दिवशी पलीकडच्या गल्लीतील पाटील वहिनी हेअर वॉश आणि हेअरकटसाठी येणार होत्या. निर्मलाताईंनी त्यांना सकाळी लवकरची वेळ दिली असल्यामुळे, त्या पहाटेपासूनच तयारीला लागल्या होत्या. शिवाय आज त्यांना हर्षवर्धनच्या प्रवासाचीही तयारी करायची होती. एरवी त्यांच्या हाताखाली कोणी मदतनीस नसल्याने त्यांना एकटीलाच सर्व आवरून काम करावे लागत असे. त्यात त्यांचा दीड-दोन तास वेळ सहज जायचा. पण आज हर्षवर्धन स्वतःहून आनंदाने त्यांना मदत करण्यास तयार होता.

निर्मलाताई नाश्ता बनवेपर्यंत हर्षवर्धनने पार्लरची खोली नीट आवरून ठेवली. आईला लागणारे साहित्य व्यवस्थित मांडून ठेवले; शिवाय गरम पाण्याचे दोन मोठे जग बेसिनजवळ भरून ठेवले. केस पुसण्यासाठी टॉवेल, हात पुसण्यासाठी नॅपकिन, हेअर कलर आणि शॅम्पूच्या बाटल्या, गाऊन वगैरे साहित्य कपाटातून काढून त्याने योग्य जागेवर ठेवून दिले.

त्या दोघांनी नाश्ता केला आणि तेवढ्यात पाटील वहिनी आल्या. आल्या आल्या 'हुश्श' करत त्या पंख्याखाली बसल्या आणि हर्षवर्धनशी गप्पा मारू लागल्या.

"अरे हर्षा, तू मुंबईला जाणार आहेस असे आमचा सागर म्हणत होता. एका मुलाची मज्जा आहे बुवा! सुट्टीत जीवाची मुंबई करून घे बरं!" पाटील वहिनींचे माहेर मुंबईत असल्याने त्यांना मुंबईचे खूपच अप्रूप आणि अभिमान वाटत असे.

"हे बघ, गिरगाव चौपाटी, नरिमन पॉइंट, जिजामाता उद्यान, गेटवे ऑफ इंडिया आणि त्याजवळचे ताज हॉटेल पाहायला विसरू नकोस. जमलेच तर संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, घारापुरीच्या एलिफंटा केव्ह्ज बघ; शिवाय नेहरू प्लॅनेटेरियम, सिद्धिविनायक मंदिर... अरे, रोज एक ठिकाण बघायचे ठरवलंस तरी तुझी महिनाभराची सुट्टीदेखील कमी पडेल!" पाटील वहिनी अगदी मनापासून बोलत होत्या.

त्यांना हर्षवर्धनचे खूप कौतुक वाटत असे. दिवसातून एकदा तरी त्या आपल्या लेकाला—सागरला, "हर्षवर्धनचे चांगले गुण घे," म्हणून नेहमी सांगत असत. तसा त्यांचा सागरही चांगला मुलगा होता, पण त्याचा कल अभ्यासापेक्षा क्रिकेटकडे जास्त होता.

निर्मलाताईंनी हेअर वॉशचे काम सुरू केले. पाटील वहिनींचे केस धुता धुता त्यांच्या गप्पा रंगल्या होत्या.

"पाणी जास्त गरम तर नाही ना?" निर्मलाताईंनी विचारले.

"छे, छे! तापमान अगदी योग्य आहे. मघाशी तुमच्या हर्षने त्यात थोडं विसण घातले होते. आणि सध्या उन्हाळ्यात जास्त गरम पाणी सोसवतही नाही," पाटील वहिनी म्हणाल्या.

"खरे आहे तुमचे म्हणणे. यंदाचा उन्हाळा तर कित्येक वर्षांतील सर्वांत उष्ण उन्हाळा आहे म्हणतात," निर्मलाताई म्हणाल्या.

"पण तुम्ही हर्षला एकट्यालाच मुंबईला पाठवणार आहात, तर त्याच्यासोबत तुम्हीही चार दिवस का जात नाही? तुम्हालाही थोडा बदल होईल," पाटील वहिनींनी सुचवले.

"छे हो, मी कुठली जाते? सध्या लग्नसराई असल्याने पार्लरच्या कामातून मला फुरसत मिळत नाही. शिवाय बागेतील झाडांना, भाजीपाल्याच्या मळ्याला पाणी कोण घालेल? नाही म्हटले तरी त्यातून थोडीफार मिळकत होते; आणि ऐन उन्हाळ्यात पाणी मिळाले नाही, तर बाग आणि मळा दोन्ही सुकून जातील," निर्मलाताईंनी उत्तर दिले.

"ते मात्र अगदी खरे आहे," पाटील वहिनी म्हणाल्या.

"माझ्या या कामातून सध्या तरी माझी सुटका नाही, म्हणून हर्षला एकट्यालाच पाठवून द्यायचे ठरवले. सुरुवातीला त्याला जायची अजिबात इच्छा नव्हती, पण नंतर बळेबळेच तयार झाला. सगळी सुट्टी इथे वाया जाऊ नये, असे मला वाटते. शिवाय त्याची आजी आणि मावशी दोघीही सारख्या माझ्यामागे लागल्या आहेत. फोनवर फोन करून त्यांनी मला अगदी भंडावून सोडले आहे. हर्षने अजून मुंबई पाहिलेली नाही. तो अगदी लहान होता तेव्हा आम्ही त्याला घेऊन मुंबईला गेलो होतो.

माझ्या बहिणीचे मिस्टर पोस्टमास्टर आहेत. त्यांनीही हर्षला पाठवून द्यावे म्हणून आग्रह धरला; मग मात्र माझा नाईलाज झाला. माझी भाची मयुरी आमच्या हर्षपेक्षा चार वर्षांनी मोठी आहे. यंदा तिने दहावीची परीक्षा दिली आहे. तीही सुट्टीत मोकळीच आहे, त्यामुळे हर्षला तिकडे एकटे वाटणार नाही. तिच्याकडून कॉम्प्युटरचे बेसिक शिकून घे, असे मी हर्षला बजावले आहे.

हे बघू आता हा तिकडे गेल्यावर काय काय करतो ते! त्याच्या मावशीच्या घराशेजारी मोठी लायब्ररी आहे, त्यामुळे त्याला पुस्तक वाचनातून सवड मिळाली, तर मग इतर गोष्टींकडे लक्ष देईल. आणि तसेही तो आता काही लहान मुलगा राहिला नाही. त्याला स्वतःची काळजी घ्यायला शिकायलाच हवे.

त्याची माया मावशी त्याला छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवर (CSMT) घेण्यासाठी येणार आहे. तसे तिचे घर दादर स्टेशन आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या बरोबर मध्यभागी आहे; पण मुद्दाम त्याला शेवटच्या स्टेशनवर उतरायला सांगितले आहे. गाडी थांबली की मेन गेटमधून— म्हणजेच त्या मोठ्या घड्याळाच्या मुख्य दरवाजाबाहेर त्याची मावशी अगोदरच येऊन थांबणार आहे. त्यामुळे फार काही काळजी करण्याचे कारण नाही," निर्मलाताई काम करता करता बोलत होत्या.

"मुंबई त्याला खूपच आवडेल, यात शंकाच नाही. फिरण्यासाठी ठिकाणे खूप आहेत आणि आता मेट्रोची सोयही चांगली झाली आहे. शिवाय दादर, गिरगावात 'बेस्ट'ची बससेवा उत्तम आहेच; आणि टॅक्सी तर रात्रीच्या कोणत्याही प्रहरी मिळू शकते. 'मुंबई कधीच झोपत नाही' म्हणतात, ते अगदी खरे आहे," पाटील वहिनी म्हणाल्या.

बोलता बोलता पाटील वहिनींचे हेअर कलर करण्याचे काम झाले आणि त्या हर्षवर्धनला शुभेच्छा देऊन निर्मलाताईंना पैसे देऊन निघून गेल्या.

दुपारच्या जेवणानंतर निर्मलाताईंनी आवराआवर केली आणि लगेच बेसनाच्या लाडवांसाठी बेसन भाजायला घेतले. पाऊण तासात बेसन भाजून झाले, तशी त्यांनी चिवड्याची तयारी करून

ठेवली. थोडी विश्रांती घेऊन त्या हर्षवर्धनसोबत रेल्वे स्टेशनवर तिकीट बुकिंग करायला निघाल्या. रात्री शांतपणे लाडू वळून चिवडा फोडणीला टाकायचा, असे त्यांनी ठरवले होते.

घरापासून रेल्वे स्टेशन दीड किलोमीटर अंतरावर होते. नुसते तिकीट काढायला जाण्यासाठी रिक्षा करण्याची गरज नव्हती. निर्मलाताई आणि हर्षवर्धन चालत रेल्वे स्टेशनकडे निघाले. तिकीटाच्या खिडकीजवळ निर्मलाताई रांगेत उभ्या राहिल्या आणि हर्षवर्धन आजूबाजूला कुतूहलाने पाहू लागला.

अचानक त्याला समोरून इन्स्पेक्टर प्रधान येताना दिसले. त्यांना पाहून हर्षवर्धनचे धाबे दणाणले. त्याच्या हृदयाची धडधड इतकी वाढली की ती चक्क त्याच्या कानांनाही ऐकू येऊ लागली. त्याच्या हातापायांना घाम फुटला आणि त्याचा चेहरा एकदम उतरला. काय करावे तेच त्याला कळत नव्हते. तिथून पळून जाण्याचा मार्ग त्याच्यासाठी उपलब्ध नव्हता, कारण सोबत आई होती. इन्स्पेक्टर प्रधान नक्कीच आईकडे 'कैरी प्रकरणा'ची वाच्यता करतील, अशी त्याला भीती वाटत होती. शेवटी त्याने धीर एकवटून आलेल्या प्रसंगाला तोंड द्यायचे ठरवले.

तोपर्यंत निर्मलाताई तिकीट काढून रांगेतून बाहेर आल्या होत्या. त्यांना पाहून इन्स्पेक्टर प्रधान थांबले आणि त्यांनी अदबीने विचारले, "अरेच्चा, तुम्ही दोघे बाहेरगावी निघालेले दिसता."

निर्मलाताई म्हणाल्या,

“नाही, उद्या हर्षवर्धन मुंबईला मावशीकडे एकटाच जाणार आहे, म्हणून तिकीट काढायला आम्ही आलो आहोत.”

“उद्या जाणार आहे का? आमची मितालीही आज तिच्या आईबरोबर मुंबईलाच निघाली आहे. अगोदर समजले असते तर त्याला त्यांच्या सोबत जाता आले असते. तरीपण एकटाच निघाला आहे, तर त्याच्याजवळ माझा फोन नंबर असू देत,” असे म्हणून इन्स्पेक्टर प्रधानांनी आपले कार्ड निर्मलाताईंकडे दिले.

हर्षवर्धनला तेव्हा कुठे हायसे वाटले. ‘कैरी प्रकरण आईला समजण्यापेक्षा एकट्याने मुंबईच काय, पण दिल्लीला गेलेले परवडले,’ असे त्याला वाटत होते. हळूच त्याने इन्स्पेक्टर प्रधानांच्या चेहऱ्याकडे पाहिले. त्याला त्यांच्या चेहऱ्यावर कैरी प्रकरणाचा मागमूसही दिसत नव्हता. निर्मलाताईंनी हसून त्यांचा निरोप घेतला आणि दोघेही रेल्वे स्टेशनच्या बाहेर पडले.

रात्री झोपण्यापूर्वी निर्मलाताईंनी ठरवलेली सर्व कामे उरकली. फराळाचे डबे भरून तयार ठेवले आणि हर्षवर्धनने भरलेली बॅग, तो काही विसरला तर नाही ना, म्हणून एकदा तपासून पाहिली.

(निर्मलाताई चिवडा-लाडवांचा डबा देताना)

हर्षवर्धनची ट्रेन दुसऱ्या दिवशी रात्रीची होती, त्यामुळे उद्याचा संपूर्ण दिवस तयारीसाठी मोकळा होता. संध्याकाळी, उद्यासाठी पार्लरची अपॉइंटमेंट घेण्यासाठी मिसेस हिरेमठ आल्या होत्या. निर्मलाताईंनी त्यांना एक दिवस नंतर येण्यास सांगितले; कारण उद्याचा संपूर्ण दिवस त्यांना आपल्या लाडक्या लेकाच्या पहिल्यावहिल्या प्रवासाची तयारी करत त्याच्यासोबत घालवायचा होता. 'पुढचा महिनाभर आपल्याला घरी एकटेच राहायचे आहे,' या विचाराने त्या आतापासूनच बेचैन झाल्या होत्या.

प्रकरण 4: आणि प्रवास सुरू झाला

निर्मलाताईंना रात्री झोप मात्र नीट लागली नाही. कदाचित भयंकर उकाड्यामुळे असेल किंवा हर्षवर्धनला एकट्याला मुंबईला पाठवायच्या काळजीमुळे असेल; पण रात्रभर त्यांच्या डोळ्याला डोळा लागला नाही, हेच खरे. तसे हर्षवर्धनचीही परिस्थिती काही वेगळी नव्हती. त्याला थोडीफार झोप लागली खरी, पण चित्रविचित्र स्वप्ने पडून त्याला अर्धवट जाग येत होती. अचानक पहाटे वळीवाचा पाऊस झाला आणि वातावरण थंडगार झाले. त्यामुळे पहाटे दोघेही गाढ झोपले. कधी नव्हे ते निर्मलाताई सकाळी सात वाजेपर्यंत झोपल्या होत्या. मात्र, एकदा जाग आल्यावर त्यांनी शेजारी झोपलेल्या लेकाच्या तोंडावरून प्रेमाने हात फिरवला आणि झटकन उठून कामाला लागल्या. चहा तयार

होईपर्यंत हर्षवर्धनही उठला आणि दात घासून, चहा पिऊन ताजातवाना झाला.

निर्मलाताईंनी सकाळी मळ्यातील ताजी भाजी काढून वेगळ्या प्लास्टिकच्या पिशवीत पॅक करून ठेवली होती. ती पिशवी कपड्यांच्या बॅगेत न ठेवता वेगळी ठेवण्यासाठी त्यांनी त्याला बजावून सांगितले. "भाजीची पिशवी सांभाळून ने. तिच्यावर इतर ओझे ठेवू नकोस, नाहीतर भाजी खराब होईल," हे सांगायला त्या विसरल्या नाहीत.

"हर्षवर्धन, रोज अंघोळ झाल्यावर तुझा टॉवेल आणि घरात घालायचे कपडे धुवून वाळत घालत जा. बाहेर जायचे कपडे रोज धुवायला नकोत; पण कपडे धुण्यासाठी मावशी जेव्हा वॉशिंग मशीन लावेल, तेव्हा धुवायला दे आणि इस्त्री करून हँगरला व्यवस्थित टांगून ठेव. तुझा निळा जर्कीन मात्र अंगातच घालून जा, कपड्यांच्या बॅगेत तेवढीच जागा रिकामी होईल," निर्मलाताई शांतपणे हर्षवर्धनला समजावून सांगत होत्या.

नाश्त्यासाठी त्यांनी हर्षवर्धनच्या आवडीची भाजणीची खमंग थालीपीठे केली होती. गरमागरम थालीपीठे आणि वर लोण्याचा गोळा! हर्षवर्धनने थोडा जास्तच नाश्ता केला.

"मुंबईला घरी पोहोचल्यावर लगेच मला मावशीच्या फोनवरून सुखरूप पोहोचल्याचे कळवायला विसरू नकोस," निर्मलाताई म्हणाल्या. त्यावर हर्षवर्धनने शांतपणे मान डोलावली.

"हे बघ, आपल्या गावापेक्षा मुंबईचे वातावरण खूप वेगळे आहे. तिथे वागताना शिष्टाचार विसरू नकोस, नाहीतर तुला लोक गावंढळ समजतील. आता तू काही लहान नाहीस, त्यामुळे मयुरीताईशी भांडण करू नकोस. मावशीने आणि आजीने सांगितलेले ऐकत जा. तुला काही अडचण आली, तर मिलिंद काकांना खुशाल विचार; पण कुणाशी वादविवाद घालत बसू नकोस. भलतेसलते धाडस करून त्यांना काळजी करायला लावू नकोस. मी सांगितलेल्या गोष्टी पक्क्या ध्यानात ठेव," निर्मलाताई म्हणाल्या.

दुपारचे जेवण झाल्यावर ते दिवाणखान्यात गेले. त्याच्या आईने कपाटातून पैशांचा डबा काढला आणि त्यातील काही पैसे मोजले. मग तिने मान हलवली आणि ते पुन्हा मोजले. त्यानंतर तिने विचारले, "काल दुपारी इथे कोण कोण आले होते?"

"मोहिनीताई आणि नीलिमा काकू काल 'आयब्रो' करण्यासाठी आल्या होत्या," हर्षवर्धनने आठवण करून दिली.

"त्यांच्याकडून आलेली रक्कम हिशोबात धरली आहे, पण तरीही पैसे कमी पडत आहेत," निर्मलाताई विचार करत म्हणाल्या.

"हां, आत्ता आठवले! काल दुपारी गॅस सिलिंडर आले होते," हर्षवर्धनने पुन्हा आठवण करून दिली.

"बरोबर, तेवढीच रक्कम कमी आहे," निर्मलाताईंनी सुटकेचा निःश्वास सोडत म्हटले.

त्यांनी पुन्हा एकदा डब्यातील पैसे मोजले. दोनशे आणि पाचशे रूपयाच्या दोन नोटा हर्षवर्धनच्या हातात देत त्या म्हणाल्या, "हे बघ हर्षवर्धन, हे सातशे रुपये तुझ्या खर्चासाठी ठेव. बाहेर गेल्यावर काही खर्च करावा लागला, तर तू तो त्यातून करू शकतोस. गरज पडल्यास हाताशी पैसे असणे कधीही चांगले, आणि जर गरज पडलीच नाही, तर शिल्लक राहिलेले कधीही उत्तम. या पाकिटात माया मावशीसाठी पत्र लिहिले आहे, त्यातच ही रक्कम ठेवते. हे हरवणार नाही याची काळजी घे. तू हे पाकीट कसे सांभाळणार आहेस?"

निर्मलाताईंनी ते पैसे पत्राच्या पाकिटात घालून ते पाकीट हर्षवर्धनकडे दिले.

हर्षवर्धन विचारात पडला. मग त्याने आपल्या शर्टच्या उजव्या खिशात ते पाकीट दुमडून ठेवले आणि वरून आपले निळ्या रंगाचे जर्कीन घातले. खात्री करून घेण्यासाठी जर्कीनवरून हात फिरवत त्याने खिशातील पाकीट चाचपून पाहिले आणि आत्मविश्वासाने आईला म्हणाला, "हे बघ, आता कोणालाही माझ्या शर्टच्या खिशात पैसे आहेत याची शंका येणार नाही."

"एक गोष्ट लक्षात ठेव, ट्रेनमध्ये जास्त कोणाशी बोलत बसू नकोस," निर्मलाताईंनी परत एकदा त्याला सावध केले.

"आई, तू अजिबात काळजी करू नकोस. मी तेवढी खबरदारी नक्कीच घेईन."

तो असा मूर्खपणा करेल, असे आईला वाटल्याचे पाहून हर्षवर्धनला वाईट वाटले होते.

निर्मलाताईंनी आपल्या पर्समध्ये आणखी काही नोटा ठेवल्या आणि मग पैशांचा डबा परत कपाटात ठेवला. मायाताईंनी पाठवलेल्या पत्रात गाडी इथून सुटण्याची आणि मुंबईला पोहोचण्याची वेळ लिहिलेली होती.

निर्मलाताईंनी परत एकदा त्या वेळा वाचून पाहिल्या आणि ते पत्र आपल्या पर्समध्ये ठेवले.

बालमित्रांनो, तुमच्या मनात नक्कीच एक प्रश्न आला असेल की, 'निर्मलाताई अवघ्या सातशे रुपयांसाठी हर्षवर्धनला तीन-तीनदा का बरे बजावून सांगत आहेत? यामुळे आपल्या एवढ्या हुशार मुलावर अविश्वास दाखवल्यासारखे होत नाही का?'

आता मी तुमच्या या प्रश्नाचे उत्तर देतो. त्याचे असे आहे की, एखाद्या लक्षाधीश किंवा अब्जाधीश व्यक्तीला ही रक्कम अगदी क्षुल्लक वाटेल आणि तिला इतकी जपण्याचे काही कारणही वाटणार नाही. पण अनेक लोकांची कमाई कोटी, लाख किंवा हजारांत नव्हे, तर अवघ्या काही शेकडो रुपयांत असते. अशा लोकांसाठी सातशे रुपयेही खूप मोठी रक्कम असते. लाख रुपयांचा विचार तर ते स्वप्नातही करू शकत नाहीत. त्यामुळे पैशांचे मूल्य सर्वांसाठी समान नसते; ते व्यक्तीच्या मिळकतीवर अवलंबून असते. खरे की नाही?

बालमित्रांनो, हर्षवर्धनला वडील नव्हते हे तुम्ही जाणताच. त्यामुळे त्याच्या आईला घर सांभाळून ब्युटी पार्लरचे काम करावे लागत असे. अन्नधान्य, औषधपाणी, कपडे, शाळेची फी, वह्या-पुस्तके—हा सगळा खर्च त्यांना एकटीच्या जीवावर करावा लागत असे. कधी त्या आजारी पडायच्या, तेव्हा औषधोपचाराचा वेगळा खर्च उद्भवायचा. अशा वेळी हाताशी चार पैसे शिल्लक असतील, तर एखाद्या स्वाभिमानी स्त्रीवर दुसऱ्यांपुढे हात पसरण्याची वेळ

येत नाही. हर्षवर्धनला पैसे सांभाळून ठेव म्हणून सांगताना केवळ हाच विचार निर्मलाताईंच्या मनात होता, ही गोष्ट आपल्याला विसरून चालणार नाही.

आई आजारी असली की हर्षवर्धन तिची मनापासून सेवा करायचा. वरण-भाताचा कुकर लावून दोघांसाठी जेवण बनवायचा; जमेल तशी घरची साफसफाई करायचा. का? तर आईला विश्रांती मिळावी आणि तिने आजारपणात उठून काम करू नये म्हणून!

बालमित्रांनो, आता तुमच्या लक्षात आले असेलच की, हर्षवर्धन खरोखरच एक आदर्श मुलगा होता. त्याचे आपल्या आईवर निरातिशय प्रेम होते. आई सतत काम करत असताना आपण मात्र आराम करावा, उनाडक्या कराव्यात किंवा शाळेला दांडी मारावी, असा विचारही त्याच्या मनात कधी येत नसे. आपल्याला इतर मुलांपेक्षा काही कमी पडू नये म्हणून आपली आई रात्रंदिवस राबत आहे, याची त्याला जाणीव होती. म्हणूनच तो आपल्या परीने तिला मदत करण्याचा प्रयत्न करायचा आणि ज्या गोष्टींनी तिला आनंद होईल, तेच करायला धडपडायचा. तिला दुःख होईल, असे वागण्याचा विचारदेखील त्याच्या मनात येणे शक्य नव्हते. आणि म्हणूनच त्याने एक आदर्श मुलगा बनण्याचा निश्चय केला होता.

परीक्षेचा निकाल लागला की, "आई, बघ माझा पहिला नंबर आला!" असे सांगताना त्याला जो आनंद व्हायचा, त्याचे कारण शेजारीपाजारी किंवा शाळेत मिळणारे कौतुक नव्हते; तर आपल्या यशाने आपली आई आनंदित होते, हे होते. त्याच्या आजवरच्या आयुष्यात आईने त्याच्यासाठी जे काही केले होते, त्याची थोडीशी परतफेड आपल्या परीने तो परिक्षेत पहिला नंबर मिळवून करू शकला, याचा त्याला सार्थ अभिमान वाटत असे.

हर्षवर्धनला अगदी कालचीच गोष्ट आठवली. काल पाटील वहिनी हेअरकट करण्यासाठी आल्या होत्या. स्वयंपाकघरातून गरम पाणी जगमध्ये ओतताना गडबडीत निर्मलाताईंच्या हातातील पातेले हलले आणि गरम पाणी त्यांच्या हातावर पडले. कसेबसे त्यांनी पाणी जगमध्ये ओतले आणि लगेच हात गार पाण्याखाली धरला. हर्षवर्धनच्या नजरेतून ही गोष्ट सुटली नव्हती. त्याने फर्स्ट एड बॉक्समधून बर्नोल आणून त्यांच्या हाताला लावले.

"आई, आपण इलेक्ट्रिक किटली का विकत घेत नाही? तुला तिचा पार्लरमध्ये उपयोग होईल. स्वयंपाकघरातून गरम पाणी आणण्यापेक्षा तिथेच दोन मिनिटांत पाणी गरम होईल," हर्षवर्धन काळजीने म्हणाला होता.

"अरे, मला काही इलेक्ट्रिक किटलीची गरज वाटत नाही. इथेही पाच मिनिटांत पाणी तापतेच की. त्यासाठी दीड-दोन हजार

रुपये खर्च करण्यापेक्षा तेवढ्या रकमेत तुझे वह्या-पुस्तके आणि गणवेश यांचे काम होईल," निर्मलाताई म्हणाल्या होत्या.

"आई, माझे बक्षिसाचे पैसे साठलेले आहेत, ते तू विसरलीस का? परवा आपण मोजले तेव्हा तीन हजार रुपये जमा झाले होते," हर्षवर्धनने आठवण करून दिली.

"तुझ्या बक्षिसाच्या पैशांचे काय करायचे हे ठरवण्याइतका तू आता मोठा झाला आहेस. पण पैसे आहेत म्हणून उगाच अनावश्यक खर्च करू नये, असे मला वाटते," निर्मलाताईंनी तो विषय तिथेच संपवला.

हर्षवर्धनच्या मनातून मात्र तो विषय अजिबात गेला नव्हता; उलट रात्रभर विचार करून त्याचा निश्चय पक्का झाला होता. मुंबईला जाताना बक्षिसांचे साठवलेले पंचवीसशे रुपये नीट काळजीपूर्वक घेऊन जायचे आणि येताना मावशीला सांगून इलेक्ट्रिक किटली घेऊन यायची, असे त्याने मनाशी ठरवले होते.

निर्मलाताई पैशांचा डबा ठेवायला आत गेल्यावर हर्षवर्धनने आपल्या पुस्तकांच्या कपाटातील पेटीमधून पाचशे रुपयांच्या पाच नोटा गुपचूप काढल्या. त्या नोटा त्याने शर्टच्या उजव्या खिशात ठेवलेल्या पाकिटाच्या मागे अलगद सरकवल्या आणि वरून आपले जर्कीन नीट ओढून घेतले.

संध्याकाळी जेवण नेहमीपेक्षा लवकर आटोपले. महालक्ष्मी एक्सप्रेस 'इन टाईम' होती आणि बरोबर सव्वा नऊला हातकणंगले स्टेशनवर थांबणार होती, असा मेसेज मावशीने पाठवला होता. साडेआठ वाजता घरातून बाहेर पडायचे त्यांनी ठरवले. शेजारच्या विनायककाकांच्या रिक्षाने स्टेशनवर जायचे ठरले होते. त्याप्रमाणे बरोबर साडेआठ वाजता त्यांनी रिक्षाचा हॉर्न वाजवला, तशा निर्मलाताई हर्षवर्धनची सुटकेस घेण्यासाठी पुढे झाल्या.

"आई, तू म्हणाल्याप्रमाणे आता मी मोठा झालो आहे, माझी सुटकेस मीच उचलणार," असे म्हणून त्याने सुटकेस उचलली आणि निर्मलाताईंनी भाजीची पिशवी घेतली. घरातून बाहेर पडण्यापूर्वी हर्षवर्धनने देवघरात देवाला नमस्कार केला आणि नंतर बाबांच्या फोटोला वंदन करून आईच्या पाया पडला. निर्मलाताईंनी त्याच्या हातावर दही-साखर ठेवली आणि "नीट काळजी घे," असे बजावून सांगितले. नंतर दोघे बाहेर पडले. निर्मलाताईंनी दाराला कुलूप लावले आणि दोघे रिक्षात बसले.

घरापासून स्टेशन फार लांब नव्हते आणि जाण्यासाठी रिक्षा केल्याने ते थोडे लवकरच पोहोचले होते. निर्मलाताईंनी प्लॅटफॉर्म तिकीट काढले आणि प्लॅटफॉर्मवर ते ट्रेनची वाट पाहत थांबले.

(हातकणंगले रेल्वे स्टेशनवर हर्षवर्धन त्याच्या आईसह)

"हर्षवर्धन, मुंबईचे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस हे आपल्या देशातील मोठ्या टर्मिनसपैकी एक आहे. तिथे लांब पल्ल्याच्या रेल्वेसाठी अनेक प्लॅटफॉर्म आहेत. उतरल्यावर गोंधळून जाऊ नकोस. एखाद्या मोठ्या माणसाला बाहेर कसे पडायचे ते विचारून घे. तुझ्या डब्यातील अनेक जण मुख्य दरवाजापाशी जाणारे असतील, त्यांना विचार आणि त्यांच्या मागून जा. मावशी अगोदरच येऊन मोठ्या घड्याळाखाली

थांबलेली असेल. डब्यात चढल्यावर तुझी सुटकेस सीटखाली ठेव आणि भाजीच्या पिशवीवर इतर काही ठेवू देऊ नकोस. स्वतःची काळजी घे. मावशीने आणि काकांनी सांगितलेले ऐकत जा. नंतर भूक लागली तर खाण्यासाठी सँडविच दिले आहे, खाऊन झाल्यावर कागद खाली फेकू नकोस. सर्वात महत्त्वाचे म्हणजे तू स्वतःची काळजी घे आणि खिशातील पैसे सांभाळ!" निर्मलाताईंचे बोलणे सुरूच होते, तेवढ्यात ट्रेन आल्याचा आवाज झाला. ट्रेन प्लॅटफॉर्मवर लागली आणि हर्षवर्धन सामान घेऊन डब्यात चढला.

आपल्या सीटवर बसल्यावर हर्षवर्धनने जर्कीनवरून हात फिरवत शर्टच्या उजव्या खिशातील पाकीट आणि त्यामागील नोटा जागच्या जागी आहेत ना, याची खात्री करून घेतली. मग त्याने सुटकेचा एक निःश्वास सोडला आणि मनाशी पुटपुटला, “सगळे काही सुरक्षित आहे.”

सुदैवाने त्याला खिडकीजवळची जागा मिळाली होती, त्यामुळे तो खूप खूश होता. खिडकीतून बाहेर डोकावत त्याने आईकडे पाहून हात हलवला. निर्मलाताई त्याच्याकडेच पाहत होत्या, त्यांनीही हात हलवला. गाडी सुटण्याची घंटा झाली आणि हळूहळू गाडी सुरू झाली. निर्मलाताईंचे डोळे भरून आले होते. त्यांच्या नजरेला हर्षवर्धन बसलेली खिडकी पुसट दिसत होती.

गाडीचा शेवटचा डबा स्टेशनमधून बाहेर पडला, तरी निर्मलाताई ट्रेनच्या दिशेने हात हलवत उभ्या होत्या.

शेवटी त्या थोड्या भानावर आल्या आणि जड पावलांनी घराकडे निघाल्या.

प्रकरण 5: मुंबईच्या दिशेने

हर्षवर्धन खिडकीजवळ जागा मिळाली म्हणून खूप खुश होता. त्याच्या शेजारी एक वृद्ध जोडपे बसले होते. आजीबाई अंगाने स्थूल होत्या आणि आजोबा थोडे अशक्त व आजारी असल्यासारखे दिसत होते. त्यांना बोलतानाही धाप लागत होती. त्या दोघांना अडचण होऊ नये म्हणून हर्षवर्धन अंग चोरून बसला, जेणेकरून त्या आजोबा-आजींना जागेची अडचण भासू नये. हर्षवर्धनने स्वतःची गैरसोय करून त्यांच्यासाठी जास्त जागा सोडल्याचे आजीबाईंच्या लक्षात आले आणि त्याच्या समजूतदारपणाचे त्यांना कौतुक वाटले.

"बाळ, तुझे नाव काय? तुझ्याबरोबर कोण आहे की तू एकटाच मुंबईला निघाला आहेस?" त्यांनी हर्षवर्धनला विचारले.

"माझे नाव हर्षवर्धन. मी माझ्या आजीला भेटायला एकटाच मुंबईला चाललो आहे," हर्षवर्धनने उत्तर दिले.

"अहो, पाहिलेत का? हा एवढासा पोरगा एकटा मुंबईला निघाला आहे. पोरगा मोठा धीट दिसतो," आजीबाई आजोबांना म्हणाल्या.

"कुणाचा रे मुलगा तू? तुझे बाबा काय करतात?"

"आजी, मी निरंजन मोहिते मास्तरांचा मुलगा. माझे बाबा गांधी विद्यामंदिरात शिक्षक होते."

"होते? होते म्हणजे काय?"

"होते म्हणजे माझे बाबा कोरोनाच्या महासाथीत वारले. मी आणि माझी आई आम्ही दोघेच राहतो. आईला कामातून वेळ नाही, म्हणून मी एकटा निघालो आहे."

"अरेरे! तुझे वडील गांधी विद्यामंदिरात शिक्षक होते? माझे जावई रमाकांत कुलकर्णी पण त्याच शाळेत शिक्षक आहेत. आम्ही दोघे त्यांच्याकडेच एका लग्नाला आलो होतो. आता परत पुण्याला आमच्या घरी निघालो आहोत."

"म्हणजे पुण्यापर्यंत आपली सोबत आहे म्हणायची! आणि हो, कुलकर्णी सर माझ्या बाबांचे चांगले मित्र होते. अधूनमधून ते सहकुटुंब आमच्या घरी येतात," हर्षवर्धनने माहिती दिली.

(ट्रेनमध्ये भेटलेले प्रेमळ आजी-आजोबा)

थोड्या वेळाने आजींनी फराळाचा डबा काढला आणि हर्षवर्धनला बुंदीचा लाडू दिला.

हर्षवर्धनच्या समोरच्या सीटवर खिडकीजवळ एक मध्यमवयीन स्त्री बसली होती. तिचे सगळे लक्ष हातातील क्रोशाच्या विणकामात होते. तिच्या शेजारी एक कॉलेजचा तरुण बसलेला होता. त्याने कानात इयरफोन घातले होते आणि तो मोबाईल पाहण्यात दंग होता. त्याच्या शेजारी एक उंच, धिप्पाड माणूस बसला होता. त्याने चॉकलेटी रंगाची उंच टोपी घातली होती. त्याने डोळ्यांसमोर वर्तमानपत्र धरले होते; पण तो सर्वांची

नजर चुकवत आजूबाजूचे लोक काय बोलत आहेत यावर लक्ष ठेवत असल्याचे हर्षवर्धनला वाटले.

त्या माणसाच्या संशयास्पद हालचाली पाहून हर्षवर्धनचा हात नकळत स्वतःच्या शर्टाच्या उजव्या बाजूला गेला. जर्कीनच्या आतल्या शर्टाच्या खिशातल्या नोटा त्याने हळूच चाचपून पाहिल्या आणि त्या ओझरत्या स्पर्शाने त्याला समाधान वाटले. तसे इतर सहप्रवासी विश्वासू माणसे असावीत असे त्याला वाटत होते; मात्र त्या उंच, धिप्पाड माणसाबद्दल त्याला खात्री वाटत नव्हती. त्याचे सारखे लक्ष त्याच्याकडेच जात होते.

अचानक त्या माणसाने वर्तमानपत्र बाजूला केले, खिशातून चॉकलेटचा एक बार काढला, तो हर्षवर्धनसमोर धरला आणि म्हणाला, "अरे बाळ, तुला हे चॉकलेट हवे आहे का?"

नकळत हर्षवर्धनने त्याचा स्वीकार केला, त्याचे आभार मानले आणि चॉकलेट जर्कीनच्या समोरच्या खिशात ठेवले.

"माझे नाव सत्याप्पा तपकीरे. मी चहा पावडरचा विक्रेता आहे. त्यासाठी मला भारतभर फिरावे लागते. अरे बाळ, खिशातले चॉकलेट आठवणीने खा बरं, विसरू नकोस. माझ्या लेकीचा तो आवडता ब्रँड आहे, म्हणून ते नेहमी माझ्याकडे असते. आताही मी तिलाच भेटायला निघालो आहे. बरं, तुझे नाव काय?" त्या माणसाने हर्षवर्धनला विचारले.

"माझे नाव हर्षवर्धन मोहिते. मी मुंबईला माझ्या आजीकडे चाललो आहे. मी आताच लाडू खाल्ला. थोड्या वेळाने आईने दिलेले सँडविच खाल्ल्यावर मग चॉकलेट खाईन," हर्षवर्धनने उत्तर दिले.

का कुणास ठाऊक, त्या माणसाच्या ओठांवर हसू उमटले; पण ते हसू हर्षवर्धनला काहीसे विचित्र आणि अस्वस्थ करणारे वाटले.

"तू मुंबईला याआधी कधी गेला होतास?" सत्याप्पा तपकीरेने हर्षवर्धनला विचारले.

हर्षवर्धनचा हात पुन्हा छातीकडे गेला. हाताला नोटांचा स्पर्श झाल्यावर त्याला थोडे बरे वाटले.

"तुला माहितीये का, तिकडे शंभर-शंभर मजली इमारती असतात. वर-खाली करण्यासाठी लिफ्ट असते. बटण दाबले की पाच मिनिटांत शंभराव्या मजल्यावर जाता येते आणि तसेच खालीही येता येते. तिकडे समुद्रावर पूल बांधला आहे. काही श्रीमंत लोक हेलिकॉप्टरने प्रवास करून स्वतःच्या घराच्या टेरेसवर उतरतात; मात्र तुला तिकडे सांभाळून राहावे लागेल. तिथे काही वाईट माणसेसुद्धा आहेत. ती मुलांना पळवून नेतात आणि परदेशात नेऊन त्यांची विक्री करतात," तो विचित्र प्रवासी उगाच हर्षवर्धनशी जवळीक साधत म्हणाला.

"हो काका, तुम्ही सांगितलेल्या बहुतेक गोष्टी मी पुस्तकात वाचल्या आहेत आणि सिनेमातही पाहिल्या आहेत," हर्षवर्धन म्हणाला.

"अहो मिस्टर, तुमचे हे काय चालले आहे? उगाच त्या बिचाऱ्या पोराला का घाबरवत आहात? असला मूर्खपणा बंद करा. मघापासून मी तुमचे विचित्र चाळे पाहत आहे. तुमच्या स्वतःच्या मुलांशी पण तुम्ही असेच वागता का?" आजोबांचा आवाज एकदम चढला होता. आजूबाजूचे लोक तिकडे पाहतच राहिले.

"मी आपली त्याची गंमत करत होतो; पण तुम्हाला इतके चिडायला काय झाले?" आता त्या विचित्र माणसाचा स्वर थोडा नरम पडला होता.

ते भांडण पाहून हर्षवर्धन अधिकच सावध झाला. त्याला पुन्हा एकदा आपल्या पैशांची खात्री करून घ्यावीशी वाटली. यावेळी मात्र तो सरळ टॉयलेटमध्ये गेला. त्याने जर्कीनच्या खिशात हात घातला, तेव्हा त्याच्या हाताला एक मोठी सेफ्टी पिन लागली. त्याने झटकन जर्कीन ची झिप खाली केली आणि शर्टाच्या खिशातील नोटा काढून एकदा मोजून पाहिल्या—बरोबर तीन हजार दोनशे रुपये होते. पाचशेच्या सहा नोटा आणि दोनशेची एक नोट. त्याने त्या नोटा सेफ्टी पिनने शर्टाच्या खिशाच्या कापडाला

घट्ट अडकवल्या आणि पिन बंद केली. मग गळ्यापर्यंत जर्कीनची झिप ओढून घेतली. तिथल्या आरशात एकदा पाहून सर्व काही व्यवस्थित आहे याची खात्री करून घेऊन तो बाहेर आला.

बाहेर आल्यावर त्याने आईने दिलेले सँडविच खाल्ले आणि थोडे पाणी प्यायला. सहजच त्याचा हात जर्कीनच्या खिशात गेला आणि त्याच्या हाताला मघाशी त्या माणसाने दिलेले चॉकलेट लागले. विचारांच्या तंद्रीत त्याने चॉकलेटचे वेष्टन काढले आणि ते तोंडात टाकले.

(सत्याप्पा तपकिरे हर्षवर्धनला चॉकलेट देत

तेवढ्यात पुणे स्टेशन आल्याची उद्घोषणा झाली आणि शेजारील आजी-आजोबा, समोरच्या क्रोशाचे विणकाम करणाऱ्या मावशी आणि मोबाईल पाहण्यात दंग असलेला तरुण सगळेजण उतरायच्या तयारीला लागले. जाता जाता आजीबाईंनी

हर्षवर्धनला, "बाळ, सांभाळून जा बरं! आणि परत घरी गेल्यावर आमचे जावई भेटले तर ट्रेनमध्ये आपली भेट झाल्याचे त्यांना सांग," असे म्हणत उरलेल्या लाडवांची पिशवी बळजबरीने त्याच्या हातात दिली.

क्षणभरातच डब्यातील गडबड वाढली. लोक आपापले सामान गोळा करू लागले. हर्षवर्धनने खिडकीतून बाहेर पाहिले. पुणे स्टेशनच्या फलाटावर प्रवाशांची वर्दळ उसळली होती. त्याला अचानक जाणवले की आता त्याच्या ओळखीचे आणि विश्वास वाटणारे सगळे प्रवासी उतरून जाणार होते. पुणे स्टेशनवर नव्याने कोणी त्यांच्या कंपार्टमेंटमध्ये चढले नाही. आता त्यांच्या कंपार्टमेंटमध्ये त्याच्या सोबत फक्त सत्याप्पा तपकीरे हा विचित्र प्रवासी राहिला होता.

हर्षवर्धनने आता फक्त खिडकीतून बाहेर पाहायचे ठरवले. रात्रीची वेळ होती. पुणे शहराचा भाग असेपर्यंत रस्त्यांवरील दिवे दिसत होते. तासाभरात ट्रेन शहराच्या बाहेर पडली आणि खिडकीबाहेर काळाकुट्ट अंधार पसरला. नाही म्हणायला आकाशात थोड्याफार चांदण्या चमकत होत्या.

तेवढ्यात त्याला एक अद्भुत दृश्य दिसले. काळ्याकुट्ट अंधारात एक झाड काजव्यांच्या प्रकाशाने उजळून निघाले होते. ते पाहून आपण कोणाला तरी ते सांगावे असे त्याला वाटले. त्याने

नजर समोरच्या बाकाकडे टाकली, तर डब्यातील त्याचा सहप्रवासी गाढ झोपला होता. त्याने तोंडावर वर्तमानपत्र ओढून घेतले होते आणि त्याच्या मोठ्याने घोरण्याचा लयबद्ध आवाज ऐकू येत होता.

हर्षवर्धनला रिकाम्या डब्यात थोडे पाय मोकळे करावेसे वाटत होते; पण आपल्या हालचालींमुळे तो झोपलेला माणूस जागा होईल या विचाराने त्याने तो विचार मनातून काढून टाकला. बसलेल्या जागेवरून तो समोरच्या बाकावर झोपलेल्या माणसाकडे पाहू लागला. आता त्याच्या तोंडावरचे वर्तमानपत्र सरकून खाली पडले होते; मात्र अजूनही डोक्यावरची टोपी तशीच होती.

'का बरे हा माणूस कायम टोपी घालत असावा?' हर्षवर्धनच्या मनात विचार आला.

त्याचा चेहरा गलेलठ्ठ होता आणि त्याला शोभतील अशा पीळदार काळ्या मिशा होत्या. त्याचे पसरट कान डोक्याच्या दोन्ही बाजूंना बाहेर आलेले दिसत होते.

हर्षवर्धनने स्वतःला सावरले; पण तो प्रचंड घाबरला होता. त्याला झोप अनावर झाली होती, तरी कोणत्याही परिस्थितीत झोपण्याची त्याची हिंमत होत नव्हती. आणखी कोणीतरी गाडीत चढले तर बरे होईल, असे त्याला राहून-राहून वाटत होते. ट्रेन पुढे

एक-दोन स्टेशनांवर थांबली; पण डब्यात कोणीच आले नाही. अजूनही रात्रच होती. सकाळी साडेसात वाजता ट्रेन मुंबईत पोहोचणार होती.

महत्प्रयासाने त्याने स्वतःला जागे ठेवण्याचा प्रयत्न केला; पण त्याला एक लहानशी डुलकी लागली. चित्रविचित्र स्वप्नांची तुटक मालिका त्याच्या अर्धजागृत मनासमोर येत-जात होती.

अरे बापरे! झोपेत तो बाकावरून जवळजवळ खालीच पडणार होता, तोच त्याला दचकून जाग आली. पुन्हा झोप लागू नये म्हणून त्याने स्वतःच्या पायाला चिमटे घेण्यास सुरुवात केली. बहुधा त्याच्या पायावर काळेनिळे चट्टेही उठले असतील; पण शेवटी कशाचाच उपयोग होईना.

शेवटी त्याने मनाशी पाढे म्हणायला सुरुवात केली. त्याचे बावीसपर्यंत पाढे म्हणून झाले आणि पुढचे काही त्याला आता आठवेनासे झाले.

'आपल्याला पाढे का आठवत नाहीयेत? हे कसे शक्य आहे?'

या प्रश्नाचा विचार करत असतानाच त्याच्या डोळ्यांवर झोपेची झापड जबरदस्त आली आणि क्षणभरातच तो गाढ झोपून गेला.

प्रकरण 6: स्वप्न की सत्य?

'काहीही झाले तरी प्रवासात झोपायचे नाही,' हा हर्षवर्धनने केलेला निर्धार त्याच्या शिणलेल्या मेंदूला विसर पडला आणि निद्रादेवीने त्याचा ताबा कधी घेतला हे त्याला कळलेसुद्धा नाही.

'अरेच्या, ही आगगाडी अशी गोल गोल कशी फिरायला लागली? एखाद्या कुत्र्याने मागे वळून आपली शेपटी पकडायला जावे, तसे इंजिन आणि शेवटचा डबा पाठशिवणीचा खेळ खेळत आहेत की काय?

हे काय? शंभर मजल्यांची इमारत? चला, लिफ्टमध्ये बसून तर पाहू! लिफ्टमन पण दिसत नाही. काही हरकत नाही. चला, आत बटणे दाबून बघू. कोणत्या मजल्यावर जावे? हां, दहावा मजला ठीक आहे. अरे, बापरे! ही स्टीलची खोली आपोआपच वर निघाली... 1, 2, 3, 4 आणि हे काय? 5 नंबर कसा आला नाही? लिफ्टमध्येच थांबली की काय? बाहेर फक्त भिंत दिसते. कोणाला हाक मारू? अहो, कोणीतरी मला बाहेर काढा. मी लिफ्टमध्ये

अडकलो आहे. देवाशपथ! मी पुन्हा कधी असा एकटा लिफ्टमध्ये शिरणार नाही. मला बाहेर काढा... मला बाहेर यायचे आहे!'

'हे काय? इथे इन्स्पेक्टर प्रधान कसे आले?'

"काय रे? तू इथे काय करत आहेस? तुझ्या आईला माहीत आहे का? परवाची गोष्ट विसरलास की काय?" इन्स्पेक्टर प्रधानांनी दरडावून विचारले.

"मी चुकून या लिफ्टचे बटण दाबले आणि आत अडकलो. पण इन्स्पेक्टर साहेब, कृपया कुणाला सांगू नका. आईला समजले तर तिला खूप वाईट वाटेल."

"ठीक आहे, पण पुन्हा असे अनोळखी ठिकाणी जात जाऊ नकोस."

'अरेच्चा, इन्स्पेक्टर साहेब कुठे गडबडीत गेले वाटते.'

"बाळ, का रडत आहेस? भूक लागली का? लाडू देऊ?"

'हां, या तर शेजारी बसलेल्या आजी आहेत. पण त्या तर पुण्यात उतरल्या, मग परत कशा आल्या? काहीतरी घोटाळा झालेला दिसतोय!'

हर्षवर्धनला काहीच कळेना. एका घटनेचा दुसऱ्याशी काही संबंध नव्हता. क्षणात एक दृश्य नाहीसे होई आणि दुसरे समोर उभे ठाकत असे.

(स्वप्नात इन्स्पेक्टर प्रधान दरडावून बोलत आहेत)

"ए पोरा, कुठे जाणार आहेस?"

'हा रिक्षावाला कुठून आला?'

"काका, मला मावशीकडे भायखळ्याला जायचे आहे."

"काय म्हणतोस, भायखळा? पन्नास रुपये होतील."

"पण काका, माझ्याकडे तेवढे पैसे नाहीत."

"ठीक आहे, घरी गेल्यावर मावशीकडून मागून मला दे. चला, बस लवकर. माझा धंद्याचा टाइम आहे. उगाच खोटी करू नकोस."

"काका, अजून किती वेळ लागणार आहे? आई म्हणाली की रिक्षाने दहा मिनिटे लागतात."

"आई काय म्हणाली ते सगळे आता विसरून जा! आता फक्त मी काय म्हणतो तेवढेच ऐकायचे. मुख्य म्हणजे अगदी गप्प बसायचे, मला प्रश्न विचारायचे नाहीत. तोंडातून शब्द काढायचा नाही, तरच तुझा निभाव लागेल."

"काका, तुम्ही असे का बोलत आहात? मला माझ्या मावशीच्या घरी पोहोचवा. मी तुमचे सगळे पैसे देईन. माझी आजी माझी काळजी करत असेल."

"आता आजी, मावशी विसर! हां! हां! हां! तसा हुशार दिसतोस, पण बच्चमजी, माझ्याशी चालाखी करू नकोस. मी नाठाळ घोड्यांना वठणीवर आणणारा माणूस आहे."

"वाचवा! कुणीतरी वाचवा! मला हे काका पळवून नेत आहेत! कुणीतरी मला माझ्या मावशीच्या घरी सोडा; आजी माझी वाट पाहत असेल! सोडा मला, सोडा! रिक्षा थांबवा, नाहीतर मी उडी मारेन..."

"ए रिक्षावाला, रिक्षा रोको!"

"चलो, बाजू हटो! ये रस्ता तुम्हारा है क्या?"

"सिर्फ ये रस्ता ही नहीं, ये इलाखा हमारा है! 'वेताळ गँग' का नाम तो सुना होगा!"

चार-पाच धटिंगण हातात कोयता घेऊन रिक्षाच्या समोर आले. गडबडीत रिक्षावाल्याने मला ढकलले की त्या माणसांनी मला बाहेर ओढले, काही समजत नाही. पण तेवढ्यात रिक्षावाला मात्र जीव खाऊन पळाला.

"ये छोरे, माल निकाल!"

"माझ्याकडे खरंच काही माल नाही, मला माझ्या मावशीच्या घरी जायचे आहे. मला सोडा."

एका धटिंगणाने त्याचा हात पकडला होता. दुसरा सुटकेस उघडायचा प्रयत्न करत होता. तर तिसऱ्याने भाजीची पिशवी उलटी करून आत काही आहे का तपासत होता.

"ये शाणे, जादा शानपट्टी मत दिखा. माल याने की पैसा, रोकडा, कॅश; समझा क्या? खिसा तो गरम दिखाई दे रहा है," एक आवाज आला.

"अहो, त्या पैशांतून मला माझ्या आईसाठी एक वस्तू खरेदी करायची आहे."

"ऐसा क्या, जरा दिखाओ तो, हम भी देखेंगे!"

कोणीतरी जर्कीनची झिप खाली खेचून आणि खिसा चाचपून पाहत होते.

"नाही, नाही, मी माझे पैसे तुम्हाला मुळीच देणार नाही. वाचवा! वाचवा!"

पैसे हिसकावून घेऊ नयेत म्हणून त्याने त्या धटिंगणाचा हात घट्ट पकडून ठेवला.

आजूबाजूला लोक जमायला लागले, तसे कोणीतरी त्याला धक्का देऊन खाली ढकलले आणि सर्वजण पळून गेले.

"अरे हर्षवर्धन, तू इथे रस्त्यात धुळीत काय करत आहेस? कुठे मारामारी तर केली नाहीस ना? बघ, तुझे कपडे खराब झालेत. आणि हे काय, शर्टचा खिसा फाटला की काय? तू पैसे नीट सांभाळून ठेवले आहेस ना?" आई विचारत होती.

आणि हर्षवर्धनला एकदम जाग आली. पाहतो तो काय? तो दोन बाकांच्या मधल्या जागेत खाली पडलेला होता. मघाशी पाहिलेले स्वप्न होते तर!

7 हर्षवर्धन भलत्याच स्टेशनवर उतरतो

हर्षवर्धनला जाग आली तेव्हा तो रेल्वेच्या दोन बाकांमधल्या चिंचोळ्या जागेत खाली पडला असल्याचे त्याच्या लक्षात आले. त्याला आपले डोके बधीर झाल्यासारखे वाटत होते.

तो उठून वरच्या बाकावर बसला. सकाळ झालेली होती. सुरुवातीची पाच-दहा मिनिटे त्याला काहीच समजले नाही. 'आपण इथे कसे आलो?' असा प्रश्न त्याच्या मनात आला आणि त्याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करताना त्याच्या मनात प्रचंड भीती दाटून आली. त्याचे हृदय थाडथाड उडत होते. हळूहळू त्याला सर्व काही आठवले. 'तो मुंबईला निघाला होता; त्याला ट्रेनमध्ये अजिबात झोपायचे नाही असे त्याने ठरवले होते; पण त्याच्याही नकळत त्याला गाढ झोप लागली—अगदी त्या तपकिरी रंगाची टोपी घातलेल्या माणसासारखी...' हे आठवल्यावर तो दचकला आणि आजूबाजूला पाहू लागला. समोरच्या बाकावर तोंडावर

वर्तमानपत्र ओढून झोपलेला तो विचित्र प्रवासी—सत्याप्पा तपकिरे त्याला दिसला नाही.

'अरे बापरे, तो माणूस कुठे गेला असेल?' त्याने मनात विचार केला. तो मुंबईला जाणार असावा, असे हर्षवर्धनला वाटले होते.

हर्षवर्धन दचकून ताडकन उठून उभा राहिला. "अरे बापरे! तो निघून गेला की काय? म्हणजे मी बराच वेळ झोपलो होतो," तो स्वतःशी पुटपुटला. त्याचा भीतीने थरकाप उडाला होता. त्याने यांत्रिकपणे आपल्या कपड्यांवरची धूळ झटकली.

'कदाचित तो टॉयलेटमध्ये गेला असावा,' या विचाराने त्याला थोडे हायसे वाटले. बराच वेळ तो तसाच उभा राहिला होता. त्याच्या मनात पुढचा प्रश्न आला, 'आपले पैसे सुरक्षित असतील ना?' या विचाराने तो पूर्णपणे हादरून गेला. त्याला हालचाल करण्याचीही भीती वाटत होती. त्याने आपल्या मनाची समजूत घातली, 'मला झोप लागली असताना तो कदाचित उतरला असेल. मला घाबरण्याचे काहीच कारण नाही. मी तर माझे पैसे पूर्णपणे बंदोबस्तात अगदी सेफ्टी पिनने खिशाला टोचून ठेवले आहेत,' असा विचार करत त्याने जर्कीनची झिप खाली ओढली आणि त्याने हळूच आपल्या शर्टच्या उजव्या बाजूच्या खिशात हात घातला.

खिसा रिकामा होता! पैसे गायब झाले होते! अजून त्याच्या मनाची खात्री पटत नव्हती. त्याने पुन्हा एकदा खिशात हात घालून चाचपणी सुरू केली.

"अग आई गं!" त्याच्या बोटाला काहीतरी जोरात टोचले होते. कळवळत त्याने हात बाहेर काढला. ज्या सेफ्टी पिनने नोटा खिशाला टोचून ठेवल्या होत्या, त्या सेफ्टी पिनचे टोक त्याच्या बोटात घुसले होते आणि त्यातून रक्ताचे थेंब गळत होते.

त्याने आपला रुमाल बोटाभोवती गुंडाळला आणि तो रडू लागला; पण बोटातून रक्त येत होते म्हणून नव्हे.

सेफ्टी पिन टोचली म्हणून रडणाऱ्या मुलांपैकी हर्षवर्धन नव्हता. तो एक शूर मुलगा होता. दोनच आठवड्यांपूर्वी तो खेळताना शाळेच्या मैदानावर इतक्या जोरात पडला होता की त्याच्या कपाळाला खोच पडून रक्ताची धार लागली होती; तेव्हा तो जराही रडला नाही. अगदी आयोडीन लावल्यावरही त्याने हूं की चूं केले नव्हते.

मात्र तो आता त्या पैशांसाठी रडत होता, जे त्याला आईने खर्चासाठी दिले होते. शिवाय त्याने स्वतः मिळवलेले बक्षिसांचे पैसेही आता गायब झाले होते. त्या पैशांतून त्याला आपल्या आईसाठी एक उपयोगी पडेल अशी भेटवस्तू विकत घ्यायची

होती—ज्यामुळे तिचे कष्ट थोडे कमी झाले असते, असे त्याला वाटत होते.

'आता आईला याबाबत कसे सांगायचे?' हा यक्षप्रश्न त्याच्यापुढे उभा होता. तो आपल्या आईपासून काहीही लपवून ठेवणार नव्हता. त्याला आईच्या कुशीत शिरून आपण हरवलेल्या पैशांची कबुली द्यायची होती—त्याबद्दल तिची क्षमा मागायची होती; पण आता तो ताबडतोब आपल्या घरी माघारी फिरू शकत नव्हता. आणि या सगळ्याला कारणीभूत होता तो बदमाश—सत्याप्पा तपकिरे, ज्याने हर्षवर्धनला चॉकलेट खायला देऊन स्वतः झोपल्याचे नाटक केले आणि हर्षवर्धनला झोप लागल्यावर त्यांच्याजवळील सर्व पैसे चोरून पळून गेला होता.

'अरेरे, माझेच चुकले! मी ते चॉकलेट खायलाच नको होते.'

हर्षवर्धनने आपले अश्रू पुसले आणि आजूबाजूला पाहिले. कंपार्टमेंटमध्ये तो एकटाच होता. इतर कंपार्टमेंटमध्ये थोडके प्रवासी होते, पण त्याला आता कुणाचाही विश्वास वाटत नव्हता. त्याचे लक्ष डब्यातील रेल्वे थांबवण्याच्या साखळीकडे गेले आणि अभावितपणे त्याने साखळी हातात पकडली. हर्षवर्धन साखळी खेचणार तोच त्याच्या मनात विचार आला, 'साखळी खेचल्यावर ट्रेन थांबेल आणि गार्ड, तिकीट चेकर लगेच हजर होतील. माझी तक्रार विचारतील. तेव्हा मी नेमके काय सांगू? ज्या व्यक्तीने माझे

पैसे चोरले, असा माझा संशय आहे, तो तर गायब आहे. तो कुठल्या स्टेशनवर उतरला असेल, याची मला कल्पना नाही. त्यांचा माझ्या बोलण्यावर विश्वासच बसला नाही तर? मी गंमत म्हणून साखळी ओढली, असे त्यांना वाटले तर? तर मला नक्कीच दंड होईल आणि सध्या माझ्याकडे एक रुपयादेखील नाही. जर त्यांचा विश्वास बसला आणि त्यांनी मला पोलीसांत तक्रार दाखल करायला सांगितले, तर मी काय करू? अगोदर माझी चौकशी होईल. पोलीस आईला आणि मावशीला फोन करून माझ्याकडे असलेल्या पैशांची खात्री करून घेतील. तेव्हा आई फक्त सातशे रुपये दिल्याचे सांगेल. तिला न सांगता मी घेतलेल्या बक्षिसाच्या पैशांसंबंधी मी पोलीसांची कशी खात्री पटवू? त्यांनी गावातील पोलीस ठाण्यात फोन करून माझ्याबद्दल माहिती विचारली, तर इन्स्पेक्टर प्रधान कदाचित 'कैरी प्रकरण' उघड करतील; त्यामुळे आईला जबरदस्त धक्का बसेल.' या विचाराने हर्षवर्धनने हातात धरलेली साखळी सोडून दिली आणि गुडघ्यात डोके खुपसून विमनस्क अवस्थेत बसून राहिला.

दरम्यान ट्रेनचा वेग मंदावला आणि हर्षवर्धनला स्टेशनजवळ आल्याचे जाणवले. शांतपणे त्याने बाकाखाली ठेवलेली आपली सुटकेस काढून सीटवर ठेवली; आणि तो येणाऱ्या स्टेशनवर उतरण्यासाठी सिद्ध झाला. पुढे काय करायचे याची त्याला

यत्किंचितही कल्पना नव्हती. पण या डब्यात तो थांबणार नव्हता, हे मात्र त्याने पक्के ठरवले होते.

दरम्यान ट्रेनचा वेग अगदी कमी झाला. हर्षवर्धनला बाहेर चमकणाऱ्या रुळांच्या रांगा दिसल्या. मग ती ट्रेन स्टेशनमध्ये आली.

काही हमाल प्रवाशांचे सामान घेण्यासाठी गाडीजवळ धावले.

ट्रेन थांबली!

हर्षवर्धनने खिडकीतून बाहेर पाहिले. त्याला रुळांच्या वर उंचावर एक पाटी दिसली. त्यावर 'दादर' असे लिहिले होते. दरवाजे झटकन उघडले. डब्यांमधून लोक जलदगतीने बाहेर पडत होते.

हर्षवर्धनने ट्रेनच्या दारात उभा होता. त्याच्यापुढे उतरणाऱ्या माणसांची अजून थोडी रांग होती. उघड्या दारातून त्याची नजर बाहेर कुणालातरी शोधत होती. तोच त्याला माणसांच्या गर्दीत चॉकलेटी रंगाची टोपी घातलेली व्यक्ती लगबगीने बाहेर चालल्याचे दिसून आले.

'नक्कीच तो चोर असावा. पैसे चोरून तो ट्रेनमधून न उतरता दुसऱ्या डब्यात गेला असेल,' हर्षवर्धनच्या डोक्यात विचार चमकला.

पुढच्याच क्षणी हर्षवर्धन प्लॅटफॉर्मवर उभा होता. त्याने आपली सुटकेस खाली ठेवली आणि पुन्हा तो ट्रेनमध्ये चढला, कारण तो आपली भाजीची पिशवी बरोबर घ्यायला विसरला होता. झटकन त्याने भाजीची पिशवी घेतली आणि तो उडी मारून प्लॅटफॉर्मवर ठेवलेल्या सुटकेसपाशी आला. मघाशी पाहिलेल्या चॉकलेटी रंगाच्या टोपीच्या दिशेने शक्य तितक्या वेगाने धावत निघाला.

(सत्याप्पा तपकिरेला पाहून हर्षवर्धन दादर स्टेशनवर उतरतो)

आता त्याला ती टोपी कुठे दिसत नव्हती. भांबावलेला हर्षवर्धन लोकांच्या गर्दीतून अडखळत, आपल्या सुटकेसने कोणालातरी धडक देत पुढे पळत सुटला होता. गर्दी अधिकच दाट होत होती आणि त्यातून वाट काढणे कठीण होत होते.

दादर स्टेशनवरच्या अफाट गर्दीतून वाट काढताना त्याची अक्षरशः दमछाक झाली. चॉकलेटी टोपीवाला कधी दिसत होता, तर कधी लोकांच्या गर्दीत अदृश्य होत होता. एक-दोन वेळा तर हर्षवर्धनला तो पूर्णपणे नजरेआड झाला असे वाटले.

अखेर त्याला एकदाचे चॉकलेटी टोपीवाल्याचे दर्शन झाले. बिचाऱ्याला आपली सुटकेस धड सावरता येत नव्हती. तिचे ओझे नसते तर किती बरे झाले असते असे त्याला वाटत होते. पण सुटकेसचे ओझे वाहण्याखेरीज त्याला दुसरा पर्याय नव्हता. सुटकेस चोरीला जाऊन त्याला अजिबात चालणार नव्हते.

शेवटी तो त्या चॉकलेटी टोपीवाल्याच्या अगदी जवळ गेला.

खरेतर तो जो चॉकलेटी टोपीवाला माणूस शोधत होता, तोच तो माणूस असायला हवा होता. पण हाय रे दुर्दैवा! हा कोणीतरी निराळाच माणूस होता.

हर्षवर्धन पुन्हा घाईघाईने गर्दीतून वाट काढू लागला.

अरेच्चा! हे काय? पुढच्या गर्दीत पंधरा-वीस पावलांवर आणखी एक चॉकलेटी रंगाची टोपी दिसत होती. नक्कीच तो सत्याप्पा तपकिरे होता.

तो घाईघाईने स्टेशनच्या मुख्य प्रवेशद्वाराकडे निघाला होता.

'अरे चोरा! आता पळून निघालास होय? थांब, मी तुला चांगलाच धडा शिकवतो,' हर्षवर्धन पुटपुटला.

सुटकेस एका हातात धरल्यामुळे त्याचा हात अवघडला होता. म्हणून त्याने ती दुसऱ्या हातात घेतली आणि भाजीची पिशवी चक्क काखेत दाबून धरली. मग तो त्या माणसाच्या दिशेने धावत सुटला.

आता विचार करायला वेळ नव्हता. 'करो या मरो' अशी आणीबाणीची वेळ त्याच्यावर आली होती.

प्रकरण 8: महानगरात एकाकी हर्षवर्धन

हर्षवर्धनला वाटत होते की धावत जाऊन त्या माणसासमोर उभे राहावे आणि त्या माणसाला चांगले खडसावून आपले पैसे परत करायला भाग पाडावे; परंतु असे केल्याने मुकाट्याने पैसे परत करेल याची अजिबात शक्यता नव्हती. "तो माणूस क्षणभरही नजरेआड होणार नाही, याची हर्षवर्धनला काळजी घ्यावी लागणार होती.

हर्षवर्धन एका धिप्पाड स्त्रीच्या मागून चालत होता, जेणेकरून तो चोराच्या नजरेस पडणार नाही. एव्हाना तो चोर स्टेशनच्या प्रवेशद्वाराजवळ पोहोचला होता. तिथे उभा राहून तो सभोवतालच्या गर्दीकडे निरखून पाहत होता, जणू कोणाला शोधत असावा. आता हर्षवर्धनला प्रश्न पडला, 'पुढे काय करायचे?' कारण सत्याप्पा तपकिरे तिथेच थांबून कुणाची तरी वाट पाहत राहणार असेल, तर हर्षवर्धनला पुढे चालणे धोक्याचे होते. कधीही त्या चोराची बेरकी नजर त्याच्यावर पडली असती आणि तो हातावर तुरी देऊन तेथून पसार झाला असता.

त्याच विचारात हर्षवर्धन चालत असताना त्याला ठेच लागली आणि कळवळून 'आई गं!' असा उद्गार त्याच्या तोंडून निघाला. ते ऐकून समोरची धिप्पाड स्त्री मागे वळून पाहू लागली. हर्षवर्धन खाली वाकून रक्तबंबाळ झालेला अंगठा पाहत होता. ते पाहून त्या स्त्रीला हर्षवर्धनचा कळवळा आला आणि ती त्याला एका कोपऱ्यात घेऊन गेली. तिने त्याच्या पाठीवरून मायेने हात फिरवला, आपल्या पाण्याच्या बाटलीतील पाणी पिण्यासाठी दिले आणि टिश्यू पेपरने अंगठा पुसायला लावला. नंतर पर्समधून बँड-एडची पट्टी काढून ती त्याच्या अंगठ्याला लावली.

इतके सगळे होत असतानाही हर्षवर्धनचे अर्धे लक्ष सत्याप्पा तपकिरेवर होते. त्याची गोंधळलेली अवस्था पाहून त्या स्त्रीने त्याच्याशी

बोलण्यास सुरुवात केली. इतक्या लांबून तो एकटाच प्रथमच मुंबईत आला आहे, हे ऐकून तिला त्याची काळजी वाटू लागली. तिने त्याला मावशीकडे जाण्यासाठी पोलीसांची मदत घेण्याचे सुचवले, पण हर्षवर्धन तसे करू शकत नव्हता; कारण त्याला सत्याप्पा तपकिरेने लुबाडलेले पैसे वसूल करून घ्यायचे होते आणि त्यासाठी इतर कोणाचीही मदत घेणे धोक्याचे होते. शिवाय, त्याच्या सांगण्यावर लोकांचा विश्वास बसला नसता आणि त्या भामट्याने त्याला सर्वांसमोर सहज खोटे पाडले असते.

'आता जे काही करायचे, ते आपल्या एकट्यानेच करायला हवे,' असे त्याने मनाशी पक्के केले आणि त्या दयाळू स्त्रीचे आभार मानून तो हळूहळू पुढे सरकत राहिला.

(हर्षवर्धन एका धिप्पाड स्त्रीच्या मागून हळूहळू चालत आहे)

त्याचवेळी त्या चोराने फुटपाथवरून चालायला सुरुवात केली. हर्षवर्धन एका आडोशाला उभा राहिला. त्याने आपली सुटकेस खाली ठेवली आणि चोराच्या हालचालींचा अंदाज घेऊ लागला.

भामट्याने पाठीवर काळ्या रंगाची सॅक अडकवलेली होती, कमरेला गडद चॉकलेटी रंगाचा लेदरचा पाऊच होता आणि त्याच्या एका हातात करड्या रंगाची मध्यम आकाराची सुटकेस

दिसत होती. ते पाहून हर्षवर्धन थोडा गोंधळला; कारण हातकणंगले स्टेशनवर डब्यात चढताना त्या भामट्याचे दोन्ही हात पूर्णपणे रिकामे होते, असे हर्षवर्धनला पक्के आठवत होते. स्वतः हर्षवर्धनची सुटकेस बाकाच्या खाली ठेवण्यासाठी त्या भामट्यानेच मदत केली होती. त्यावेळी हर्षवर्धनने त्याला त्याची सॅक खाली ठेवण्याबद्दल सुचवले होते, तेव्हा "नको, मी माझे सामान शक्यतो माझ्याजवळच ठेवतो," असे तो भामटा म्हणाल्याचे हर्षवर्धनला स्पष्ट आठवले.

'मग आता याच्या हातात ही करड्या रंगाची सुटकेस आली कुठून? डब्यात चढताना तर ती कुठेच दिसली नव्हती... कदाचित याने आपल्यासारखाच आणखी कोणाच्या सामानावर डल्ला मारला की काय?' असे अनेक प्रश्न हर्षवर्धनच्या मनात उभे राहिले.

एकीकडे मनात हे विचार चक्र सुरू असताना, दुसरीकडे सामान घेऊन चालल्याने हर्षवर्धनचा हात पार दुखून आला होता. त्यात भर म्हणून की काय, वाटेत अचानक ठेच लागल्याने त्याच्या पायाच्या अंगठ्यातून तीव्र कळा येत होत्या. हर्षवर्धन त्या ठिकाणी थोडासा रेंगाळला. एका कोपऱ्यात खंजिरी वाजवत तो भिकारी गात होता,

"कोण कुणाचा काका मामा,

सारी नाती झुटी,
नात्यापेक्षा पैसा मोठा,
हीच दुनियेची रीती,
वेड्या हीच दुनियेची रीती!"

हर्षवर्धनचे लक्ष त्या भिकाऱ्याकडे गेले, नेमक्या त्याच वेळी भिकाऱ्याने त्याच्यासमोर पैशांची ताटली पुढे केली; पण हर्षवर्धनच्या खिशात त्या क्षणी एक रुपयाही नव्हता, कारण त्याचे सर्वस्व तो भामटा घेऊन पळाला होता. हर्षवर्धनने हताशपणे भिकाऱ्याकडे पाहिले आणि स्वतःला सावरून लगेच तो चोर गेलेल्या दिशेने चालू लागला. पन्नास मीटरवरच हर्षवर्धनला स्वामीनारायण मंदिराच्या प्रवेशद्वारापाशी दर्शन रांगेत माणसांची दाटी झालेली दिसली. हर्षवर्धनने मनोमनी देवाचे स्मरण केले आणि तिथूनच नमस्कार करून तो पुढे निघाला. पुढे बस-थांबा होता. आता तो चोर बसच्या रांगेत उभा होता. 'बहुतेक तो बसने कुठेतरी निघाला असणार,' याचा हर्षवर्धनला अंदाज आला. पुढे काय करायचे हे त्याने मनाशी पक्के केले होते: तो त्या चोराला असा तसा मुळीच सोडणार नव्हता.

दहा मिनिटांत एक बस आली.

'सिद्धिविनायक मंदिर!' अशी कंडक्टरने बसच्या दारातून पुकार केला. रांगेत उभा असलेला चोर बसमध्ये चढला आणि

सर्वात पुढच्या सीटवर जाऊन बसला. तेव्हा अगदी शेवटच्या क्षणी हर्षवर्धनने आधी सुटकेस आत टाकली, मग स्वतः उडी मारून बसमध्ये चढला.

बसच्या शेवटच्या, सहा जणांच्या सीटवर आधीच नऊ लोक दाटीवाटीने बसले होते. त्यात दहावा हर्षवर्धन अगदी अंग चोरून बसला आणि त्याने सुटकेचा एक खोल निःश्वास टाकला. हुश्श!

सध्यातरी एक मोठे संकट टळले होते. पण आता पुढे काय? तो माणूस वाटेत कुठे उतरला तर? मग पैसे कायमचे गेले म्हणून समजायचे... कारण सुटकेस घेऊन बसमधून उडी मारणे धोकादायक ठरणार होते.

पुढचा स्टॉप लगेचच आला आणि नवीन प्रवासी बसमध्ये चढले. हर्षवर्धनची सुटकेस येण्या-जाण्याच्या वाटेत होती, त्यामुळे नव्याने आत शिरलेल्या प्रवाशांनी सुटकेसची अडचण होत असल्याबद्दल नाराजी व्यक्त केली.

एक गृहस्थ तर वैतागून म्हणाले, "अरे, लोकांना उभे राहायलाही जागा नाही आणि ही सुटकेस कोणी वाटेत ठेवली आहे? कुणाची आहे ही सुटकेस?"

हे ऐकून हर्षवर्धन खजील झाला.

"काका, ही माझी सुटकेस आहे, पण ती कुठे ठेवायची ते मला कळत नाही," हर्षवर्धन ओशाळून म्हणाला.

तेवढ्यात कंडक्टरने घंटा वाजवली आणि बस सुरू झाली. नव्याने आलेल्या प्रवाशांचे तिकीट काढत कंडक्टर हळूहळू पुढे येत होता. अचानक हर्षवर्धनच्या डोक्यात तिकीट काढायला पैसे नसल्याचा विचार चमकून गेला.

'अरे देवा! माझ्याकडे तर पैसेच नाहीत! कंडक्टर आल्यावर मला तिकीट घ्यावे लागेल, आणि मी पैसे देऊ शकलो नाही तर तो मला सरळ खाली उतरवून देईल. असे झाले तर माझे चोरलेले पैसे परत मिळण्याची शक्यताच संपली! आता मी काय करू?'

त्याने आजूबाजूच्या लोकांकडे पाहिले. त्यांच्यापैकी कोणाकडे तिकिटासाठी पैसे मागता येतील का, याचा तो विचार करू लागला. सगळ्यांचे चेहरे गंभीर दिसत होते. समोरच्या सीटवर एक गृहस्थ वर्तमानपत्र वाचत होते.

त्यांच्या पलीकडे बसलेले दोघे एका मोठ्या बँकेवर पडलेल्या दरोड्याबद्दल बोलत होते. त्यांपैकी एक म्हणाला, "चोरांनी शेजारच्या रिकाम्या इमारतीखालून चक्क सेफ डिपॉझिट लॉकर्सच्या खोलीपर्यंत एक भुयार खोदले आणि खातेदारांचा मौल्यवान ऐवज लुटून ती खोलीच रिकामी केली. किती रुपयांचे नुकसान झाले याचा अंदाज करणे अवघड आहे."

"पण किती नुकसान झाले ते कसे ठरवणार? लॉकरमध्ये ठेवलेल्या हिरे-जवाहरात, दागदागिन्यांची नोंद बँकेकडे नसते.

एखादा माणूस लॉकरमध्ये नकली दागिने ठेवून असेल आणि खरे दागिने चोरीला गेल्याचा कांगावा करेल; किंवा थोडेफार नुकसान झाले असले तरी उगाच आकडा फुगवून सांगू शकेल. म्हणजे संकटात संधी शोधल्यासारखेच व्हायचे!" दुसरा म्हणाला.

हर्षवर्धन दु:खी मनाने विचार करू लागला, 'जर मी सांगितले की चोर सत्याप्पा तपकिरेने माझे बत्तीसशे रुपये चोरले, तर कुणीच माझ्यावर विश्वास ठेवणार नाही. उलट सर्वजण मी खोटे बोलतो आहे, असेच म्हणतील. अरे देवा! मी किती मोठ्या संकटात सापडलो आहे!'

तेवढ्यात कंडक्टर शेवटच्या बाकाजवळ आला होता. तो आता अगदी दारात उभा राहून, "तिकिटे?" असा पुकारा करत होता. लोक त्याला पैसे देऊन तिकीट घेत होते.

"पंधरा रुपये!" त्याने हर्षवर्धनकडे तिकीट पंच करण्याचा चिमटा वाजवत विचारले.

"मी... काका, माझे पैसे हरवले आहेत," हर्षवर्धन कसेबसे म्हणाला. चोरीची गोष्ट सांगितली तरी कुणी विश्वास ठेवणार नाही, हे त्याला माहीत होते.

"पैसे हरवले म्हणजे? ही सबब तर मी कितीदा ऐकली आहे! आणि तुला कुठे जायचे आहे?"

"म-मला... अजून माहीत नाही," हर्षवर्धन अडखळत म्हणाला.

"असे का? मग पुढच्या स्टॉपवर उतर आणि आधी तुला कुठे जायचे आहे ते ठरव."

"नको, नको! असे करू नका! मला बसमधून उतरवू नका. खरंच माझे पैसे हरवले आहेत! देवा शपथ! काका, मी खोटे सांगत नाही आहे!" हर्षवर्धन गयावया करत म्हणाला.

"मी तुला उतरायला सांगितले आहे. आता दोन मिनिटांत पुढचा स्टॉप येईल. तिथे उतरायचंच, समजलं? मी तुला दंड करत नाही, हे तुझे नशीब समज," कंडक्टर करड्या स्वरात म्हणाला.

"कंडक्टर, त्या मुलाला तिकीट द्या," वर्तमानपत्र वाचत असलेले गृहस्थ वीस रुपयांची नोट पुढे करत म्हणाले.

कंडक्टरने ते पैसे घेतले आणि हर्षवर्धनला तिकीट देत त्या गृहस्थाला म्हणाला, "साहेब, रोज कितीतरी मुले 'पैसे विसरलो', 'पैसे हरवले' असे सांगून गाडीत चढतात. आणि एखाद्यावर दया करून तसेच जाऊ दिले तर, 'कसे फसवले' म्हणून मग आमच्या पाठीमागे फिदीफिदी हसतात. साहेब, ही लहान मुले किती बिलंदर असतात याची तुम्हाला कल्पना नाही."

"असतील, पण हा मुलगा तसे करणाऱ्यांपैकी दिसत नाही," ते गृहस्थ शांतपणे म्हणाले.

कंडक्टर इतरांना तिकीट देण्यासाठी निघून गेला.

"काका, तुमचे खूप खूप आभार," हर्षवर्धन म्हणाला.

"अरे, त्यात आभार कसले? प्रवासात पैसे हरवू शकतात," गृहस्थ म्हणाले आणि पुन्हा वर्तमानपत्रात डोके खुपसून बसले.

"मी तुमचा पत्ता विचारू शकतो का?" त्याने त्या गृहस्थांना विचारले.

"कशासाठी?"

"माझ्याकडे पैसे आले की तुमचे पैसे परत देता यावेत म्हणून. मी मुंबईत साधारण महिनाभर राहणार आहे. मी स्वतः येऊन तुम्हाला पैसे परत करेन. माझे नाव हर्षवर्धन. हर्षवर्धन मोहिते. मी कोल्हापूरहून इथे माझ्या मावशीकडे सुट्टीसाठी आलो आहे."

"मला पैसे परत नकोत. ते मी तुला भेट म्हणून दिले आहेत. तुला आणखी कशाची गरज लागणार आहे का?"

"नाही काका, अजिबात नाही!" हर्षवर्धन पटकन म्हणाला. "मी तुमच्याकडून आणखी काही घेऊच शकत नाही."

"ठीक आहे," गृहस्थ म्हणाले आणि पुन्हा वर्तमानपत्र वाचू लागले.

बस पुन्हा पुढे निघाली. पुढच्या थांब्यावर परत माणसांचा लोंढा बसमध्ये चढला आणि समोरच्या दाराने प्रवासी उतरू लागले. प्रत्येक थांब्यावर बस थांबली की हर्षवर्धनची नजर सर्वात पुढच्या सीटवर बसलेल्या सत्याप्पा तपकिरेवर खिळत असे; आणि बस सुरू झाली की तो खिडकीबाहेरची मुंबई न्याहाळू लागे.

रस्त्यांवर वाहनांची अखंड वर्दळ होती. लाल बेस्ट बसेस, काळ्या-पिवळ्या टॅक्सीज्, मोठ्या दिमाखदार देशी-परदेशी मोटार गाड्या, ओसंडून वाहणारी फुटपाथवरची गर्दी, दुकानांवरील रंगीबेरंगी पाट्या आणि सिग्नल सुटताच पुढे झेपावणारी वाहतूक पाहताना त्याला नकळत गंमत वाटत होती. इतक्या मोठ्या शहरात तो प्रथमच आला होता. परिस्थिती वेगळी असती, तर हर्षवर्धनला हे सगळे निवांतपणे पाहायला खूप आवडले असते—पण त्याला तशी मोकळीक नव्हती.

बसच्या पहिल्या सीटवर एक माणूस बसला होता—ज्याने त्याचे पैसे चोरले होते; आणि तो कधीही उतरून गर्दीत नाहीसा होऊ शकत होता. तसे झाले तर सर्व संपले असते. असंख्य वाहनांच्या रहदारीत आणि माणसांच्या समुद्रात एकदा कोणी हरवले, की त्याला पुन्हा शोधणे जवळजवळ अशक्यच होते.

हर्षवर्धन पुन्हा पुन्हा पहिल्या बाकावर बसलेल्या सत्याप्पा तपकिरेकडे नजर टाकत तो अजून तिथेच असल्याची खात्री

करून घेत होता. तो चोरटा नेमका कुठे जाणार होता याची हर्षवर्धनला पुसटशीही कल्पना नव्हती—साहजिकच, आपण नेमके कुठे चाललो आहोत हेही त्याला माहीत नव्हते.

त्या वर्तमानपत्र वाचणाऱ्या काकांनी मेहेरबानी केली म्हणून निदान तो सध्या बसने प्रवास करू शकत होता; नाहीतर वाटेतच त्याला खाली उतरावे लागले असते.

'एव्हाना मावशी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवरील त्या मोठ्या घड्याळाखाली वाट पाहत असेल आणि तो आला नाही म्हणून काळजी करत असेल. तो कोणत्यातरी संकटात सापडला असेल, या विचाराने ती अधिकाधिक चिंता करत असेल. तिने आईला फोन करून ही बातमी सांगितली असेल का? की तिने पोलीसांत तक्रार नोंदवली असेल? बापरे! म्हणजे मुंबई पोलीस माझा शोध घेत असतील? कोल्हापूर पोलीसांनाही कळले असेल का? आता इन्स्पेक्टर प्रधान काय करतील?' हर्षवर्धनच्या डोक्यात विचारचक्र भिरभिरत होते. इतका विचार करून करून शेवटी त्याचे डोके ठणकायला लागले.

मुंबई शहर प्रचंड मोठे होते आणि त्याच्या मानाने हर्षवर्धन अगदीच छोटा होता! शिवाय त्याच्याकडे पैसे नव्हते आणि कुठे उतरायचे हेही त्याला माहीत नव्हते. त्या काकांनी त्याचे तिकीट काढले खरे, पण तेही आता वर्तमानपत्रात गुंग झाले होते.

बारा-तेरा वर्षांचा एक मुलगा त्या महानगरात अगदी एकटा पडला होता. मुंबईत कोट्यवधी लोक राहत होते, पण त्यांच्यापैकी एकालाही हर्षवर्धनची चिंता नव्हती; आणि दुसरीकडे त्याची जीवाभावाची माणसे त्याच्या काळजीने बेचैन झाली होती.

तसेही मुंबईसारख्या महानगरात दुसऱ्यांच्या अडचणी समजून घेण्यासाठी कुणाकडे वेळ नसतो. प्रत्येकजण स्वतःच्या चिंता किंवा स्वतःच्या आनंदात मग्न असतो. चुकून एखाद्याची सहानुभूती मिळेलही; पण त्या कोरड्या सहानुभूतीचा प्रत्यक्ष उपयोग मात्र फारसा नसतो, हेच सत्य आहे.

'आता पुढे काय?' हर्षवर्धनने आवंढा गिळला. त्या क्षणी त्याला स्वतःला संपूर्ण जगात आपण एकटाच उरलो असल्यासारखे वाटले—एक कफल्लक, असहाय्य मुलगा.

प्रकरण 9: संकटकाळी मित्रांची साथ

बस खोडादाद सर्कलची वाहतूक आणि टिळक पूल पार करून वीर सावरकर मार्गावर आली. हर्षवर्धन अधूनमधून बसच्या खिडकीतून बाहेर डोकावून बघत होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना जुन्या इमारतींच्या सोबतीला नवनवीन उंच टॉवर्स दिसत होते. पुढे शिवाजी पार्कचा हिरवागार परिसर क्षणभर खिडकीतून दिसला. मैदानाच्या हिरवळीवर क्रिकेट खेळणारी मुले, फेरी मारणारे नागरिक आणि झाडांच्या सावलीत बसलेले ज्येष्ठ नागरिक दिसत होते. मुंबईच्या गजबजाटातही हा भाग काहीसा निवांत वाटत होता.

बस पुन्हा गर्दीत शिरली. एका सिग्नलवर दूरवर मेट्रोचा उंच मार्ग दिसत होता, त्यावरून मेट्रोची चमकदार गाडी वेगाने निघून गेली आणि खाली मात्र बस, टॅक्सी व मोटारी रहदारीत अडकलेल्या दिसत होत्या. त्यानंतर बस प्रभादेवीच्या दिशेने

वळली. वीर सावरकर मार्गावरून जाताना इमारतींच्या फटीतून आणि झाडांआडून समुद्राची निळी झलक अधूनमधून दिसत होती. खारट वाऱ्याची एक झुळूक खिडकीतून आत आली आणि हर्षवर्धन एका वेगळ्याच अनुभूतीने शहारून गेला. आजवर फक्त भूगोलाच्या पुस्तकात वाचलेला आणि सिनेमाच्या पडद्यावर पाहिलेला समुद्र तो, ओझरता का होईना, प्रथमच प्रत्यक्ष पाहत होता. दूरवर समुद्राच्या दिशेने उडणारे काही पांढरे पक्षीही त्याच्या नजरेस पडले.

चोरीचा छडा लावण्याची कामगिरी एकदा का फत्ते झाली की निवांतपणे समुद्र पाहण्याचे त्याने मनाशी पक्के ठरवले होते. आता रस्त्यांवर उंच इमारती अधिक दिसू लागल्या.

प्रभादेवी परिसरात शिरताच फुलांची दुकाने, नारळ विक्रेते आणि सिद्धिविनायकाच्या दर्शनासाठी जाणारे भाविक दिसू लागले. सिद्धिविनायक मंदिराचा थांबा जवळ येत चालला होता. कंडक्टर सतत पुढच्या स्टॉपवर उतरणाऱ्या लोकांना पुढच्या दाराकडे जाण्याची सूचना करत होता.

हर्षवर्धनने एकदा समोरच्या सीटवर बसलेल्या सत्याप्पा तपकिरेकडे पाहिले. तो बसमधून उतरण्याच्या तयारीने जागेवरून उठून उभा राहिला होता. ते पाहून हर्षवर्धन सावध झाला. त्याला इतर प्रवाशांसारखे पुढच्या दाराने खाली उतरणे धोक्याचे वाटत

होते; कारण दारातच त्या चोराची नजर त्याच्यावर पडली असती. शिवाय त्याच्याकडे सुटकेस आणि भाजीची पिशवीही होती. त्याने झटकन एक निर्णय घेतला आणि तो आपल्या सामानासह मागच्या दाराशी जाऊन उभा राहिला. बस थांबताच पटकन खाली उतरायचे, असे त्याने मनाशी पक्के केले. बस थांबली. तेवढ्या गडबडीतही हर्षवर्धनने वर्तमानपत्र वाचणाऱ्या गृहस्थांचे आभार मानले आणि तो झटकन मागच्या दाराने खाली उतरला.

बस स्टॉपच्या मागे आडोशाला तो उभा होता. त्याची नजर बसच्या समोरच्या दारातून उतरणाऱ्या प्रवाशांवर खिळली होती. सत्याप्पा तपकिरे बसमधून खाली उतरला आणि रस्ता ओलांडून मंदिराच्या दिशेने निघाला. ते पाहून हर्षवर्धनच्या पोटात भीतीने गोळा उठला. एकदा का तो चोर दर्शनाच्या भल्यामोठ्या रांगेत उभा राहिला असता, तर मग त्याला गाठणे त्याच्यासाठी अवघड झाले असते; शिवाय सुटकेस आणि भाजीची पिशवी घेऊन दर्शनाच्या रांगेत उभे राहणेही त्याला अशक्य झाले असते. हर्षवर्धनने मनोमन बाप्पाला साकडे घातले आणि 'चोर पकडण्याच्या मोहिमेत यश मिळू दे,' अशी प्रार्थना केली.

हर्षवर्धन रस्त्याच्या दुसऱ्या बाजूने सत्याप्पा तपकिरेच्या हालचालींवर बारीक नजर ठेवून होता. रस्ता ओलांडल्यानंतर तो चोर क्षणभर थांबला; मात्र तो दर्शन रांगेच्या दिशेने न जाता, तिच्या

विरुद्ध दिशेने चालू लागला. ते पाहून हर्षवर्धनचा जीव भांड्यात पडला. बाप्पाने त्याची प्रार्थना ऐकली होती. साधारण शंभर मीटर अंतरावर एक रेस्टॉरंट होते. तो भाभटा रेस्टॉरंटच्या दाराशी थोडा घुटमळला आणि मग रुबाबात पायऱ्या चढून आत गेला.

आता हर्षवर्धनला खूप सावधगिरी बाळगणे आवश्यक होते. एखाद्या संभाव्य चोराचा पाठलाग करणाऱ्या गुप्तहेराप्रमाणे हर्षवर्धनने परिस्थितीचा अंदाज घेतला. त्याने पटकन आजूबाजूला नजर टाकली. रेस्टॉरंटच्या कोपऱ्यावर त्याला एक वृत्तपत्रांचे दुकान दिसले. त्याच्या आडोशाला लपण्यासाठी तो शक्य तितक्या वेगाने धावला. जवळच एक वृत्तपत्र विक्रीचे दुकान होते. त्याच्या शेजारी एक विजेचा खांब होता. त्या दोघांमधील जागेत हर्षवर्धन लपला होता. ती जागा लपण्यासाठी अगदी योग्य होती. तिथून हर्षवर्धनला सत्याप्पा तपकिरेच्या हालचाली सहज दिसत होत्या; मात्र तो सत्याप्पाला दिसू शकत नव्हता. त्याने आपले सामान आडोशाला ठेवले आणि तिथून तो चोराच्या हालचालींवर नजर ठेवू लागला.

ते एक छोटेखानी रेस्टॉरंट होते. आत जाऊन त्याने बहुधा खाण्याची ऑर्डर दिली असावी. ऑर्डर तयार होईपर्यंत सिगारेट ओढण्यासाठी तो समोरच्या व्हरांड्यात आला आणि निवांतपणे सिगारेट ओढू लागला. तो स्वतःवरच खूप खूश दिसत होता.

सत्याप्पाचा तो चेहरा पाहून हर्षवर्धनला प्रचंड संताप आला. एक चोर इतका समाधानी कसा असू शकतो? बिचारा हर्षवर्धन मात्र इतका हताश झाला होता की त्याला पुढे काय करावे, हेच सुचत नव्हते. उलट, 'त्याच्याऐवजी आपणच चोर आहोत आणि कसेबसे लपून-छपून स्वतःचा बचाव करत आहोत,' असे त्याला वाटू लागले होते.

चोरावर दूरून नुसते लक्ष ठेवून काहीच साध्य होणार नव्हते. तो रेस्टॉरंटमधून बाहेर पडल्यानंतर त्याचा पाठलाग करणे हाच एक मार्ग होता. पण बिचारा हर्षवर्धन तरी किती वेळ असा लपून राहणार होता? पोलीसांनी जर त्याला सामानासह असे लपून टेहळणी करताना पाहिले असते, तर संशयाने त्यांनी त्याला नक्कीच हटकले असते; कदाचित पोलीस ठाण्यातही नेले असते. हर्षवर्धनच्या मनातील पोलीसांबद्दलची भीती काही केल्या कमी होत नव्हती.

अचानक हर्षवर्धनला मागून रिक्षाच्या हॉर्नचा आवाज ऐकू आला आणि तो दचकून बाजूला सरकला. त्याने मागे वळून पाहिले, तर तिथे साधारण त्याच्याच वयाचा एक मुलगा उभा होता. त्याचे दोन्ही हात त्याच्या पाठीमागे होते. 'आपण कशी एका मुलाची गंमत केली,' असे वाटून तो मुलगा हर्षवर्धनकडे पाहून हसत उभा होता.

हर्षवर्धनला घाबरलेले पाहून तो म्हणाला "अरे, असा घाबरून जाऊ नकोस. मी आपली गंमत केली."

"आता माझ्यामागे हॉर्न कुणी वाजवला?" हर्षवर्धनने त्याला विचारले.

"अच्छा, तू इथे नवखा दिसतोस! नाहीतर तुला केव्हाच कळले असते की माझ्याकडे रिक्षाचा जुना हॉर्न आहे. त्याचा मागचा फुगा दाबला की पॅ-पॅ असा आवाज येतो. आजूबाजूचे बहुतेक सर्वच हा हॉर्न ऐकल्यावर मी आलोय हे ओळखतात," तो मुलगा थोडी बढाई मारत म्हणाला.

"मी हातकणंगल्याहून आताच महालक्ष्मी एक्स्प्रेसने मुंबईत आलो आणि स्टेशनवरून थेट इथे येऊन थांबलो," हर्षवर्धन म्हणाला.

"काय म्हणतोस, म्हणजे तू खेडेगावातून आलास होय? तरीच तू असे कपडे घातले आहेस! नाहीतर मुंबईच्या उकाड्यात कोण बरे शर्टवर जर्कीन घालेल?" तो मुलगा हसत म्हणाला.

"तुझे शब्द मागे घे! नाहीतर असा काही ठोसा मारेन की तू पाठीला पाय लावून पळून जाशील!" हर्षवर्धन चिडून म्हणाला.

"अरे यार! इतके रागवायला काय झाले? मी आपली गंमत करत होतो. हां तसे भांडणच करायचे म्हटले तर मीही काही हार मानणारा मुलगा नाही," तो मुलगा खेळीमेळीच्या स्वरात म्हणाला.

"आपण ते नंतर बघू. आता माझ्याकडे असल्या गोष्टींसाठी वेळ नाही," हर्षवर्धन घाईघाईत म्हणाला. त्याचे सगळे लक्ष रेस्टॉरंटमध्ये बसलेल्या चोराकडे होते.

"मला वाटले तुझ्याकडे भरपूर वेळ असावा—एखादा मुलगा आपली बॅग आणि भाजीची पिशवी घेऊन वृत्तपत्राच्या दुकानाच्या आडोशाला लपून एकट्यानेच टेहळणी करत उभा असेल, तर नक्कीच त्याच्याकडे भरपूर रिकामा वेळ असेल, असा माझा अंदाज आहे," तो मुलगा थट्टेच्या स्वरात म्हणाला.

"मी एका चोराचा पाठलाग करत आहे," हर्षवर्धन म्हणाला.

"काय? चोराचा पाठलाग? काय सांगतोस काय? माझ्या उभ्या आयुष्यात अशी गोष्ट प्रथमच ऐकत आहे," तो मुलगा मोठ्याने ओरडून म्हणाला.

"हळू बोल! उगाच चोर सावध होईल," हर्षवर्धन म्हणाला.

"त्याने काय चोरले? आणि तो आहे तरी कुठे?" त्या मुलाने उत्सुकतेने विचारले.

"त्याने माझे पैसे चोरले," हर्षवर्धनने उत्तर दिले.

"ते कसे काय?" त्या मुलाने विचारले.

"मघाशी तुला सांगितल्याप्रमाणे नुकताच मी ट्रेनने मुंबईत आलो. रात्री ट्रेनमध्ये माझा डोळा लागला तेव्हा त्याने माझे बत्तीसशे रुपये चोरले. त्यापैकी सातशे रुपये मला आईने खर्चासाठी दिले होते आणि शिवाय त्याबरोबर मी साठवलेले पंचवीसशे रुपयेही होते—जे मी आईला मुंबईहून एखादी छान भेटवस्तू घेण्यासाठी आणले होते. मला तिला सरप्राईज द्यायचे होते. पुणे स्टेशन सोडल्याऐ आमच्या कंपार्टमेंटमध्ये आम्ही दोघेच उरलो होतो. मला झोप लागल्यावर त्याने माझ्या जर्कीनच्या आतील शर्टच्या खिशातील पैसे चोरले आणि तो दुसऱ्या डब्यात पळून गेला. दादर स्टेशनवर मी त्याला उतरताना पाहिले आणि मी त्याच्या पाठोपाठ इथपर्यंत बसमधून आलो. आता तो तिकडे त्या हॉटेलमध्ये एका साध्याभोळ्या मुलाला कसे फसवले म्हणून स्वतःची पाठ थोपटून घेत बसला आहे," हर्षवर्धनने एका दमात सर्व खुलासा केला.

"अरे, यार! हे तर खूप भारी आहे—अगदी सिनेमासारखे! आणि आता सांग, तू नेमके काय करणार आहेस?" तो मुलगा हर्षवर्धनची गोष्ट ऐकून भारावून गेला होता.

"पुढे काय करायचे, याची मला काहीच कल्पना नाही. सध्या मी फक्त त्याचा पाठलाग करत आहे," हर्षवर्धन म्हणाला.

"अरे, सोपं आहे, तू सरळ मंदिराजवळच्या पोलीसांना सांग. ते त्याला नक्की पकडतील," त्या मुलाने मार्ग सुचवला.

"नाही, माझी हिम्मत नाही. मी हातकणंगलेमध्ये एक नको ते धाडस केले होते—त्याचा परिणाम काही चांगला झाला नाही—मी तक्रार केली आणि त्यावर त्यांचा विश्वासच बसला नाही, तर मीच अडचणीत येईन. शिवाय तो चोर सही सलामत पळून जाईल. आतापर्यंत मी मावशीच्या घरी वेळेवर पोहोचलो नाही, म्हणून त्यांनी पोलीसांत तक्रार केली असेल, आणि जर मीच चोरीची तक्रार करायला गेलो तर त्याची दखल न घेता ते मला सरळ मावशीच्या घरी पोहोचवतील, म्हणजे मी माझे चोरीला गेलेले पैसे गमावून बसेन," हर्षवर्धन म्हणाला.

"आता मला तुझा प्रॉब्लेम व्यवस्थित समजला," तो नवखा मुलगा मृदू स्वरात म्हणाला.

"आणखी एक घोटाळा म्हणजे मला मावशीने छत्रपती शिवाजी महाराज स्टेशनवर उतरायला बजावले होते—पण मी त्या चोराच्या पाठोपाठ दादर स्टेशनवर उतरलो. एव्हाना माझी मावशी छत्रपती शिवाजी महाराज स्टेशनवर वाट पाहून कंटाळून गेली असणार आणि तिने मी मुंबईत पोहोचलो नाही, हे माझ्या आईला फोन करून सांगितले असेल, तर मग माझी आई काळजीत पडली

असेल. बिचारी आपले कामधाम सोडून मुंबईला यायला निघालीही असेल," हर्षवर्धन म्हणाला.

हे ऐकल्यावर रिक्षाचा हॉर्न वाजवणारा मुलगा विचारात पडला. मग तो म्हणाला, "मला तरी यात जबरदस्त थ्रिल वाटत आहे—खरोखरच तू एक मोठे धाडसाचे काम करत आहेस. आणि, मित्रा, जर तुझी काही हरकत नसेल, तर मी तुझ्यासोबत आहे."

"तुझी मदत मला मिळाली तर ते नक्की खूपच चांगले होईल. कारण मी मुंबईत नवखा आहे. तू इथलाच असल्याने मला मदत होईल. मी तुझे उपकार कधीच विसरणार नाही," हर्षवर्धन भारावून म्हणाला.

"अरे बस्स, आता पुरे कर! आपण आपली मोहीम फत्ते झाल्यावर आभार प्रदर्शनाचा खास कार्यक्रम करू. सध्या आपण त्वरेने मात्र कामाला लागलेले बरे. मीसुद्धा चोराला पकडण्याच्या मोहिमेत सामील होणार आहे. माझे नाव जुनैद अन्सारी. मी जवळच राहतो. माझे बाबा स्क्रॅप मर्चंट आहेत. आमच्या दुकानातून मी रिक्षाचा हॉर्न मिळवला आहे," जुनैदने आपली माहिती दिली.

"माझे नाव हर्षवर्धन मोहिते आहे. बाकी सर्व माहिती मी तुला अगोदरच दिली आहेच," असे म्हणत हर्षवर्धनने हात पुढे केला. त्या दोघांनी हसत हस्तांदोलन केले.

"आपण आता आपल्या पुढच्या कामाला लागले पाहिजे. आपण इथे पहारा देत उभे राहिलो, तरी तो चोर आपल्याला चकमा देऊन कधी निघून जाईल हे आपल्याला कळणार देखील नाही. हर्षवर्धन, आता तुझ्याकडे थोडेफार तरी पैसे आहेत का? मुंबईत एखाद्याच्या मागावर राहायचे म्हणजे पैशांची गरज लागणार," जुनैद म्हणाला.

"नाही, माझ्याजवळचे एकूण एक पैसे त्या भामट्याने चोरले. आता स्टेशनवरून मी बसमधून त्याच्यामागे आलो, तेव्हा एका काकांनी माझे तिकीट काढले म्हणून निभावले, नाहीतर कंडक्टर मला बसमधून उतरायला सांगत होता."

जुनैद थोडा विचारात पडला. त्याने अशा खुबीने हॉर्न वाजवला की त्याचा आवाज फक्त हर्षवर्धनच्या कानी पडला.

"जुनैद, जशी आपल्याला पैशांची गरज आहे, तशीच आपल्यासाठी माणसांचीही गरज लागेल. जर तू तुझ्या काही मित्रांना मदतीला घेतलेस तर कसे होईल?" हर्षवर्धनने विचारले.

"अरे व्वा! तुझी ही कल्पना मात्र जबरदस्त आहे," जुनैद उत्साहाने ओरडला.

"मला फक्त हा हॉर्न वाजवत आमच्या वाडीतून धावत जायचे आहे, आणि आपला सगळा चमू लगेच गोळा होईल."

"मग ते काम झटपट कर आणि लवकर परत ये," हर्षवर्धनने त्याला बजावले, "नाहीतर तो तिकडे चोर पळून जाईल, आणि तसे झाले तर अर्थातच, मलासुद्धा त्याच्यामागे जावे लागेल. कदाचित तू परत येईपर्यंत मी इथे असेनच, असे सांगणे कठीण आहे," हर्षवर्धनने जुनैदला सगळी कल्पना दिली.

"तू म्हणतोस ते अगदी खरे आहे. मला इथल्या परिस्थितीची पूर्ण कल्पना आहे. मी तुझ्या अपेक्षेपेक्षा लवकर येईन हे नक्की! आणि तसेही, तो भामटा हॉटेलमध्ये आरामात खात बसला आहे. अगदी इथूनही लक्षात येतेय की त्याचे खाणे इतक्या लवकर आटोपणार नाही. आपण लवकरच भेटू. अरे यार, मी तर त्याला पकडण्यासाठी अगदी उतावीळ झालो आहे. एकूण या कामगिरीमध्ये एकदम धमाल होणार आहे," असे म्हणून जुनैद तेथून घाईघाईने निघून गेला.

अनपेक्षितपणे एक मित्र मिळाल्याने हर्षवर्धनला खूपच दिलासा मिळाला होता. जीवनात कधी दुर्दैव समोर उभे ठाकलेच, जसे हर्षवर्धनच्या बाबतीत सत्याप्पा तपकिरेच्या रूपाने ठाकले

होते, तर अशा कठीण वेळी मित्राचा आधार मिळणे ही खूप दिलासा देणारी गोष्ट असू शकते. अगदी त्याचप्रमाणे, अतिशय अल्प परिचयातही जुनैदने मैत्रीचा हात पुढे केलेला पाहून मुंबईसारख्या महानगरात एकाकी पडलेल्या हर्षवर्धनला आता मोठा धीर आला होता.

त्याने त्या भामट्यावरची नजर अजिबात हटवली नव्हती; त्याला आपल्या चोरीला गेलेल्या पैशांची चिंता लागून राहिली होती. याशिवाय त्याला अजून एक भीती सतावत होती—ती म्हणजे, जर तो भामटा जुनैद परत येण्याआधीच तिथून निघून गेला, तर जुनैदने आपल्या साथीदारांना घेऊन येण्याचा काहीच उपयोग झाला नसता आणि सगळी मेहनत व्यर्थ ठरली असती.

तसे पाहिले तर सत्याप्पा तपकिरे अजूनही हॉटेलमध्ये आरामात खात-पीत बसला होता; हे एकप्रकारे तो हर्षवर्धनवर उपकारच करत असल्यासारखे होते. हर्षवर्धन, जुनैद आणि त्याचे साथीदार मिळून आपल्याभोवती कोळ्याच्या जाळ्यासारखे कुशलतेने जाळे विणत आहेत, याची पुसटशी कल्पना जरी त्या चोराला आली असती, तर तो तिथून केव्हाच पसार झाला असता. नकळतच त्याच्यासाठी परिस्थिती अधिकाधिक बिकट होत चालली होती.

अवघ्या दहा मिनिटांत हर्षवर्धनला पुन्हा रिक्षाच्या हॉर्नचा आवाज ऐकू आला; यावेळी मात्र तो आवाज त्याला पहिल्यासारखा घाबरवणारा वाटला नाही. त्याने अपेक्षेने मागे वळून पाहिले, तर जुनैदच्या नेतृत्वाखाली जवळजवळ दहा-बारा शाळकरी मुले रस्त्यावरून दोन-दोनच्या रांगेत शिस्तीत येत असल्याचे त्याला दिसले.

सगळेजण हर्षवर्धनभोवती घोळका करून उभे राहिले. जुनैदने सर्वप्रथम मुलांना हर्षवर्धनची ओळख करून दिली आणि त्याच्यावर कोसळलेल्या संकटाची कल्पना दिली. ते ज्या ठिकाणी उभे होते, तिथून सत्याप्पा तपकिरे सहज दृष्टीक्षेपात येत होता.



(हर्षवर्धन आणि जुनैदची मित्रमंडळी)

जुनैद रेस्टॉरंटकडे इशारा करत म्हणाला, "मित्रांनो, तोच तो भामटा आहे, ज्याने आपल्या मित्राचे पैसे चोरले आहेत! त्याच्या डोक्यावरची चॉकलेटी रंगाची टोपी पक्की लक्षात ठेवा. आपल्याला कसेही करून त्याने लंपास केलेले पैसे परत मिळवायचे आहेत. आपण त्याला जराही नजरेआड करून चालणार नाही. तो जर आपल्या हातावर तुरी देऊन पसार झाला, तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या गुप्तचर विभागाचे प्रमुख—बहिर्जी नाईक यांचा आदर्श समोर ठेवलेल्या आपल्या 'बी. एन. ग्रुप'चे नाव खराब होईल! आतापर्यंत आपण बऱ्याच लहान-मोठ्या मोहिमा यशस्वीपणे पार पाडल्या आहेत, पण सध्या आपल्या खांद्यावर खूप मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. आपण सर्वांनी ही मोहीम फत्ते करण्याचा विडा उचलूया! तर बोला—'हर हर महादेव! छत्रपती शिवाजी महाराज की जय!'"

सर्व मुले एका सुरात ओरडली, 'हर हर महादेव! छत्रपती शिवाजी महाराज की जय!' पण आजूबाजूच्या रहदारीच्या आणि वाहनांच्या गोंगाटात मुलांचा तो आवेशाने भरलेला आवाज सहज लपून गेला.

"मित्रा, हेच का तुमचे बी. एन. ग्रुप, म्हणजे बहिर्जी नाईक ग्रुपचे शिलेदार?" हर्षवर्धनने विचारले.

"ही त्यातील निवडक मंडळी आहेत. उगीच लोकांचे लक्ष वेधायला नको म्हणून बाकीच्या सदस्यांना इथे बोलावले नाही. तुला सगळ्यांची थोडक्यात ओळख करून देतो.

हा माझा मामेभाऊ मोहसीन मुलाणी. तो सुट्टीत रत्नागिरीहून आला आहे. हा मोठा सायकलपटू आहे. त्याने जिल्हास्तरावर बक्षिसे मिळवली आहेत. आपल्याला त्याचा उपयोग होईल म्हणून तो मुद्दाम इथे आला आहे.

हा आमच्या ग्रुपचा मॉनिटर विवेक शहाणे. मी जरी या ग्रुपचा संस्थापक असलो, तरी तोच आपल्या मोहिमेची आखणी करेल आणि त्याप्रमाणे कामाची विभागणी करून एकेकाला जबाबदारी सोपवेल.

हा नील मुजुमदार. याच्याकडे पैशांची जबाबदारी आहे; हिशोबाचे सर्व काम तोच बघतो," जुनैद म्हणाला.

"आता बाकीच्या मुलांची मीच ओळख करून घेतो," हर्षवर्धन म्हणाला आणि त्याने स्वतःहून एकामागून एक सगळ्या सदस्यांची ओळख करून घेतली.

अखेरीस जुनैदने विवेकला, म्हणजे आपल्या मॉनिटरला, आता कामाला लागुया असे सुचवले.

"तर त्यासाठी सर्वप्रथम आपल्याला या मोहिमेसाठी पैशांची तजवीज करावी लागेल; कारण आता याक्षणी जर भामटा ही जागा सोडून दुसरीकडे जायला निघाला, तर त्याचा पाठलाग करायला आपल्याला टॅक्सीची मदत घ्यावी लागेल. सध्या तुमच्याकडे असलेले पैसे यासाठी जमा करावेत, अशी माझी सूचना आहे," विवेकने सुचवले.

ताबडतोब प्रत्येकाने आपल्या खिशातून पॉकेट-मनीतील पैसे काढले आणि नील मुजुमदारकडे जमा केले. एकूण पाचशे सत्तर रुपये जमा झाले.

त्यापैकी दोनशे रुपये हर्षवर्धनला आणि दोनशे रुपये विवेककडे देण्यात आले, तर उरलेले एकशे सत्तर रुपये जुनैदच्या ताब्यात देण्यात आले.

"खूप खूप धन्यवाद," हर्षवर्धन भारावून म्हणाला. "तो भामटा आपल्याला सापडल्याबरोबर मी तुमचे पैसे परत करीन. आता पुढे काय करायचे? आधी मला माझी सुटकेस आणि भाजीची पिशवी कुठेतरी ठेवावी लागेल. ते ओझे घेऊन त्या भामट्याच्या मागावर राहणे माझ्यासाठी कठीण आहे. मघाशी मी कसाबसा बसमधून इथे आलो."

"यावर आपले मॉनिटर काय म्हणतात ते पाहू," जुनैद म्हणाला.

विवेक त्या दोघांचे बोलणे ऐकतच होता. तो म्हणाला, "आपल्या सर्वांना अगोदर एक गोष्ट करायला हवी. ती म्हणजे हर्षवर्धन त्याच्या मावशीच्या घरी सुखरूप पोहोचला आहे, हे कळवायला हवे. तसे आपण फोनवरूनही ही गोष्ट करू शकतो, पण माझ्या मते कोणीतरी हर्षवर्धन सुखरूप असल्याची चिठ्ठी आणि त्याचे सामान थेट मावशीच्या घरी नेऊन पोहोचवायला हवे, म्हणजे त्यांची काळजी थोडी कमी होईल. आताशी सकाळी दहा वाजत आले आहेत. हर्षवर्धनची वाट पाहून तो हरवला असल्याची तक्रार त्यांनी पोलीसांत करण्यापूर्वीच त्यांना हर्षवर्धनच्या खुशालीची चिठ्ठी मिळायला हवी."

"तू अगदी बरोबर बोलत आहेस. मी लगेच चिठ्ठी लिहितो, पण माझे सामान आणि चिठ्ठी कोण नेऊन देईल?" हर्षवर्धनने विचारले.

"माझा भाऊ मोहसीन लगेच सायकलवरून जाऊन सामान पोहोचवून येईल, पण त्याला पत्ता शोधणे अवघड जाईल. बरं, तुझी मावशी कुठे राहते?" जुनैदने विचारले.

"भायखळा येथे. हा बघ तिचा पत्ता," असे म्हणत हर्षवर्धनने त्याला पत्ता लिहिलेला कागद दाखवला.

"हे अंतर काही फार दूर नाही. मोहसीनसोबत आपण चैतन्यला पाठवू. भाजीची पिशवी हँडलला अडकवता येईल आणि

सुटकेस धरून चैतन्य मोहसीनसोबत सायकलवर डबलसीट जाईल. हर्षवर्धन, तू लगेच मावशीला चिठ्ठी लिही. मात्र, त्यात चोरी झाल्याचा किंवा चोराला पकडण्याच्या आपल्या या प्रयत्नांचा उल्लेख अजिबात करू नकोस; नाहीतर त्या विनाकारण काळजी करत बसतील. एकदा आपली मोहीम फत्ते झाली की सर्व उलगडा करता येईल. तू चिठ्ठीत 'मी उद्या संध्याकाळपर्यंत घरी परतेन' असे लिहू शकतोस. तोपर्यंत नक्कीच यातून काहीतरी चांगला मार्ग निघेल, असे मला वाटते," जुनैद म्हणाला.

प्रिय मावशी,

मी कुठे आहे याबद्दल तुम्ही काळजी करत असाल. मी मुंबईतच आहे आणि सध्या एका अतिशय महत्त्वाच्या कामात गुंतलो आहे. त्यामुळे आज मी तिकडे येऊ शकत नाही. त्याबद्दल मला माफ करा.

आईने तुमच्यासाठी परसबागेतील भाजी पाठवली आहे. ती पिशवीही मी माझ्या मित्रांबरोबर पाठवत आहे.

माझी काळजी करू नका. मी अगदी सुखरूप आहे.

तुझा आज्ञाधारक भाचा,

हर्षवर्धन'

हर्षवर्धनने पत्राच्या दुसऱ्या बाजूला पत्ता लिहिला आणि मोहसीनच्या हातात देत म्हणाला, "पण मी कुठे आहे किंवा माझे पैसे चोरीला गेले आहेत, हे तू माझ्या मावशीला किंवा घरातल्या कोणालाही सांगू नकोस; नाहीतर सगळीच पंचाईत होईल."

चिठ्ठी आणि सामान घेऊन मोहसीन आणि चैतन्य सायकलवरून भायखळ्याला निघाले.

जुनैदने एक धाडसी बेत आखला. सरळ शेजारच्या रेस्टॉरंटमध्ये जाऊन त्या भामट्याचे निरीक्षण करायचे, असे त्याने ठरवले. तसेही बिचारा हर्षवर्धन सकाळपासून वणवण करत होता. त्याने चहाही घेतला नसावा, हे उघड होते. त्याने रेस्टॉरंटमधून चार कप चहा आणि इडलीचे पार्सल आणायचे ठरवले. आपल्या शत्रूचा अंदाज घेण्याचाही त्याचा बेत होता.

"पण जपून पाऊल टाका," मॉनिटर विवेक म्हणाला. "त्या चोराला कुणीतरी त्याच्या मागावर आहे, हे कळता कामा नये. तसे झाले, तर त्याला पकडणे अधिक कठीण होईल."

"मी काय तुला कुक्कुले बाळ आहे, असे वाटले का?" जुनैद थोडासा रागावून म्हणाला आणि तिथून निघून गेला.

थोड्याच वेळात जुनैद चहा आणि इडलीचे पार्सल घेऊन आला. त्याच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. तो भामटा हॉटेलमधील एका वेटरकडे जवळपास राहण्यासाठी एखादे चांगले हॉटेल आहे का, याची चौकशी करत होता. त्या वेटरने एक-दोन हॉटेल्सची नावे सांगितलेली त्याने ऐकली. म्हणजे तो भामटा लवकरच तिथून बाहेर पडण्याच्या तयारीत आहे, याची खात्री झाली.

सर्वांनी घाईघाईने इडली आणि चहाचा समाचार घेतला आणि पुढची रणनीती ठरवण्यासाठी तातडीची बैठक घेण्याचे ठरले. त्यासाठी हर्षवर्धन, विवेक आणि नील हे तिघे जवळच असलेल्या महादेव मंदिरात गेले. वृत्तपत्राच्या दुकानाजवळ गोळा झालेली मुलांची गर्दी उगाचच लोकांचे लक्ष वेधून घेण्याची शक्यता होती.

दरम्यान, जुनैद आणि काही मोजकी मुले वृत्तपत्राच्या दुकानाजवळ थांबून त्या भामट्यावरची टेहळणी चालूच ठेवणार होती.

प्रकरण 10: भामट्याच्या मागावर

महादेव मंदिरात महत्त्वाच्या गोष्टींवर हर्षवर्धन, विवेक आणि नील यांची खलबते सुरू होती. जुनैदने आणलेल्या बातमीनुसार, जवळपासच्या एखाद्या हॉटेलवर भामट्याचा मुक्काम करण्याचा बेत दिसत होता. त्यानुसार कोणकोणती संभाव्य हॉटेल्स असू शकतील, याचा ते आढावा घेण्याचा प्रयत्न करत होते. पण नंतर तसा अंदाज करणे अशक्य असल्याची त्यांना जाणीव झाली. शेवटी, 'वेळ येईल तेव्हा योग्य तो निर्णय घेता येईल,' या विचारावर सर्वांचे एकमत झाले.

दुसरी गोष्ट म्हणजे, जरी भामटा ज्या हॉटेलमध्ये राहणार होता त्याची माहिती मिळाली, तरी खरा प्रश्न वेगळाच होता. जर त्याने वेळीअवेळी हॉटेलमधील खोली सोडली आणि तो दुसरीकडे कुठे निघून गेला, तर मग त्याला त्या महानगरात शोधणे म्हणजे वाळूत हरवलेली सुई शोधण्यासारखे झाले असते. त्यावर एकमेव

उपाय म्हणजे, रात्रीसुद्धा आळीपाळीने हॉटेलच्या बाहेर पडण्याच्या मार्गांवर पाळत ठेवण्याची गरज होती.

त्यासाठी कमीत कमी पाच-सहा मुलांना रात्रभर बाहेर राहण्यासाठी घरून परवानगी घ्यावी लागणार होती; आणि अशी परवानगी मिळवणे सोपी गोष्ट नव्हती.

इतक्यात जुनैदने त्यांना तातडीने बोलवण्यासाठी सॅम परेराला पाठवले. सॅम धापा टाकतच तिथे आला आणि लगेचच ते चौघेही वर्तमानपत्राच्या दुकानाकडे धावत निघाले. लांबून त्यांना पाहिल्यावर जुनैदने त्यांना थांबण्याचा इशारा केला आणि तो स्वतः त्यांच्याकडे निघाला.

"जुनैद, काही गोंधळ झाला आहे का?" हर्षवर्धनने विचारले. धावत आल्यामुळे तो धापा टाकत होता.

"तू वेडा झाला आहेस का, यार? मी जे काही करतो ते व्यवस्थितच करतो," जुनैद म्हणाला.

"तू इकडे आलास आणि तो भामटा तिथून निसटला तर?" नीलने विचारले.

"आता मला प्रश्न विचारू नका. माझे त्याच्यावर व्यवस्थित लक्ष आहे. तो रेस्टॉरंटच्या बाहेर आला आहे आणि सध्या रस्त्यावर टॅक्सी थांबवण्यासाठी हात दाखवत आहे. अजून एकही टॅक्सी

थांबलेली नाही; त्यामुळे त्याला जवळच्या टॅक्सी स्टँडकडेच जावे लागेल. आणि तो स्टँड आपण जिथे उभे आहोत, तिथून जवळच आहे. हे काय, माझा अंदाज खरा ठरला! तो इकडेच येत आहे. त्याला आपल्या पुढे जाऊ द्या. आपण सगळे त्याच्या मागे हळूच जाऊ. त्याने टॅक्सी केली की, आपणही टॅक्सीमधून त्याचा पाठलाग करू. आणि हो, हर्षवर्धन, तू आमच्या घोळक्यात जर्किनची टोपी कपाळावर ओढून घेऊन पटकन कोणाला चेहरा दिसणार नाही अशा बेताने चालत राहा. त्याने जर तुला पाहिले, तर तो सावध होईल," जुनैद म्हणाला.

"सावधान! सगळ्यांनी इकडे लक्ष द्या! तो भामटा अगदी जवळ येत आहे. मी आता एका बाजूला सरकतो," हर्षवर्धन सावध आवाजात म्हणाला.

चॉकलेटी रंगाची टोपी घातलेला तो माणूस, येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांवर सावधपणे नजर टाकत मागून येत होता. क्षणभरातच त्याने मुलांच्या घोळक्याला मागे टाकले आणि टॅक्सी स्टँडवर रांगेत उभ्या असलेल्या एका टॅक्सीत तो बसला. तोपर्यंत जुनैदने त्याने टॅक्सीवाल्याला 'लालबाग मार्केट' असे सांगितलेले ऐकले होते. त्याची टॅक्सी सुटली आणि मुलांची चौकडीही मागच्या टॅक्सीत बसली.

"काका, आम्हाला लालबाग मार्केटला जायचे आहे. ती समोरची MH-03-BX-2146 नंबरची टॅक्सी जे चालली आहे ना, तिच्या मागोमाग आपली टॅक्सी घ्या. आम्हालाही त्याच ठिकाणी जायचे आहे."

(पाठलाग सुरू)

टॅक्सीवाल्या काकांना त्या चुणचुणीत मुलांच्या चौकडीचे मोठे कौतुक वाटले आणि त्यांनी टॅक्सीचा स्पीड वाढवला.

"अहो काका, आपल्याला त्या टॅक्सीच्या मागे जायचे आहे, तिच्या पुढे नाही!" जुनैदने आठवण करून दिली.

आता मुले बसलेली टॅक्सी, त्या दुसऱ्या टॅक्सीच्या मागे सुरक्षित अंतर ठेवून पुढे जाऊ लागली.

"तुम्हा मुलांचे नेमके काय चालले आहे, ते मला समजेल का?" टॅक्सीवाल्या काकांनी उत्सुकतेने विचारले.

"काका, त्या समोरच्या टॅक्सीतील माणसाने आमच्या मित्राशी नाहक पंगा घेतला आहे. त्याला चांगलाच धडा शिकवायचा आमचा बेत आहे. पण काका, हे बोलणे फक्त आपल्यातच राहू दे," जुनैदने खुलासा केला.

"लहान मुलांशी पंगा घेणारा तो माणूस भलताच चलाख दिसतोय. तुम्ही सावध राहा. मी तर म्हणतो, तुम्ही तुमच्या घरातल्या मोठ्या माणसांना याची कल्पना द्यायला हवी. पण तुमच्याकडे टॅक्सीच्या भाड्यापुरते पैसे आहेत ना?" टॅक्सीवाले काका म्हणाले.

"हो काका, तुम्ही काळजी करू नका. आमच्याकडे टॅक्सीच्या भाड्याचे पैसे आहेत," नील म्हणाला.

"बाळांनो, मी टॅक्सीच्या भाड्याची काळजी करत नाहीये; मी तुमची काळजी करत आहे. तुम्हाला तिथे पोहोचवण्याव्यतिरिक्त माझ्याकडून इतर काही मदत हवी असेल,

तर खुशाल सांगा. माझी मुलेसुद्धा तुमच्याच वयाची आहेत," काका काळजीयुक्त स्वरात म्हणाले.

"काका, तुम्ही आमची बिलकुल काळजी करू नका. तशी वेळ आलीच, तर आम्ही सरळ पोलीसांकडे जाऊ. सध्या आम्हाला फक्त त्या माणसाची थोडी माहिती मिळवायची आहे, जेणेकरून आम्हाला आमची बाजू मांडता येईल. सध्या आम्हाला केवळ एवढेच करायचे आहे," विवेकने सांगितले.

पुढे एका सिग्नलवर ती समोरची MH-03-BX-2146 नंबरची टॅक्सी थांबली. तो भामटा टॅक्सीतून बाहेर डोकावून पाहू लागला. तसे पाहता, मागच्या टॅक्सीत कपाळावर टोपी ओढून बसलेल्या हर्षवर्धनवर त्याची नजर पडणे अशक्यच होते; तरीही उगाच संशयाला वाव मिळू नये म्हणून हर्षवर्धनने प्रसंगावधान राखत पटकन मान खाली झुकवली. टॅक्सीवाल्या काकांनी आरशातून हे पाहिले आणि हर्षवर्धनची ती चपळाई पाहून त्यांना त्याचे मनोमन कौतुक वाटले.

समोरची टॅक्सी आता लालबाग मार्केटच्या दिशेने निघाली होती. थोड्याच वेळात ती टॅक्सी लालबाग मार्केटच्या मागील एका लहानशा गल्लीत वळली आणि एका चार मजली इमारतीपुढे थांबली. ते पाहून जुनैदने टॅक्सीवाल्या काकांना सुरक्षित अंतरावर त्यांची टॅक्सीवाल्या काकांना थांबवण्यास सांगितले.नीलने भाडे

दिले आणि त्यांचे आभार मानले. ते ज्या ठिकाणी उभे होते, तेथून त्या इमारतीवरील 'हॉटेल सुखसागर' अशी पाटी स्पष्ट दिसत होती. समोरच्या टॅक्सीतून उतरलेला भामटा हॉटेलमध्ये शिरला होता आणि रिसेप्शन काउंटरवर चौकशी करत होता.

टॅक्सीवाले काका एव्हाना मुलांच्या साहसी मोहिमेत मनाने सहभागी झाले होते. त्यांनी मुलांना सुचवले, "मी स्वतः आत रिसेप्शन काउंटरवर जाऊन चौकशी करण्याच्या बहाण्याने काही माहिती मिळते का ते पाहतो." त्यांची सूचना मुलांना पसंत पडली. त्याप्रमाणे टॅक्सीवाले काका हॉटेलमध्ये गेले.

आत गेल्यावर त्यांना तो भामटा तिथे खोली बुक करण्यासाठी ॲडव्हान्सची रक्कम कॅश काउंटरवर जमा करताना दिसला.

"बाहेर एक गिऱ्हाईक थांबले आहे. त्यांना दोन खोल्या हव्या आहेत. आपल्याकडे मिळू शकतील का?" टॅक्सीवाले काकांनी रिसेप्शनवर विचारले.

"सॉरी, बुकिंग फुल्ल आहे. आताच शेवटची उरलेली खोली या गृहस्थांनी बुक केली," रिसेप्शन काउंटरवरील माणूस म्हणाला. त्याने लगेच हॉटेलच्या नोकराला हाक मारून नव्याने आलेल्या गिऱ्हाईकचे सामान रूम नंबर 201 मध्ये ठेवायला सांगितले. त्याप्रमाणे तो पोऱ्या सामान घेऊन लिफ्टमधून वर निघून गेला.

टॅक्सीवाल्या काकांनी सावध नजरेने एकदा कॅश काउंटरजवळ उभ्या असलेल्या भामट्याकडे पाहिले आणि नंतर ते तिथून बाहेर पडले.

टॅक्सीजवळ हर्षवर्धन आणि विवेक त्यांचीच वाट पाहत उभे होते.

"काका, आतमध्ये काय झाले?" हर्षवर्धनने विचारले.

"त्या भामट्याने खोली बुक केली आहे, रूम नंबर 201. माझ्या अंदाजाप्रमाणे ती खोली याच रस्त्याच्या बाजूला येत असावी. तुम्ही जरा निरखून पाहिले तर दुसऱ्या मजल्यावरच्या सर्वात पहिल्या खिडकीचा दरवाजा उघडा दिसतोय आणि तिथे एक माणूस सिगारेट ओढत उभा आहे. माझ्या मते, तुम्ही ज्या व्यक्तीच्या मागावर आहात, हा तोच माणूस असावा. बरे, तुमच्या चौकडीतील उरलेले दोघे कुठे गेले?" सदाकाकांनी विचारले.

"थँक्यू काका, तुमची आम्हाला खूप मोठी मदत झाली. उरलेले दोघे हॉटेलच्या इमारतीची पाहणी करण्यासाठी मागच्या गल्लीत गेले आहेत. कदाचित तिथून बाहेर पडण्याचा दुसरा मार्ग असेल, तर आम्हाला दोन्ही बाजूंवर नजर ठेवावी लागेल," विवेक म्हणाला.

"त्याची काहीच गरज नाही, मागच्या बाजूने बाहेर पडण्यासाठी दुसरा कोणताही मार्ग नाही," जुनैद मागून येत म्हणाला. त्याने विवेकचे बोलणे ऐकले होते.

आता चौघेही आपापसात काहीतरी चर्चा करत होते आणि टॅक्सीवाले काका तिथून जाण्यासाठी निघाले होते. तेवढ्यात हर्षवर्धन म्हणाला, "काका, तुम्हाला आमचे नेमके काय चालले आहे, असा प्रश्न पडला असणार; म्हणूनच आम्ही तुम्हाला सर्व काही सांगायचे ठरवले आहे." असे म्हणून त्याने सुरुवातीपासून घडलेली सर्व हकीकत काकांना सांगितली.

ते ऐकून जाण्यासाठी निघालेले काका पुन्हा थांबले. ते म्हणाले, "तुम्ही स्वतःहून सर्व माहिती दिली, याचा मला आनंद झाला. पण पोरांनो, एक गोष्ट नीट लक्षात ठेवा. जरी तुम्ही हुशार आणि हजरजबाबी असलात, तरी वयाने अजून खूप लहान आहात. तुम्ही थेट गुप्तहेर बनून चोराला पकडायला निघाला आहात, पण तो नेमका कोण आहे, याची तुम्हाला काहीच कल्पना नाही. कदाचित तो एखादा अट्टल गुन्हेगारही असू शकतो. तुम्ही जरी त्याला पकडण्यात यशस्वी झालात, तरी तो शेवटच्या क्षणी काहीही दगाफटका करू शकतो. माझे तर तुम्हाला असे सांगणे आहे की, तुम्ही घरातल्या मोठ्या मंडळींना या गोष्टीची कल्पना द्यावी आणि पुढचे सर्व त्यांच्यावर सोपवावे."

"काका, आम्ही जरी लहान असलो तरी आम्हालाही माणसांची थोडीफार पारख आहे; म्हणूनच तर आम्ही तुम्हाला सर्व सांगितले. तुम्ही आम्हाला लहान म्हणत आहात, पण मला सांगा काका, शिवरायांनी जेव्हा स्वराज्याचा पाया घातला, तेव्हा तेही आमच्याच वयाचे होते ना? आम्ही शिवरायांचे मावळे आहोत, आम्ही त्या भामट्याला योग्य तो धडा शिकवूच! काका, तुम्ही काळजी करू नका. ज्या क्षणी आम्हाला वाटेल की परिस्थिती हाताबाहेर चालली आहे, त्याच क्षणी आम्ही पोलीसांची मदत नक्की घेऊ," हर्षवर्धन ठामपणे म्हणाला.

"मुलांनो, ठीक आहे. मी तुम्हाला उद्या दुपारी बारा वाजेपर्यंतची मुदत देतो. त्यानंतर मात्र मी जे सांगेन, ते तुम्हाला ऐकावेच लागेल. आता मी निघतो. हा घ्या माझा मोबाईल नंबर, तुम्हाला अगदी मध्यरात्री जरी गरज लागली, तरी मला हक्काने फोन करा," टॅक्सीवाले काका म्हणाले. त्यांनी आपले नाव 'सदानंद जाधव' आणि फोन नंबर 8447072123 सांगितला. विवेकने तो आपल्या डायरीमध्ये लिहून घेतला. त्यानंतर मुलांनी त्यांना 'सदाकाका' या नावानेच हाक मारण्याचे ठरवले.

तेवढ्यात सदाकाकांना दुसरे भाडे मिळाले आणि ते मुलांचा निरोप घेऊन तिथून निघून गेले.

तो भामटा आजची रात्र तरी हॉटेल सुखसागर सोडून जाणार नाही, या विचाराने मुलांना थोडे हायसे वाटले. हॉटेलसमोर एक टपरीवजा वाचनालय होते. तिथे बसायला दोन बाक होते आणि त्यावर दोन-तीन वर्तमानपत्रे ठेवलेली होती. यावेळी वाचनालयात इतर कोणीही व्यक्ती नव्हती. त्यामुळे मुले डोळ्यांसमोर पेपर धरून पुढची खलबते करण्यात गुंग होऊन गेली.

सर्वप्रथम इतर मुलांना ते चौघे कुठे आहेत आणि आतापर्यंत काय झाले, याची माहिती देणे आवश्यक होते. दुसरे म्हणजे, आतापर्यंत मोहसीन आणि चैतन्य हर्षवर्धनच्या मावशीच्या घरी जाऊन परतले असतील, त्यामुळे तिथला समाचार मिळवणे गरजेचे होते. एकमेकांशी संपर्कासाठी निदान दोन-तीन मोबाईल फोनची आवश्यकता होती.

त्यांनी रात्री आळीपाळीने पहारा देण्याचे ठरवले होते. त्यासाठी घरून परवानगी मिळवण्याची आवश्यकता होती. विवेकच्या डोक्यात एक भन्नाट आयडिया सुचली.

"अरे, आपण नुकताच भारतमाता सिनेमागृहात लागलेल्या 'राजा शिवाजी' सिनेमासाठी परवानगी मागितली, तर कदाचित आपल्याला घरून परवानगी मिळेल, असे मला वाटते," विवेक म्हणाला.

"पण रात्री उशिरा का जाणार, असे विचारले तर काय कारण सांगायचे?" नीलने प्रश्न केला.

"सोपं आहे. खरोखरच आज सिनेमाचा शेवटचा दिवस आहे, म्हणून आजच सिनेमा पाहायला हवा, असे आपण म्हणू शकतो. पण बारानंतर घरी न परतण्यासाठी अजून एक कारण शोधावे लागेल," जुनैद म्हणाला.

आता सर्व मुले विचारात पडली. पुन्हा एकदा विवेकने एक नामी शक्कल लढवली.

"आज रात्रीच्या रेल्वेने चैतन्यचे आईबाबा पुण्याला एका महत्त्वाच्या कामासाठी जाणार आहेत, असे सांगितले तर कदाचित घरात विश्वास बसेल. रात्रीच्या बारानंतर आपापल्या घरी जाण्यापेक्षा आपण त्याच्या सोबतीला त्याच्या घरी थांबावे, असे त्याच्या आईबाबांनी सुचवले आहे, असे सांगून पाहू. मात्र एका गोष्टीची काळजी घ्यावी लागेल, ती म्हणजे, आपल्याला सगळ्यांना घरी एकच गोष्ट सांगायला हवी," विवेक म्हणाला.

"आता हर्षवर्धनसोबत विवेक इथे थांबेल. मी आणि नील बसने प्रभादेवीच्या बसस्टॉपवर जातो. मोहसीन आणि चैतन्य आतापर्यंत परत आले असतील. त्यांना नुकत्याच झालेल्या घडामोडी सांगायला हव्यात शिवाय कुणाकुणाला घरून रात्री राहण्याची परवानगी मिळते आणि दादाचा किंवा ताईचा मोबाईल

मिळतो का, हेही बघणे आवश्यक आहे. आपण एक गोष्ट कटाक्षाने पाळली पाहिजे, ती म्हणजे घरातील मोबाईल परवानगीशिवाय घ्यायचा नाही. एका चांगल्या कामासाठी खोटे बोलून आपण आज रात्रभर बाहेर राहण्याची योजना ठरवली आहे; परंतु उद्या खरे कारण सांगून आईबाबांची माफी मागायला हवी. कदाचित रात्री बाहेर राहण्याची परवानगी मिळाली, तर आपले आईबाबा स्वतःच मोबाईल घेऊन बरोबर घेऊन जाण्यास सांगतील," जुनैद म्हणाला.

तेवढ्यात सिद्धिविनायक मंदिराला जाणारी बस येत असल्याचे दिसले आणि जुनैद आणि नील बसस्टॉपच्या दिशेने पळाले.

प्रकरण 11: अनपेक्षित मदत

जुनैद आणि नील बसस्टॉपवर उतरले आणि वृत्तपत्राच्या दुकानाजवळ पोहोचले, तेव्हा त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. तिथे मोहसीन आणि चैतन्यसोबत एक पंधरा-सोळा वर्षांची मुलगी इलेक्ट्रिक स्कूटरजवळ उभी होती.



(मोहसीन आणि चैतन्यसोबत मयुरी हर्षवर्धनला भेटायला आली)

जुनैदने हर्षवर्धनच्या मावशीच्या घरी काय झाले आणि त्यांच्यासोबत असलेली मुलगी कोण, याची मोहसीनकडे चौकशी केली. मोहसीन काही बोलण्यापूर्वीच ती मुलगी आपला हात पुढे करत म्हणाली, "मी मयुरी, हर्षवर्धनची मावस बहीण. मला वाटते, तुझे नाव जुनैद असावे," जुनैदने मयुरीचा हात हातात घेतला आणि म्हणाला, "अगदी बरोबर, पण तू इथे काय करत आहेस?"

"मोहसीन आणि चैतन्यने सांगितलेली हकीकत ऐकून माझ्या आई आणि आजीचा जीव भांड्यात पडला. माझे बाबा हर्षवर्धनच्या चौकशीसाठी बाहेर पडतच होते. त्याच वेळी हे दोघे हर्षवर्धनचे पत्र आणि सामान घेऊन आले, म्हणून पोलीसांत हर्षवर्धन हरवल्याची तक्रार करण्यात आली नाही. पण माझे मात्र पूर्ण समाधान झाले नव्हते. म्हणून 'मी स्वतः हर्षवर्धनला भेटून येते,' असे म्हटल्यावर आई-बाबांनी मला परवानगी दिली.

खरेतर आई रिक्षाने इकडे यायला निघाली होती, पण मीच तिला नको म्हणाले. वाटेत मोहसीन आणि चैतन्यने मला सर्व गोष्टींची कल्पना दिली आहे. आता तिकडे काय झाले, ते तू मला सांग. त्यानंतर पुढे काय करायचे ते आपण ठरवू. आता मीसुद्धा तुमच्या बी. एन. ग्रुपची सदस्य झाले आहे," मयुरी हसत म्हणाली.

जुनैदने लालबाग मार्केटला रिक्षामधून निघाल्यापासून घडलेल्या प्रत्येक गोष्टीची माहिती मयुरीला दिली. रिक्षावाले

सदानंद काकांची माहिती करून देण्यास तो विसरला नाही. आता ज्यांना ज्यांना शक्य असेल त्यांनी घरून रात्रभर बाहेर राहण्याची परवानगी मिळवण्याचे मोठे काम शिल्लक राहिले होते. मयुरीने हर्षवर्धनला भेटण्यासाठी लालबाग मार्केटकडे जाण्याचे ठरवले, बाकी सर्वजण आपापल्या घरी निघाले. मयुरी एकटीच लालबागला निघाली आणि वाटेत ती रात्रीच्या कामगिरीविषयी विचार करत होती.

मयुरी 'हॉटेल सुखसागर'समोरील वृत्तपत्र वाचनालयाच्या टपरीजवळ आली. तिथे हर्षवर्धन आणि विवेक एका बाकावर बसले होते. मयुरीने हॉर्न वाजवला आणि वाचनालयाच्या दारात आपली स्कूटर थांबवली. तिच्या स्कूटरचा हॉर्न ऐकून हर्षवर्धनने चमकून तिकडे पाहिले. मयुरीला पाहून तो खूपच आनंदित झाला. मयुरी त्यांच्याजवळ आली. हर्षवर्धनने विवेकला मयुरीची ओळख करून दिली. सुरुवातीच्या थोड्या खुशालीच्या गप्पा झाल्यावर त्या तिघांचा रात्रीच्या कामगिरीवर खल सुरू झाला.

अचानक मयुरीला तिच्या मैत्रिणीची—वैष्णवीची आठवण झाली. ती त्याच भागात राहत होती. मयुरी हर्षवर्धनबरोबर तिच्या घरी जाण्यासाठी निघाली. अचानक तिला आलेले पाहून वैष्णवीला खूप आनंद झाला. मयुरीने तिला हर्षवर्धनची ओळख

करून दिली आणि प्रवासात त्याच्यावर काय प्रसंग ओढवला आहे, याची माहिती हलक्या आवाजात दिली.

"मयुरी, तू कोणते हॉटेल म्हणालीस? मला पुन्हा एकदा नाव सांग," वैष्णवीने विचारले.

"अगं, इथून साधारण शंभर-दीडशे मीटर अंतरावर हॉटेल सुखसागर आहे ना, त्यात तो भामटा सत्याप्पा तपकिरे उतरला आहे."

"काय म्हणतेस? हॉटेल सुखसागर? मग तुमचे काम झालेच म्हणून समजा. आमच्या शेजारच्या खोलीतील मल्हारदादा तिथे सुरक्षारक्षक म्हणून कामाला आहे. बहुतेक वेळा त्याची रात्रपाळी असते.

मंगला काकू म्हणजे त्याची आई माझ्या आईची मैत्रीण आहे. गेल्या आठवड्यात त्या चिपळूणला त्यांच्या मुलीकडे तिच्या बाळंतपणासाठी गेल्या आहेत. एरव्ही ते दोघेच इथे राहतात. अगोदर त्याचे बाबा तिथे सुरक्षारक्षक म्हणून कामाला होते. ते करोनाकाळात वारले, तेव्हापासून मल्हारदादा तिथे सुरक्षारक्षक म्हणून कामाला लागला. सकाळी तो कॉलेजला जातो आणि रात्रीची ही ड्युटी करतो. सध्या तो कोल्हापूरला होणाऱ्या पोलीस भरतीसाठी तयारी करत आहे. आता तो घरीच असेल. मंगला काकू गावी गेल्याने तो जेवायला आमच्याकडेच असतो. सकाळी

इथून जेवून जातो, रात्रीचे जेवण हॉटेलमध्ये त्याला मिळते," वैष्णवी म्हणाली.

"खरोखरच ही एक चांगली गोष्ट झाली. चल, आपण तुझ्या दादाला लगेच भेटायला जाऊ या," मयुरी म्हणाली.

"अरे हर्षवर्धन, तू कोल्हापूरलाच असतोस का? तुमच्या ओळखीत पोलीस खात्यातील कोणी आहेत का? असतील तर सांग. तेवढेच मल्हारदादाला थोडेफार मार्गदर्शन मिळेल," वैष्णवीने विचारले.

'पोलीस खाते' हे शब्द ऐकल्यावर हर्षवर्धनच्या डोळ्यांसमोर 'कैरी प्रकरण' आणि इन्स्पेक्टर प्रधान उभे राहिले. त्याने एक आवंढा गिळला आणि म्हणाला, "मी कोल्हापूर शहरात राहत नाही. तिथून जवळच असलेल्या एका छोट्या गावात राहतो. आमच्या ओळखीचे कोणी पोलीस खात्यात नाहीत; पण मल्हारदादा कोल्हापूरला आल्यावर आमच्या घरी राहू शकतो. कारण आमचे गाव कोल्हापूर शहरापासून फक्त तीस किलोमीटर अंतरावर आहे.

तेवढ्यात वैष्णवीची आई गिरणीतून पिठाचा डबा घेऊन आली. मयुरीला पाहून त्या म्हणाल्या, "अरे व्वा! मयुरी का? बऱ्याच दिवसांनी आली आहेस. आणि तुझ्याबरोबर हा मुलगा कोण आला आहे?"

"काकू, हा हर्षवर्धन, माझा मावस भाऊ. कोल्हापूर जवळच्या हातकणंगले गावात असतो. सुट्टीला आमच्याकडे आला आहे," मयुरी म्हणाली.

"अगं आई, आम्ही जरा मल्हारदादाकडे जाऊन येतो. आता हर्षवर्धनशी बोलल्यावर समजले की तो कोल्हापूरहून आला आहे. पुढच्या महिन्यात मल्हारदादा पोलीस भरतीसाठी कोल्हापूरला जाणार आहे ना, म्हणून त्याची आणि हर्षवर्धनची ओळख करून देते—कोणीतरी ओळखीचे असले तर बरे," वैष्णवी म्हणाली.

"ठीक आहे, पण तिकडून परस्पर त्यांना जाऊ देऊ नकोस. पावभाजीची सगळी तयारी झालेली आहे. तुम्ही जाऊन या आणि मग इकडे पावभाजी खायला या, किंवा मल्हारलाच इकडे बोलावून घेतेस? त्यालाही पावभाजी खायला बोलवायचेच आहे," वैष्णवीची आई म्हणाली.

"नको, नको, आम्ही लगेच तिकडे जाऊन मल्हारदादाला भेटतो आणि मगच इकडे पावभाजी खायला येतो. मयुरीला लवकर परत जायचे आहे," वैष्णवी म्हणाली आणि ते तिघेही दोन खोल्या पलीकडे असलेल्या मल्हारदादाच्या खोलीवर गेले.

वैष्णवीने मल्हारदादाला मयुरी आणि हर्षवर्धनची ओळख करून दिली आणि त्या क्षणापर्यंत घडलेल्या घटनांची माहिती सांगितली. मल्हार थोडा वेळ विचारात पडला आणि म्हणाला,

"माझ्या मते, तुम्हाला त्या भामट्यावर प्रत्यक्षात रात्रभर नजर ठेवण्याची गरज नाही, कारण मीच तिथे सुरक्षारक्षक म्हणून तैनात आहे. रात्रीच्या वेळी तो भामटा गडबड करण्याची तशी शक्यता कमीच आहे, पण आपण सर्व शक्यता पडताळून पाहायला हव्यात. तो तिथून माझी नजर चुकवून बाहेर पडू शकणार नाही, हे जरी खरे असले तरी मी त्याला तसे करताना अडवू शकणार नाही. त्याच्याविरुद्ध आपल्याकडे प्रत्यक्षात काहीही पुरावे नाहीत.

आपण एक गोष्ट मात्र करू शकतो. तुमच्यापैकी कोणाकोणाकडे मोबाईल फोन आहे? रात्री-अपरात्री जर तो बाहेर पडत असेल, तर मी तुम्हाला फोन करून सावध करेन. आजची रात्र तुम्ही आमच्या खोलीत झोपू शकता. पण खरोखरच असे झाले, तर मुख्य अडचण पुढेच आहे. तुम्ही लहान मुले त्याचा फक्त पाठलाग करून काय साध्य करणार? समजा तुम्ही पोलीसांकडे गेलात, तरी तुमच्याकडे त्याच्याविरुद्ध कोणताही पुरावा नाही," मल्हारदादाचे बोलणे बिनतोड होते.

त्या तिघांचे उतरलेले चेहरे पाहून मल्हारला वाईट वाटले. तो पुढे म्हणाला, "असे निराश होऊ नका. तुमच्याकडे पुरावा नाही, याचा अर्थ त्या भामट्याने चोरी केलीच नाही, असे होत नाही. आजची रात्र मी हॉटेलवर असेनच; त्याने काही गडबड केली, तर तुम्हाला फोन करून सावध करेन. पुढचे पुढे पाहू, उद्या काहीतरी

मार्ग निघेल. माझी ड्युटी रात्री साडेआठ ते सकाळी साडेआठ अशी आहे. मी ड्युटीवर हजर होईपर्यंत तुम्ही आळीपाळीने त्याच्याकडे लक्ष ठेवा आणि त्यानंतर माझ्या खोलीवर रात्रभर गप्पागोष्टी करत बसलात तरी चालेल. बरं, मला एक सांगा, आज रात्री तुमच्यापैकी कोणाला बाहेर राहण्याची परवानगी मिळण्याची शक्यता आहे?"

"विवेकच्या मते, जुनैद, मोहसीन आणि नीलला परवानगी मिळू शकेल. त्याला स्वतःलाही परवानगी मिळण्यास काही अडचण येणार नाही, असा त्याचा अंदाज आहे. म्हणजे, आम्ही एकूण पाच मुले आज रात्री तुमच्या खोलीवर असणार आहोत. आम्ही इथे थांबलो, तर तुम्हाला काही गैरसोय होणार नाही ना?" हर्षवर्धनने विचारले.

"छे, छे! त्यात त्रास कसला? फक्त तुमचा आवाज बाहेर जाणार नाही याची काळजी घ्या आणि ही गोष्ट अगदी गुप्त ठेवा— अगदी वैष्णवी व्यतिरिक्त तिच्या घरातील कोणालाही तुम्ही रात्री इथे थांबणार असल्याचे कळता कामा नये; नाही तर ही गोष्ट आमच्या चाळीतील सर्वांपर्यंत पोहोचेल," मल्हार म्हणाला.

"ठीक आहे, दादा. आता आम्ही निघतो. हे दोघे लगेच निघणार होते, पण आईने त्यांना पावभाजी खाण्याचा आग्रह केला

आहे. पावभाजी खाऊन ते लगेच निघतील. तुलाही आईने पावभाजी खाण्यासाठी बोलावले आहे," वैष्णवी म्हणाली.

"ठीक आहे तर, हर्षवर्धन हा माझा फोन नंबर तुझ्याकडे असू दे. तुमच्याकडे मोबाईल आला की प्रत्येकाचे नाव आणि नंबर मला व्हॉट्सॲपवर मेसेज करून सांगा. मी आठच्या सुमारास हॉटेलकडे येईन, तेव्हा खोलीची चावी तुम्हाला देईन. आज रात्री तुम्ही इथेच मुक्काम करा आणि सकाळी मात्र लवकर हॉटेलसमोरील टपरीवर या. मी तिकडे तुमच्याकडून चावी परत घेईन. त्या वाचनालयात फारसे कोणी फिरकत नाही, मी मात्र सकाळी पेपर वाचल्याशिवाय तेथून घरी येत नाही. अलीकडे जो तो मोबाईलमध्येच गुंग असतो, त्यामुळे वृत्तपत्र वाचायला तिथे फारसे कोणी येत नाही. एखादे आजोबा सावकाश दहा-अकराच्या सुमारास तिथे वृत्तपत्र वाचायला येतात. त्यातून अजून काही मार्ग निघतो का, याचा मी विचार करून बघतो," मल्हार म्हणाला.

मल्हारचा निरोप घेऊन ते तिघेही वैष्णवीच्या घरी गेले. वैष्णवीच्या आईने आग्रह करून त्यांना पावभाजी खाऊ घातली. त्यांनी केलेला आग्रह पाहून हर्षवर्धनला आपल्या आईची आठवण आली.

मयुरीच्या स्कूटरवरून ते दोघे परत हॉटेल सुखसागरसमोरील वृत्तपत्र वाचनालयाच्या टपरीजवळ आले. त्यांनी विवेकला

वैष्णवीच्या घरी घडलेली हकीकत सांगितली. त्यामुळे त्यांच्या मोहिमेला नक्कीच एक दिशा मिळालेली दिसत होती.

आता दुपार उलटून गेली होती. विवेकला आता घरी जाऊन रात्रीच्या कामगिरीसाठी परवानगी मिळवणे गरजेचे होते. मयुरीने त्याला आपल्या स्कूटरवरून सोडण्याची तयारी दाखवली; त्यामुळे वेळ आणि पैसे दोन्हीही वाचणार होते.

मल्हारदादाच्या खोलीवर रात्री राहण्याची सोय झाल्याने काही गोष्टी खूपच सोप्या झाल्या होत्या. मात्र तिथे जास्त गर्दी करून चालणार नव्हते. मोजक्याच तिघा-चौघांना खोलीत थांबता आले असते. बाकीच्या मुलांनी आपापल्या घरी थांबून पुढील आदेश मिळताच त्याप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित होते.

अधिक वेळ न दवडता मयुरी विवेकला आपल्या स्कूटरवरून घेऊन निघाली. जाण्यापूर्वी तिने आपला मोबाईल हर्षवर्धनकडे सोपवला आणि तसे काही विशेष असेल, तर त्याला आजीच्या मोबाईलवर मेसेज करायला सांगितले. सध्या आजीचे मोतिबिंदूचे ऑपरेशन करण्याचे ठरल्यापासून आजीचा फोन मयुरीकडेच असायचा. सकाळी शक्य तितक्या लवकर तिने परत तिथे येण्याचा शब्द दिला होता. शिवाय, सकाळी येताना नाश्त्यासाठी सर्वांना पुरतील इतकी सँडविचेस आणि कॉफी घेऊन येणार असल्याची त्याला कल्पना दिली.

मयुरीची भेट झाल्यामुळे हर्षवर्धनला घरच्यांचे पाठबळ मिळाल्यासारखे वाटत होते. रेल्वेत पैसे चोरीला गेल्याचे लक्षात आल्यापासून त्याच्या मनात निर्माण झालेली भीती आणि एकटेपणाची भावना आता गायब झाली होती. त्याचा आत्मविश्वास पुन्हा जागा झाला होता.

त्याची नजर नकळत दुसऱ्या मजल्यावरच्या पहिल्या खिडकीकडे गेली; तिथे कोणीतरी उभे असल्याचे त्याला जाणवले. हर्षवर्धन झटकन बाकावर जाऊन बसला आणि त्याने तोंडासमोर वर्तमानपत्र धरले. मल्हारदादाची ड्युटी साडेआठला सुरू होणार होती. तोपर्यंत त्याला खिंड लढवणे भाग होते.

तेवढ्यात त्याच्या मोबाईलवर एक मेसेज आला. तो मेसेज जुनैदने पाठवला होता. मयुरीने सर्वांना तिचा मोबाईल हर्षवर्धनकडे दिल्याची माहिती दिली होती. जुनैदला रात्रीच्या सिनेमाला मोहसीनसोबत जाण्याची परवानगी घरून मिळाली होती. ते दोघे जेवण करून आठ वाजेपर्यंत सायकलवरून लालबागला येणार होते. विवेक आणि नील हे दोघेही आपापल्या सायकलवरून येणार असल्याचे जुनैदने कळवले होते. शिवाय विवेक हर्षवर्धनसाठी घरून भाजी-पोळीचा डबा आणणार होता.

अगोदर ठरल्यापेक्षा सगळेजण दहा-पंधरा मिनिटे आधीच लालबागला पोहोचले. तोपर्यंत अंधार पडला होता. सर्वत्र निऑन

साईन्सच्या जाहिराती झळकत होत्या. डोक्यावरून जाणाऱ्या मेट्रोच्या पुलावरून मेट्रोची ये-जा सुरू होती. मुख्य रस्त्यावर जणू मोटारी, बसेस, रिक्षा, मोटारसायकली यांचा ओघ सुरू होता. सगळीकडे हॉर्नचे आवाज ऐकू येत होते. त्या मानाने हॉटेल सुखसागर थोडे आतल्या बाजूला असल्याने त्याच्या समोरील रस्त्यावर तुलनेने कमी वर्दळ होती.

सकाळपासून सुरू असलेली मोहीम आता एका महत्त्वाच्या वळणावर आली होती. हर्षवर्धनने सर्वांना वैष्णवीच्या घरी काय झाले आणि मल्हारदादा त्यांना कशी मदत करणार आहे, याची सविस्तर माहिती दिली. सर्वांनाच मल्हारदादाने सुचवलेली योजना पसंत पडली.

हर्षवर्धन आणि जुनैद या दोघांपासून सुरू झालेल्या मोहिमेला अनेक जण कळत-नकळत जोडले गेले होते—अजून कैक जण जोडले जाण्याची शक्यता होती. पण ही मोहीम पुढे कोणते वळण घेईल आणि तिचा शेवट कसा होईल, याचा अंदाज करणे त्या घडीला कठीण होते. तरीही एकंदरीत परिस्थिती समाधानकारक होती, असे म्हणायला हरकत नव्हती. त्याबद्दल मॉनिटरला—अर्थात विवेकला समाधान वाटत होते.

जुनैदला सकाळी हर्षवर्धनशी झालेली पहिली भेट आठवली आणि तो सहजपणे म्हणाला, "मॉनिटर, आता मात्र हर्षवर्धन

मुंबईकर मुलांप्रमाणे एकदम हुशार आणि स्मार्ट दिसतो आहे, खरे ना?"

"हो तर, आपल्या मुंबईची गोष्ट न्यारी आहे. 'जगात भारी, मुंबई नगरी,' असे म्हणतात ते एकदम सही आहे," नील अभिमानाने म्हणाला.

"फक्त तुम्हीच हुशार आणि स्मार्ट आहात, असे समजू नका!" हर्षवर्धन ठामपणे म्हणाला. त्याला आपल्या गावातील रांगड्या संस्कृतीचा अभिमान होता. शिवाय सकाळी जुनैदने त्याने घातलेल्या जर्कीनची थट्टा उडवली होती, ते तो विसरला नव्हता. त्यासाठी त्या अपमानाचा बदला जुनैदबरोबर पंजा लढवून घेण्याचे सकाळीच त्याने ठरवले होते. आता जरी ते मित्र बनले असले, तरी हर्षवर्धनच्या स्वाभिमानी मनात कुठेतरी तो अपमान डाचत होता आणि त्याने तसे बोलून दाखवले.

"कोणीही आपापसात भांडण करायचे नाही," विवेकने फर्मावले.

"अरे, हर्षवर्धन, सकाळी मी सहज बोलून गेलो, ते तू अजिबात मनावर घेऊ नकोस. तरीही तुला पंजा लढवायचाच असेल तर सावध रहा, मी त्यातील चॅम्पियन आहे," जुनैद हसत म्हणाला.

"आणि मलाही तू काही कमी समजू नकोस. मीही आमच्या शाळेत पंजा लढवण्यात कुणालाही हारत नाही," हर्षवर्धन अभिमानाने म्हणाला.

"तुम्ही दोघे असेच भांडत राहिलात तर आपल्या मोहिमेचे बारा वाजायला वेळ लागणार नाही. तुम्ही इथे भांडण करण्यापेक्षा समोर हॉटेलच्या खिडकीपाशी जाऊन भांडण करावे, म्हणजे खिडकीतून ते पाहून तो भामटा—सत्याप्पा तपकिरे सावध होईल आणि मग आपण आपापल्या घरी जाण्यास मोकळे होऊ," विवेक वैतागून म्हणाला.

विवेकच्या बोलण्याने हर्षवर्धन आणि जुनैद दोघेही वरमले. त्यांना आपली चूक समजली आणि त्यांनी ती बोलूनही दाखवली. दोघांनी विवेकची माफी मागितली आणि पुन्हा असा वादविवाद होणार नाही, याची खात्री दिली.

"वादविवाद करण्यात काही चुकीचे नाही. 'वादे वादे जायते तत्त्वबोधः' ही एक अत्यंत प्रसिद्ध संस्कृत म्हण आहे. याचा अर्थ असा की, अशा वादातून सत्याचा बोध होतो; पण तो वाद किंवा ती चर्चा निकोप असली पाहिजे. असे मुद्द्यावरून गुद्द्यावर येणे चुकीचे आहे," मॉनिटर विवेक म्हणाला.

"आम्हाला आमची चूक मान्य आहे," जुनैद आणि हर्षवर्धन एकदम म्हणाले. त्यांना त्या गोष्टीचे हसू आले आणि वातावरणातील ताण एकदम निघून गेला.

विवेकने पोळी-भाजीचा डबा हर्षवर्धनकडे सोपवला; परंतु सगळा डबा एकट्याने खाण्यापेक्षा सर्वांनी त्याला साथ द्यावी, असा हर्षवर्धनने आग्रह धरला. त्याच्या इच्छेला मान देण्यासाठी प्रत्येकाने दोन-दोन घास खाल्ले आणि पाच मिनिटांत पोळी-भाजीचा चट्टामट्टा झाला.

हर्षवर्धन जुनैदला म्हणाला, "बरं का जुनैद, तू मुंबई आणि मुंबईकरांचे कौतुक केलेस म्हणून मी काही रागावलो नव्हतो. जवळजवळ शंभर वर्षांपूर्वी 'मुंबई नगरी बडी बांका, जशी रावणाची दुसरी लंका..' असे पठ्ठे बापूरावांनी मायानगरी मुंबईचे वर्णन केले आहे. आणि इथला 'स्पिरिट ऑफ मुंबई' तर जगप्रसिद्ध आहे. मुंबईकरांची परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता, आपत्काळी मदतीला धावून जाण्याची वृत्ती, कितीही व्यत्यय आला तरी त्यातून त्वरेने सावरण्याची आणि दैनंदिन जीवन पुन्हा सुरू करण्याची ताकद याला कुठेच तोड नाही. मुंबई, खऱ्या अर्थाने प्रत्येक भारतीयाच्या 'स्वप्नांचे शहर' आहे. कठोर परिश्रम आणि चिकाटीच्या जोरावर कोणीही, त्याची पार्श्वभूमी काहीही असो, भारताच्या या आर्थिक राजधानीत टिकून राहू

शकतो आणि भरभराट करू शकतो, असा लोकांचा विश्वास आहे. मी हे कधीच नाकारणार नाही.

असे असले तरी, मी महाराष्ट्राच्या ज्या भागातून आलो आहे, त्या माझ्या हातकणंगले गावाचा आणि राजर्षी शाहू महाराजांच्या करवीर नगरीचा—कोल्हापूरचा मला रास्त अभिमान आहे. करवीरनिवासिनी अंबाबाई आणि दख्खनचा राजा जोतिबा यांच्या सान्निध्याने आमचा संपूर्ण पश्चिम महाराष्ट्र पावन झालेला आहे.

अगदी खरे सांगायचे झाले तर, 'या गर्दीत मी हरवून जाईन,' अशी मला भीती वाटत होती आणि तसेही मी खरोखरच हरवलो होतोच; पण तुमच्यासारखे जीवाला जीव देणारे मित्र मिळाले, म्हणून मी स्वतःला भाग्यवान समजतो," हर्षवर्धन मनापासून बोलत होता.

"माणसांच्या गर्दीची आणि ओसंडून वाहणाऱ्या रहदारीची अगदी थोड्याच दिवसांत लोकांना सवय होऊन जाते, तशी तुलाही सवय होईल," विवेक म्हणाला.

"हर्षवर्धन तुझ्या आई स्वभावाने कडक शिस्तीच्या आहेत का? आम्ही जसे आता एका रात्रीसाठी घराबाहेर राहण्याची परवानगी मिळवली, तशी परवानगी त्या तुला देतील का?" नीलने विचारले.

"माझी आई प्रेमळ आहे, तशी ती शिस्तप्रिय आहे पण ती कडक शिस्तीची आहे असे म्हणता येणार नाही. ती मला कोणत्याही गोष्टीसाठी अडवत नाही, उलट मीच अनेकदा मित्रांबरोबर मौजमजा करण्यासाठी बाहेर जाण्यास तयार नसतो," हर्षवर्धनने उत्तर दिले.

"मला काही समजले नाही, जरा स्पष्ट करून सांगशील का?" विवेकने प्रश्न केला.

"ठीक आहे, मी सांगण्याचा प्रयत्न करतो. विवेक, तुमच्या घरची आर्थिक परिस्थिती कशी आहे रे?" हर्षवर्धनने विचारले.

"म्हणजे? मला घरच्या आर्थिक बाबींची फारशी कल्पना नाही," विवेक म्हणाला.

"घरात आर्थिक गोष्टींची चर्चा मुलांसमोर होत नसेल, तर कुटुंब आर्थिकदृष्ट्या सुस्थितीत आहे असे समजायला हरकत नाही," हर्षवर्धन म्हणाला.

"तू म्हणतोस ते बरोबर असावे," विवेकने उत्तर दिले.

"आमच्याकडे नेमकी उलट परिस्थिती आहे. मी आणि माझी आई नेहमीच याबद्दल बोलत असतो. आमची मिळकत तशी बरीच कमी आहे. माझी आई घरगुती स्वरूपात ब्युटी पार्लरचे काम करते. तशी ती सतत कामातच असते, कारण त्या कामाबरोबरच

तिला घरकामही करावे लागते. तरीही तिची कमाई जेमतेम घरखर्चापुरतीच होते. पण जेव्हा आमच्या वर्गाची सहल वगैरे असते, तेव्हा माझी आई मला इतर मुलांइतकेच पैसे देते; कधीकधी तर त्यांच्यापेक्षा थोडे जास्तीचेच देते असे म्हणायला हवे," हर्षवर्धन म्हणाला.

"हे कसे शक्य आहे?" नीलने आश्चर्यचकित होऊन विचारले.

"ती हे कसे शक्य करू शकते याची मला कल्पना नाही; पण तिने मला मौजमजेसाठी खर्चायला दिलेल्या पैशांतील निम्मे पैसे मी खर्च न करता नेहमी घरी परत आणतो," हर्षवर्धन म्हणाला.

"तुला खर्चासाठी दिलेले पैसे तू खर्च न करताच परत आणतोस? असे का?" नीलने पुन्हा विचारले.

"मला तिच्या कष्टाचे पैसे अनावश्यक गोष्टींवर खर्च करायला अजिबात आवडत नाही," हर्षवर्धन म्हणाला.

"म्हणजे तू परीक्षा झाल्यावर वर्गातील मित्रांबरोबर कधीच सिनेमाला वगैरे जात नाहीस?" नीलने कुतूहलाने विचारले.

"फक्त एकदाच गेलो होतो; त्याची एक आठवण आहे," हर्षवर्धन सांगू लागला, "मागच्या वर्षी वार्षिक परीक्षा संपल्यावर माझे काही वर्गमित्र सिनेमाला जाण्याचे ठरवत होते. प्रत्येकजण दुसऱ्या एका मित्राला घेऊन आपल्या घरी जायचा आणि 'तो मित्र

जाणार आहे' असे सांगून स्वतःसाठी परवानगी आणि पैसे मागायचा. शेवटी एक-एक करून सर्वांना पैसे आणि परवानगी मिळाली. तेव्हा सगळेजण माझ्या घरी मला सिनेमाला पाठवण्यासाठी आईची परवानगी काढायला येणार होते. पण आदल्याच दिवशी आई दूधवाल्या काकांना 'दोन दिवसांनी पैसे देईन' असे म्हणताना मी ऐकले होते. त्यामुळे मित्रांना मी 'माझ्या घरी परवानगी मागायला येऊ नका, मला सिनेमाला यायचे नाही' असे बजावले आणि तिथून पळतच घरी आलो.

घरी आल्यावर अगदी निर्हेतुकपणे मी आईला म्हटले की सगळे मित्र सिनेमाला जात आहेत. त्यावर ती म्हणाली, 'अरे मग तू का नाही गेलास? हे बघ, सिनेमा सुरू होण्यासाठी अजून बराच वेळ आहे. आपली पैसे ठेवायची पेटी घेऊन ये बघू!' मी लगेच ती पेटी आईकडे आणून दिली. त्यातील दीडशे रुपये काढून तिने माझ्या हातावर ठेवले आणि म्हणाली, 'तिकिटाचे शंभर रुपये होतील; इंटरव्हलमध्ये सर्वांबरोबर पॉपकॉर्न खाण्यासाठी हे पन्नास रुपये तुझ्याकडे असू देत.' ते पैसे घेऊन मी आनंदाने धावत-पळत सरळ सिनेमा टॉकीजकडे गेलो. माझे मित्र मला पाहून आनंदित झाले आणि मलाही खूप आनंद झाला.

सिनेमा पाहून संध्याकाळी घरी पोहोचलो, तर आई पार्लरमध्ये कामात व्यस्त होती. काम करता करता शेजारच्या पाटील काकूंशी

तिच्या गप्पा चालल्या होत्या. काकू केस रंगवण्यासाठी आलेल्या होत्या. 'निर्मलाताई, आज शाळेला सुट्टी लागली आहे, पण हर्षवर्धन कुठे दिसत नाहीये?' काकूंनी विचारले.

तेव्हा आई म्हणाली, 'अहो, तो वर्गमित्रांसोबत सिनेमाला गेला आहे. सगळेजण जाणार होते; हा एकटाच 'मी येणार नाही' म्हणून घरी परत आला होता. त्याचा तो अकाली पोक्तपणा पाहून माझे काळीज गलबलून आले हो! लहान वयात त्याला आपल्या आर्थिक परिस्थितीची इतकी चांगली जाण आहे. म्हणून मीच त्याला आग्रहाने सिनेमासाठी पैसे दिले, तेव्हा अगदी फुलपाखरासारखा उडतच मित्रांना भेटायला गेला. दूधवाल्याचे पैसे काय, दोन दिवसांनी देता येतील; पण मित्रांबरोबर धमाल करण्याच्या आनंदाला माझा हर्षवर्धन मुकता कामा नये, म्हणून मी बळजबरीनेच त्याला पाठवून दिले.' आईने काकूंशी बोलताना डोळ्याला पदर लावलेला मी दारातून पाहिला. ते ऐकून माझ्याही डोळ्यात अश्रू उभे राहिले. तेव्हापासून मी माझ्या मित्रांच्या खर्चिक गोष्टींची घरात अजिबात चर्चा करत नाही."

"आता मला तुझ्या बोलण्याचा अर्थ थोडा थोडा समजायला लागला आहे. तुला तुझ्या आईच्या कष्टांची जाणीव आहे, म्हणूनच तू वायफळ खर्च करत नाहीस. उगाच हट्ट करून आईला त्रास

होईल असे वागत नाहीस. थोडक्यात, तू आईचे 'गुणी बाळ' आहेस असे म्हणायला हरकत नाही," विवेक म्हणाला.

"तू हवं ते म्हणू शकतोस. जरी आईने मला काही कारणांमुळे मित्रांबरोबर रात्री नऊ वाजेपर्यंत बाहेर थांबण्याची परवानगी दिली तरी मी सात वाजताच घरी परत येतो. मला माझ्या आईने रात्रीचे जेवण एकटीने केलेले आवडत नाही. क्वचित प्रसंगी मी उशिरापर्यंत बाहेर थांबलो तरी मला त्यात आनंद वाटत नाही. आई जरी वरकरणी दाखवत नसली तरी तिलाही मी लवकर घरी आल्याचा आनंद होतो, हे मला माहीत आहे," हर्षवर्धन म्हणाला.

"आमच्या घरी मात्र अगदी वेगळेच असते. मी कधी वेळेवर घरी गेलोच, तर मी खात्रीने सांगू शकतो की आई-बाबा हमखास सिनेमाला नाही तर नाटकाला गेलेले असतात किंवा कुणाकडे पार्टीला तरी गेलेले असतात. आम्हा सर्वांनाच या गोष्टीची सवय झाली आहे आणि त्याबद्दल आमची कोणाचीच तक्रार नाही," विवेक म्हणाला.

"एकमेकांना सहवास देणे, एवढीच गोष्ट आम्हाला परवडते. पण त्यामुळे आईचे 'गुणी बाळ' म्हणून टोमणा मारत असाल तर मला त्याची पर्वा नाही. मी जे सांगितले ते अगदी खरे आहे—मग त्यावर कोणाचा विश्वास बसो अथवा ना बसो, मला काही फरक पडत नाही. याउप्पर कोणाला माझ्याबद्दल अधिक काही जाणून

घ्यायचे असेल तर त्यांना माझे तोंड नाही तर माझे हातच उत्तर देतील. कोणाकोणाचे अजून समाधान झाले नाही? त्यांनी हात वर करा," हर्षवर्धनला 'गुणी बाळ' म्हणून केलेली चेष्टा आवडलेली दिसत नव्हती.

"मला सगळे समजले आहे," चष्म्याची काच पुसत विवेक म्हणाला

दोघे एकदम निःशब्द झाले. एव्हाना रात्र झाली होती आणि 'हॉटेल सुखसागर'च्या मागे आकाशात चंद्र हळूहळू वर चढत होता.

विवेकने उगाचच घसा खाकरला आणि हर्षवर्धनच्या चेहऱ्याकडे न पाहताच प्रश्न केला, "तुमचे एकमेकांवर खूप प्रेम आहे, नाही का?"

"होय, आमचे एकमेकांवर नितांत प्रेम आहे," हर्षवर्धन हळुवारपणे म्हणाला.

12: गप्पांचा फड आणि आव्हानांची मालिका

"हॅलो, हर्षवर्धन!" मल्हारची हाक ऐकू आली आणि खोलीतील सर्वांच्या नजरा त्याच्याकडे वळल्या. हर्षवर्धनने लगेचच मल्हारची सर्वांशी ओळख करून दिली. दरम्यान, विवेकने 'बी. एन. ग्रुप' नावाचा एक नवीन व्हॉट्सॲप ग्रुप तयार करून त्यात मल्हारदादाचा नंबरही जोडला; जेणेकरून यापुढील सर्व सूचना आणि घडामोडी सर्वांना एकाच वेळी समजणे सोपे जाईल आणि त्यासाठी मुद्दाम वेगळी बैठक घेण्याची गरज उरणार नाही.

मल्हारने खोलीच्या किल्ल्या हर्षवर्धनच्या स्वाधीन केल्या आणि सकाळी लवकर परत येण्याची आठवण करून दिली. "रात्री माझे तीन-चार मित्र झोपायला येणार आहेत," असा मोघम उल्लेख त्याने शेजाऱ्यांकडे आधीच करून ठेवला होता. वैष्णवीच्या आईंनी पूर्वी हर्षवर्धनला पाहिलेले असल्यामुळे मल्हारने त्याला विशेष बजावले, "तू मात्र खोलीबाहेर फारसा रेंगाळू नकोस, लक्षात ठेव."

हर्षवर्धनने होकारार्थी मान डोलावली. पुन्हा एकदा सर्व गोष्टींचा आढावा घेतल्यानंतर मल्हार आपल्या ड्युटीवर

जाण्यासाठी निघाला; पण काहीतरी आठवल्याने तो परत मागे फिरला.

"मुलांनो, आज रात्री तुम्ही आमच्या घरी पाहुणे म्हणून येत आहात; पण गंमत बघा, तुमचे स्वागत करायला आणि सरबराई करायला घरात स्वतः यजमानच हजर नाहीये. तरी तुम्ही अजिबात परकेपणा मानू नका. मला कल्पना आहे की आज तुमची खूप धावपळ झाली आहे आणि तुम्ही प्रचंड दमले असाल. पण तरीही, आज प्रथमच तुम्ही एकत्र येत एक वेगळे धाडस केले आहे; एका चांगल्या उद्देशासाठी घरात खोटे कारण सांगून रात्रभर बाहेर राहण्याची परवानगी मिळवली आहे!

कदाचित परक्या ठिकाणी तुम्हाला झोप लागणार नाही. तसे झाले तर मनसोक्त गप्पागोष्टी करा; मात्र जास्त दंगामस्ती करू नका. रात्री कॉफी पिण्याची इच्छा झाली, तर मी किचनच्या कट्ट्यावर सगळी तयारी करून ठेवली आहे, फ्रिजमध्ये दूधही आहे; तुम्हाला कॉफी करता येत असेलच. रात्री कितीही जागरण झाले, तरी सकाळी मात्र वेळेत उठून हॉटेलकडे येण्यासाठी तयार राहा. हॉटेलची चेक-आऊटची वेळ तशी सकाळी दहाची आहे; पण काही ग्राहक लवकरही रूम सोडतात. तसा काही अंदाज आला, तर मी आपल्या व्हॉट्सॲप ग्रुपवर मेसेज करेनच." एवढे सांगून मल्हार आपल्या ड्युटीसाठी निघून गेला.

मुलांची 'पंचकडी' सायकलींवरून मल्हारदादाच्या चाळीकडे रवाना झाली. हर्षवर्धन विवेकच्या सायकलवर डबलसीट बसला होता. मल्हारने त्यांना सायकली नीट लॉक करून त्याच्या स्कूटरच्या पार्किंगमध्येच लावायला सांगितल्या होत्या. त्याप्रमाणे सायकली पार्क करून सगळेजण मल्हारच्या खोलीत आले.

वैष्णवी तिच्या घराच्या दारात उभी होती. ती त्या़च्याकडे बघून हलकेच हसली; मुद्दामच तिने त्यांच्याशी बोलणे टाळले होते. तसेही 'बी. एन. ग्रुप' या व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये मयुरी आणि वैष्णवीची नावे आधीच जोडलेली होती, गरज लागलीच तर मेसेजवर काम भागले असते.

सगळेजण घरात आले. मल्हारने मुलांची अंथरुणे-पांघरुणे काढून ठेवली होती. मुले कपडे बदलून अंथरुणावर पडली; पण मल्हार म्हणाल्याप्रमाणे कुणालाही झोप येत नव्हती. सहजच हर्षवर्धनने जुनैदला विचारले,

"जुनैद, मला एका गोष्टीचे नवल वाटत आहे. तुला ग्रुपचे 'बी. एन. ग्रुप', म्हणजे 'बहिर्जी नाईक ग्रुप' हे नाव कसे सुचले?"

"त्याची एक गंमतच झाली. आमच्या शाळेत वार्षिक स्नेहसंमेलनात 'राजा शिवाजी' हे नाटक बसवले होते. त्यात मला बहिर्जी नाईकांची भूमिका मिळाली होती. तेव्हा मला बहिर्जी नाईकांविषयी माहिती मिळाली. त्यांचे व्यक्तिमत्त्व मला खूप

आवडले. मग मी शाळेच्या वाचनालयातून बहिर्जी नाईकांवर लिहिलेले एक पुस्तक आणून वाचले.

सुदैवाने नाटकातील माझी भूमिका चांगली वठली आणि त्या भूमिकेसाठी मला पारितोषिकही मिळाले. तेव्हापासून शाळेत सर्वजण मला 'बहिर्जी नाईक' म्हणून ओळखू लागले. नंतर माझ्या मित्रांचा मिळून 'बहिर्जी नाईक ग्रुप' तयार झाला. त्यात माझे वर्गमित्र आणि आमच्या घराजवळचे मित्र सहभागी झाले आहेत," जुनैद म्हणाला.

इतिहास हा विवेकचा आवडता विषय होता. लगेच त्याने मराठ्यांच्या इतिहासातील एक दैदिप्यमान पर्व, म्हणजे हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेचे जणू काही आख्यानच सुरू केले. त्यात वेळोवेळी बहिर्जी नाईकांचा उल्लेख येत होता. हिंदवी स्वराज्य स्थापनेच्या पहिल्या किल्ला 'कोंढाणा' मोहिमेपासून बहिर्जी शिवाजी महाराजांसोबत होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या गुप्तहेर खात्यात जवळजवळ तीन ते चार हजार गुप्तहेर असायचे. ह्या सर्वांचे नेतृत्व नाईकांकडे होते.

बहिर्जी नाईक हे फकीर, वासुदेव, कोळी, भिकारी, संत आदी कुठलेही वेशांतर करण्यात पटाईत होते. पण फक्त वेशांतरच नाही, तर समोरच्या माणसाच्या नकळत त्याच्या तोंडातून शब्द चोरण्याचे चातुर्य त्यांच्याकडे होते. त्यालाच सध्या 'लिप रिडिंग

टेक्निक' असे म्हटले जाते. विजापूरचा आदिलशहा आणि दिल्लीचा बादशहा ह्यांच्या महालात वेशांतर करून जात व खुद्द आदिलशहा व बादशहा यांच्याकडून पक्की माहिती घेऊन येत. हेर असल्याचा संशय जरी आला, तरी कत्तल करणारे हे दोन्ही बादशहा बहिर्जींना एकदादेखील पकडू शकले नाहीत. यातच बहिर्जी नाईक जाधव यांची बुद्धिमत्ता व चातुर्य दिसून येते.

बहिर्जी नाईक जाधव फक्त गुप्तहेरच नव्हे, तर लढवय्येदेखील होते. तलवारबाजीत आणि दांडपट्ट्यात ते निष्णात होते. अफजलखानाचा वध, पन्हाळ्यावरून सुटका, शाहिस्तेखानाची बोटे तोडणे, पुरंदरचा वेढा किंवा सुरतेची लूट अशा शिवाजी महाराजांच्या प्रत्येक मोहिमेत ते सहभागी होते.

जॉर्ज ओग्झेन्डन हा इंग्रज वखारवाला आपली वखार वाचवण्यासाठी शिवाजी महाराजांची विनवणी करावयास गेला. तेव्हा महाराजांच्या बाजूला उभा असलेला इसम आणि आपल्या वखारीसमोरचा भिकारी यांच्यात त्याला साम्य आढळले. त्याने ईस्ट इंडिया कंपनीला पाठवलेल्या अहवालात तसे नमूदही केले. इंग्रजांच्या कागदपत्रांमध्ये अशा रीतीने बहिर्जी नाईक जाधवांचा उल्लेख आढळतो; पण आपल्याकडे मात्र त्यांच्याविषयी फारसे उल्लेख सापडत नाहीत. गुप्तहेरांच्या कामगिऱ्या गुप्त राखणे, हेच हिंदवी स्वराज्यासाठी महत्त्वाचे होते.

(मल्हार दादांच्या घरी रात्री रंगलेला गप्पांचा फड)

सगळेजण भारावून विवेकचे बोलणे ऐकत होते. अचानक हर्षवर्धन गंभीरपणे म्हणाला, "मित्रांनो, माझ्याबाबतीत म्हणायचे झाले, तर आजचा दिवस योगायोगाने घडलेल्या घटनांनी भरलेला दिवस आहे असेच म्हणावे लागेल. आज सकाळी रेल्वेत माझे सर्वस्व लुटले गेले आणि त्या चोरट्याचा माग काढताना जुनैदसारखा एक मित्र भेटला. हा एक चांगला योगायोग म्हणावा

लागेल आणि त्यामुळेच मला तुमच्या 'बी. एन. ग्रुप'च्या शूर शिलेदारांचीही ओळख झाली.

असे असले तरी उद्या काय होणार? याची भीती सारखी माझ्या मनाला लागून राहिली आहे. आपण सगळे भले त्या भामट्याचा पाठलाग करू, त्याचे कारस्थान उघडकीस आणण्याचा प्रयत्न करू; पण तेवढ्याने आपले काम होईल काय? कदाचित तो आपल्या हातावर तुरी देऊन पसार होऊ शकतो किंवा आपण त्याच्यावर करत असलेला आरोप सपशेल नाकारून आपल्यालाच खोटे पाडू शकतो.

"पोलीसांचा तर सोडाच, पण आपल्या घरच्यांचा तरी आपल्यावर विश्वास बसेल का? उलट आपली चांगलीच कानउघाडणी केली जाईल. मला उद्याचा नुसता विचार जरी मनात आला, तरी माझ्या छातीतली धडधड वाढायला लागते."

"हर्षवर्धन, आतापर्यंत घडलेल्या घटनांना तू योगायोग म्हण किंवा आणखी काही; पण मला वाटते ते प्रत्येकाच्या समजून घेण्याच्या क्षमतेवर अवलंबून आहे. सुरुवातीला जुनैदने तुझी थोडी गंमत केली आणि तुलाही त्याचा राग आलाच ना? पण जेव्हा तू प्रांजळपणे त्याला घडलेली हकीकत सांगितलीस, तेव्हा मात्र त्याचा कल्पक मेंदू त्यावर काम करू लागला आणि तुझाही त्याच्यावर विश्वास बसला.

आम्ही सगळे जरी 'बी. एन. ग्रुप'चे सदस्य असलो, तरी ग्रुपमधील कोणत्याही सदस्याने काही मत व्यक्त केले, म्हणजे ते आम्ही सहज मान्य करतो असे नाही. एखादे मत आम्हाला पटले नाही, तर ते का पटले नाही हे आम्ही सरळ सांगून टाकतो. मग त्यावर पुन्हा विचारविनिमय होऊन पुढील दिशा ठरते.

तुला भीती वाटते तसे उद्या कदाचित होईलही; पण त्या भामट्याने तुझे पैसे चोरले आहेत, या तुझ्या खात्रीवर पोलीसांचाही विश्वास बसेल. फक्त त्यासाठी थोडा वेळ द्यावा लागेल," विवेकने आपले मत व्यक्त केले.

"विवेक, तू म्हणतोस तसे उद्या जर घडले तर एक चमत्कारच घडला म्हणावे लागेल. पण सध्या माझ्या मनातील अस्वस्थता काही कमी होत नाही आहे. मला राहून राहून माझ्या आईची आठवण येत आहे. एव्हाना तिला मी मावशीकडे पोहोचलो नसल्याचे समजले असेल.

अरे मोहसीन, मघाशी मला मयुरीने तुम्ही घरी येऊन माझे सामान पोहोचवल्याचे सांगितले; तुला तिथली एकंदर परिस्थिती कशी वाटली? आजी आणि मावशी माझ्याबद्दल फार चिंतेत तर नव्हत्या ना?" हर्षवर्धनने विचारले.

"आम्ही तिकडे जाण्यापूर्वी सर्वचजण तुझ्याच काळजीत होते. तुझ्या आईला फोन करून तू अजून घरी पोहोचला नसल्याचे

सांगावे असे तुझी आजी आणि मावशी म्हणत होत्या. पण मयुरीच्या बाबांनी 'अगोदर नेमके काय झाले आहे, याचा शोध घेऊ आणि नंतर पुढे काय करायचे ते ठरवू,' असे म्हटल्याने तुझ्या आईला फोन केला नाही. मयुरीचे बाबा रेल्वे स्टेशनवर जाऊन चौकशी करणार होते आणि रेल्वे पोलीसांत तक्रार देणार होते. नेमके त्याच वेळी मी आणि चैतन्य तिकडे पोहोचलो, म्हणून सर्वांना दिलासा मिळाला. तरीही तुझी खुशाली जाणून घेण्यासाठी मयुरीताई आमच्याबरोबर आली. तू काही काळजी करू नकोस, तुझ्या आईंना अजून इथले काही समजलेले नसावे.

मी तुमच्या 'बी. एन. ग्रुप'चा अगदी

नवीन सदस्य आहे. मला आपणा सर्वांना एक सूचना करायची आहे. उद्या आपण भामट्याला गाठून त्याने हर्षवर्धनचे लंपास केलेले पैसे परत मिळवायचे आहेत, हे खरेच आहे; पण ज्या क्षणी आपल्याला ही गोष्ट अशक्य आहे असे वाटेल, त्याक्षणी आपण घरातील मोठ्या माणसांना फोन करून घडलेल्या प्रकाराची कल्पना द्यावी आणि पुढचे सर्व त्यांच्यावर सोपवावे.

कारण तसे हे काम जोखमीचे आहे. कदाचित तो अट्टल गुन्हेगारही असू शकतो," मोहसीन म्हणाला.

अशाप्रकारे त्यांच्या गप्पा बराच वेळ सुरू होत्या. कुणीतरी मल्हारने सुचविलेल्या कॉफीची टूम काढली, तेव्हा जुनैदने

मोबाईलमध्ये किती वाजले ते पाहिले. रात्रीचे दोन वाजत आले होते. 'बी. एन. ग्रुप'वर नवीन काही मेसेज आला नव्हता.

जुनैद म्हणाला, "मित्रांनो, आता जर आपण कॉफी प्यायलो, तर आपल्याला अजून दोन तास तरी झोप येणार नाही. त्यापेक्षा आता आपण झोपायचा प्रयत्न करू या. अर्ध्या तासात सगळे झोपी जाऊ. तेवढीच विश्रांती मिळेल. हर्षवर्धनची गोष्ट पहा— बिचाऱ्याची काल रात्रीही झोप झालेली नाही. तेव्हा आता गप्पा बंद! सकाळी जाग आली की मात्र लगेच ब्रश करून, हात-पाय-तोंड धुऊन कॉफी घेऊ आणि ताजेतवाने होऊ."

सर्वांनाच जुनैदची सूचना मान्य झाली; आणि सर्वजण निद्रादेवीची आराधना करू लागले; विचारांच्या तंद्रीत त्यांचा कधी डोळा लागला ते समजले नाही.

अचानक मोबाईलची रींग झाली आणि हर्षवर्धन जागा झाला. त्याने लगेच फोन उचलला. पलिकडून मल्हार बोलत होता. 'हो, हो! आम्ही उठतोच आहोत. अर्धा तासांत तिकडे पोहोचतो'

हर्षवर्धन घाईघाईने म्हणाला; आणि सगळ्यांना जाग आली.

"काय झाले? फोनवर काय निरोप होता?" जुनैदने विचारले.

"मल्हार दादाचा फोन होता. तो सत्याप्पा तपकिरे सकाळी लवकर चेक-आऊट करणार आहे, असे त्याला रिसेप्शन

काउंटरवर समजले, म्हणून त्यांने आपल्याला लवकर तिकडे बोलावले आहे," हर्षवर्धन म्हणाला.

विवेकने घड्याळात पाहीले तर पावणे सहा झाले होते. पंधरा मिनिटांत

एका पाठोपाठ एकाने प्रातर्विधी आटोपले. तोवर हर्षवर्धनने सर्वांसाठी कॉफी केली होती. टेबलवर ठेवलेल्या बिस्किटांचा आणि कॉफीचा आस्वाद घेऊन सव्वा सहा वाजता मंडळी घराबाहेर पडली. सर्वात शेवटी जुनैद घराला कुलूप लावून पार्किंगमध्ये आला. पंचकडी सायकलवरून चाळीच्या बाहेर पडली. जाताना वैष्णवीला मोबाईलवर तसा मेसेज करून सांगितले होते.

मात्र बाहेर पडताना हलक्या आवाजात 'हर हर महादेव!' असा सर्वांनी एकच नारा दिला.

प्रकरण 13: खुणेच्या नोटा—संशयाची सुई

सहा वाजून वीस मिनिटांनी आपली पंचकडी हॉटेलसमोरच्या टपरीवजा वाचनालयात जमली होती. तिथे त्या दिवसाचे 'लोकसत्ता', 'महाराष्ट्र टाइम्स' आणि एका हिंदी वर्तमानपत्राचे अंक डेस्कवर दोऱ्याने बांधून ठेवलेले होते. नील सहज वर्तमानपत्र चाळत उभा होता. अचानक त्याची नजर आतील पानावरील एका ठळक बातमीवर गेली. त्याने सर्वांना हाक मारून बोलावून घेतले आणि ती बातमी दाखवली. ती बातमी थोडक्यात अशी होती:

दादर स्टेशनवरील सुरक्षा व्यवस्था वाऱ्यावर

आमच्या प्रतिनिधीकडून

मुंबई: काल पुन्हा एकदा दादर स्टेशनवर चोरट्यांनी एक सुटकेस लांबवल्याची घटना समोर आली आहे. काल सकाळी कोल्हापूरहून मुंबईला येणाऱ्या महालक्ष्मी एक्स्प्रेसमधून प्रवास करणाऱ्या एका महिलेची सुटकेस दादर स्टेशनवरील गर्दीतून

लांबवण्यात आली. सदर महिला आपल्या पती आणि लहान मुलासह स्टेशनवर उतरली. त्यानंतर हमाल सामान बाहेर नेत असताना झालेल्या गडबडीत चोरट्यांनी शिताफीने सामानातील एक बॅग हातोहात पळवली. सदर बॅगेत मौल्यवान ऐवज असल्याचे समजते.

रेल्वे पोलीस आता मुंबई पोलीसांच्या मदतीने तपास करत आहेत.

बातमी वाचल्यावर हर्षवर्धनचे डोळे विस्फारले. तो मोठ्याने म्हणाला, "अरे, मीही याच ट्रेनने दादर स्टेशनवर उतरलो होतो! तेव्हा तिथे बराच गोंधळ चालला होता आणि गणवेशातील पोलीसही मला दिसले होते. कदाचित तेव्हाच ही चोरी झाली असावी."

"का कुणास ठाऊक, पण हे वाचल्यावर मला वाटत आहे की तुझे पैसे चोरणाऱ्या त्या सत्याप्पा तपकिरेचेच तर हे काम नसेल ना?" विवेकचा तल्लख मेंदू आता कामाला लागला होता.

"अगदी तसेच घडले असे समजणे चुकीचे ठरेल; आणि समजा तसे घडलेही असेल, तरी त्याचा पुरावा काय? कोणत्याही गुन्ह्यात पुरावाच सर्वात महत्त्वाचा असतो," मोहसीन म्हणाला.

हर्षवर्धनला मोहसीनचे म्हणणे पटले तरीही त्याच्या डोक्यात संशयाचा किडा वळवळत होता. त्याला काहीतरी पुसटशी जाणीव होत होती पण नेमके काय ते त्याला समजत नव्हते.

'XYZ हॉटेल सोडण्याच्या तयारीत आहे. काउंटरवर बिल भरण्यासाठी निघालो आहे. उबरवरून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवर जाण्यासाठी टॅक्सी बोलावली आहे.'

हा मेसेज वाचल्यावर हर्षवर्धन एकदम हताश झाला. त्याच्या हातातोंडाशी आलेला घास निसटून चालला होता. एकदा तो भामटा टॅक्सीत बसून रेल्वे स्टेशनवर निघून गेला असता, तर त्याला शोधणे समुद्रातील वाळूत सुई शोधण्यासारखे झाले असते.

'कोणत्याही गुन्ह्यात पुरावाच सर्वात महत्त्वाचा असतो,' हे मोहसीनचे शब्द त्याला राहून राहून आठवत होते. खरंच, त्याच्या 'मनाची पक्की खात्री' यापलीकडे त्याच्याकडे दुसरा कोणताही पुरावा नव्हता आणि तो पुरावा चोरीच्या गुन्ह्यासाठी कुचकामी ठरणार होता.

एका प्रकारच्या आवेगाने हर्षवर्धन ताडकन त्या टपरीबाहेर आला आणि एका झटक्यात रस्ता ओलांडून हॉटेलच्या दारात गेला. रस्त्याच्या पलीकडे त्याचे मित्र आ वासून त्याच्याकडे बघतच होते, तोपर्यंत तो प्रवेशद्वारातून आत गेला होता.

कॅश काउंटरवर एक व्यक्ती पाठमोरी उभी होती.

"साहेब, पेमेंट ऑनलाईन की कॅश?" कॅशिअरने विचारले.

"कॅश," असे म्हणत ती व्यक्ती पॅन्टच्या खिशातून पाकीट काढू लागली.

'नक्कीच तो सत्याप्पा तपकिरेच होता,' हर्षवर्धनच्या मनात विचार आला आणि तो श्वास रोखून त्या व्यक्तीच्या हालचाली न्याहाळू लागला.

"किती?" त्या व्यक्तीने विचारले.

"एकतीसशे पन्नास रुपये," कॅशिअर म्हणाला.

खिशातून पैसे काढून त्या व्यक्तीने ते मोजले आणि खिडकीतून कॅशिअरकडे सरकवले.

"साहेब, सुटे पन्नास रुपये आहेत का? आताच काउंटर उघडला आहे. माझ्याकडे सुट्टे नाहीत," कॅशिअरने विचारले.

"Keep the change! मला घाई आहे. लवकर पैसे भरून घ्या," ती व्यक्ती म्हणाली.

'बत्तीसशे रुपये—पाचशेच्या सहा नोटा आणि दोनशेची एक!' हर्षवर्धन पुटपुटला. पुढच्याच क्षणी तो त्याच्याही नकळत कॅश काउंटरसमोर त्या व्यक्तीच्या मागे जाऊन उभा राहिला.

"थांबा! हे पैसे चोरीचे आहेत!" हर्षवर्धन मोठ्याने म्हणाला.

लहान मुलाचा आवाज ऐकून कॅशिअर खुर्चीतून उठून उभा राहिला आणि आश्चर्याने हर्षवर्धनकडे पाहू लागला.

"अहो, पावती फाडायची सोडून त्या मुलाकडे काय पाहत बसलात? तो खोटे बोलत आहे. मी त्याला ओळखतही नाही. चला, लवकर करा. माझी टॅक्सी दारात उभी असेल," ती व्यक्ती वैतागून म्हणाली.

"अहो, काका, मी खरंच सांगतो. हे पैसे माझे आहेत. मी यांना ओळखतो. यांचे नाव सत्याप्पा तपकिरे आहे. नाव सत्याप्पा असून एक नंबरचे खोटारडे आहेत. काल पहाटे महालक्ष्मी एक्स्प्रेसमध्ये यांनी माझ्या खिशातून हे पैसे चोरून नेले. देवाशपथ, मी खरे सांगतो आहे!" हर्षवर्धन म्हणाला.

कॅशिअर त्याच्या बोलण्याकडे अचंबित होऊन पाहतच राहिला.

"अहो, असे पाहत काय राहिलात? लवकर पावती करा. हा मुलगा जे काही बोलत आहे, त्याला पुरावा काय? असे कोणीही येऊन काहीही म्हणेल. तो खोटे बोलत आहे, याचा माझ्याकडे पुरावा आहे. हे पहा माझे पॅन कार्ड. नाव नीट वाचा—विठोबा लोखंडे. आता तरी आपले समाधान झाले असेल, तर पावती फाडा," ती व्यक्ती रागारागाने म्हणाली.

कॅशिअर पैसे कॅश बॉक्समध्ये टाकणार, तोच हर्षवर्धनला काहीतरी आठवले.

"त्या माझ्याच नोटा आहेत. पाचशे रुपयांच्या सहा आणि दोनशे रुपयांची एक अशा सात नोटा मी शर्टच्या उजव्या खिशात एका सेफ्टी पिनमध्ये अडकवून ती पिन खिशाला टोचून ठेवली होती. नीट पाहिल्यास प्रत्येक नोटेवर सेफ्टी पिनमुळे पडलेली छिद्रे दिसतील. तपासून पहा," हर्षवर्धन ठामपणे म्हणाला.

कॅशिअरने दिव्याच्या प्रखर उजेडात प्रत्येक नोट तपासून पाहिली. हर्षवर्धन सत्य बोलत होता.

"मिस्टर लोखंडे, हा मुलगा खरे बोलत आहे. मला याची कल्पना आमच्या मॅनेजरांना द्यावी लागेल. तोपर्यंत आपल्याला थांबावे लागेल," कॅशिअर शांतपणे म्हणाला.

"खऱ्या-खोट्याची खात्री करत बसायला मला वेळ नाही. माझी ट्रेन चुकेल. मी पैसे भरले आहेत, मी चाललो. पावती तुमच्याकडेच असू देत." असे म्हणून त्याने आपली सॅक पाठीवर अडकवली आणि तो दरवाजाकडे निघाला.

त्याच्या मागे हर्षवर्धन धावला. "काका, थांबा! मला माझे पैसे परत द्या!" हर्षवर्धन मोठ्याने ओरडून म्हणाला.

हॉटेलच्या लॉबीमध्ये उभी असलेली माणसे तिकडे आश्चर्याने पाहू लागली. बाहेर उभे असलेले हर्षवर्धनचे मित्र हा प्रकार पाहत होते, ते हॉटेलच्या दाराशी धावले आणि त्या भामट्याला अडवण्याचा प्रयत्न करू लागले. भामट्याने त्यांना हाताने झिडकारून दूर करण्याचा प्रयत्न सुरू केला, पण मुलांनी त्याला घेरल्यामुळे त्याला तिथून पळ काढणे अवघड झाले होते.

अचानक तो भामटा विजेच्या चपळाईने खाली वाकला आणि त्याने बुटाच्या वरच्या बाजूला लपवून ठेवलेला धारदार चाकू बाहेर काढून मुलांना धमकावून पळण्याचा प्रयत्न करू लागला. स्वाभाविकच नाइलाज होऊन मुले बाजूला झाली. आता त्या भामट्याचा मार्ग मोकळा झाला.

बाहेर हा सगळा प्रकार सुरू असताना मल्हार त्याची ड्युटी संपल्याने आतील खोलीत आपला चार्ज दुसऱ्या सुरक्षारक्षकाला देऊन युनिफॉर्म बदलून नेहमीचे कपडे चढवत होता. बाहेरचा आरडाओरडा ऐकून तो बाहेर धावला. परिस्थितीचे गांभीर्य त्याच्या लक्षात आले. क्षणाचाही विलंब न करता त्याने मागून जाऊन त्या भामट्याला एकदम मिठी मारली. अचानक झालेल्या या प्रकारामुळे तो भामटा थोडा गोंधळला आणि आपला चाकू धरलेला हात सोडवून घेण्याचा प्रयत्न करू लागला. तेव्हा मल्हारने

त्याचे मनगट घट्ट पकडून ठेवले आणि जोराने पिरगळून त्याच्या हातातील चाकू जमिनीवर पाडला.

(मल्हार सत्याप्पा तपकिरेच्या हातातील चाकू काढून घेतो)

तेवढ्यात दुसरा सुरक्षारक्षक तिकडे धावत आला. त्याने भामट्याला पुन्हा एकदा हॉटेलमध्ये नेण्यासाठी मल्हारला मदत केली.

हॉटेलच्या दाराशी सुरू असलेला गोंधळ पाहायला बघ्यांची गर्दी जमली. जुनैदने भामट्याने बोलावलेल्या टॅक्सीवाल्याला परत जाण्यास सांगितले. टॅक्सीवाला तणतणत तिथून निघून गेला.

दरम्यान हॉटेलच्या मॅनेजरांनी पोलीस स्टेशनमध्ये फोन करून झालेला प्रकार सांगितला होता. पाच-दहा मिनिटांत सायरन वाजवत पोलीस व्हॅन आली. भामट्याची रवानगी आता पोलीस स्टेशनमध्ये होणार होती.

पोलीसांनी हॉटेल मॅनेजर, कॅशिअर, मल्हार, हर्षवर्धन आणि त्याच्या मित्रांना पोलीस स्टेशनमध्ये चौकशीसाठी यायला सांगितले.

त्यावर मॅनेजरसाहेब पोलीसांना म्हणाले, "प्रथम मी आपल्याबरोबर येतो, मी परत आल्यावर मल्हारला पाठवून देईन. सध्या हॉटेलमध्ये बराच गोंधळ उडाल्याने मी परत येईपर्यंत मल्हार इथेच थांबला तर त्याची मदत होईल."

पोलीसांनी या प्रस्तावाला होकार दिला.

पोलीसांनी हातांना दोरी बांधून भामट्याला पोलीस व्हॅनमध्ये बसवले; तरीही तो अजिबात घाबरलेला दिसत नव्हता. त्याचा तो विचित्र आत्मविश्वास पाहून हर्षवर्धनच्या मनात शंकेची पाल चुकचुकली—हा माणूस नेमका इतका निर्धास्त कसा आहे?

प्रकरण 14: अंतीम विजयाची प्रतिक्षा

त्या भामट्याला घेऊन पोलीस व्हॅन लालबाग पोलीस स्टेशनच्या दिशेने निघाली. पोलीसांनी ती रक्कम स्वतःच्या ताब्यात घेतली होती. त्यानंतर लगेचच हॉटेलचे मॅनेजर आणि कॅशिअर स्कूटरवरून निघाले. त्यांच्यामागे जुनैदच्या सायकलवर मोहसीन डबल सीट बसला आणि विवेकने हर्षवर्धनला आपल्या सायकलवर डबल सीट घेतले. नील मात्र त्याच्या सायकलवर एकटाच होता. सर्वजण पोलीस स्टेशनमध्ये पोहोचले.

विनायक चव्हाण नावाचे हवालदार हर्षवर्धनला प्रश्न विचारू लागले आणि त्याची बाजू ऐकून त्यांच्या रजिस्टरमध्ये आवश्यक ती नोंद करू लागले. हर्षवर्धनने हातकणंगले स्थानकावर रेल्वेच्या डब्यात चढल्यानंतर घडलेल्या प्रत्येक गोष्टींचा वृत्तांत कथन केला: "पुणे स्टेशनवर त्या कंपार्टमेंटमधील सत्याप्पा तपकिरे व्यतिरिक्त सर्व प्रवासी उतरून गेले. माझ्याजवळ असलेली रक्कम कोणीतरी लंपास करील या भीतीने मी टॉयलेटमध्ये गेलो आणि सातही नोटा सेफ्टी पिनने शर्टच्या खिशाला टोचून ठेवल्या. शर्टवर मी माझे जर्कीन घातले होते. त्यामुळे सहजासहजी कुणाची त्यावर नजर पडणार नाही असे मला वाटले. शिवाय सावधगिरीचा भाग म्हणून मी मुंबई येईपर्यंत जागे राहण्याचे ठरवले होते. मला जागरण

करण्याची सवय आहे. मी परीक्षेच्या वेळी रात्रभर जागे राहून अभ्यास करत असतो. मला सत्याप्पा तपकिरेने खाण्यासाठी चॉकलेट दिले आणि मी काहीही विचार न करता ते खाल्ले. ते खाल्यावर मला माझी झोप अनावर झाली आणि मी नकळतपणे गाढ झोपी गेलो. जेव्हा मला जाग आली तेव्हा मला माझे डोके जड झाल्यासारखे वाटत होते. मी आजूबाजूला पाहिले तर कंपार्टमेंटमध्ये मी एकटाच होतो. मला भीती वाटली. मी खिसा चाचपून पाहिला तर मला तो रिकामा असल्याचे जाणवले. मी जर्कीनची झीप खाली ओढली आणि शर्टाचा खिसा पाहिला तर तो रिकामा होता. त्यातील सात नोटा गायब झाल्या होत्या आणि त्यांना लावलेली पिन खिशात तशीच उघडलेल्या स्थितीत होती. खिसा तपासताना माझ्या बोटाला ती टोचली आणि रक्त आले. दादर स्टेशनवर ट्रेन थांबल्यानंतर मला गर्दीत सत्याप्पा तपकिरे दिसले. बहुतेक, त्यांनी माझ्या पैशांवर डल्ला मारल्यानंतर दुसऱ्या डब्यात बसून पुढचा प्रवास केला असावा. त्यांना पाहिल्यावर मी CSMT वर उतरण्याऐवजी दादर स्टेशनवर उतरलो आणि त्यांचा पाठलाग करून लालबाग मार्केट परिसरात आलो. त्यांनी काल दुपारी हॉटेल सुखसागर येथे खोली बुक केली, तेव्हा मी हॉटेलसमोरच्या टपरीवजा वाचनालयात होतो. नशिबाने मला

आता माझ्याबरोबर आलेले मित्र भेटले आणि म्हणूनच मी आज सत्याप्पा तपकिरेला पोलीस स्टेशनपर्यंत घेऊन येऊ शकलो."

हवालदार चव्हाणांनी त्याला घरचा आणि भायखळ्याला राहणाऱ्या त्याच्या मावशीच्या घरचा पत्ता, मोबाईल नंबर विचारून घेतला आणि त्याचीही नोंद केली.

"साहेब त्या शेंबड्या पोराच्या सांगण्यावरून नाहक मला इथे अडवून ठेवले आहे, ते काही योग्य नाही. मी महालक्ष्मी एक्स्प्रेसने प्रवासच केलेला नाही. एकतर पोरगा मोठा बनेल दिसतोय किंवा त्याचा काहीतरी मोठा गैरसमज झाला असावा. मी या मुलाला ओळखत नाही. आज सकाळी प्रथमच मी त्याला हॉटेल सुखसागरमध्ये पाहिले. शिवाय खरोखरच त्याच्याकडे पैसे होते याचा पुरावा काय? किंवा समजा त्याच्याकडे पैसे असले असते आणि त्याने स्वतः हरवले असतील किंवा खर्च केले असतील आणि आता घरच्यांना ते समजेल म्हणून माझ्यासारख्या प्रतिष्ठित व्यक्तीवर खोटा आळ घेत आहे. तुम्ही एकदा माझे म्हणणे ऐकून घ्या आणि मला ताबडतोब इथून मोकळे करा. माझी दहा वाजताच्या मुंबई-बेंगळूरू ट्रेनचे तिकीट बुकिंग आहे. वेळ झाला तर माझी ट्रेन चुकेल. अहो, हा पोरटा ज्या सत्याप्पा तपकिरेने आपले पैसे चोरले असे सांगतो आहे, तो मी नव्हेच. माझे नाव

विठोबा लोखंडे आहे. हे पहा माझे पॅन कार्ड," असे म्हणून त्याने पॅन कार्डची झेरॉक्स हवालदार चव्हाणांना दाखवली.

"काका मी खोटे बोलत नाही. त्या नोटा माझ्याच आहेत. मला मिळालेली बक्षिसांच्या तीन हजार आणि आईने खर्चासाठी दिलेले दोनशे, असे मिळून बत्तीसशे रुपये माझ्याजवळ होते आणि तेच हे पैसे आहेत," हर्षवर्धन ठामपणे म्हणाला.

"हे पहा, शांत राहा आणि मी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देऊन चौकशीत सहकार्य करा. आम्हाला हा मुलगा खोटे बोलत असेल याची खात्री पटली, तर लगेच तुम्ही बाहेर जाण्यास मोकळे व्हाल," हवालदार विनायक चव्हाणांनी शांतपणे त्या भामट्याला सांगितले. त्यानंतर त्याची चौकशी सुरू झाली.

"थोडक्यात, तुम्ही सत्याप्पा तपकिरे नसून विठोबा लोखंडे आहात, असे तुमचे म्हणणे आहे. तसेच तुम्ही महालक्ष्मी एक्स्प्रेसने प्रवास करून काल सकाळी दादर स्टेशनवर उतरलेले नाहीत. त्यामुळे या नोटांचा आणि या मुलाच्या चोरीला गेलेल्या नोटांचा काहीही संबंध नाही, असेही तुमचे म्हणणे आहे. बरोबर ना?" हवालदार प्रत्येक शब्द तोलून-मापून बोलत होते.

"होय साहेब, अगदी बरोबर! आपण बरोबर ओळखले. आता मी इथून निघू शकतो ना?" विठोबा लोखंडेने विचारले.

"थोडा धीर धरा. असे असेल तर तुम्ही परवाच्या दिवशी कुठे होतात?"

"साहेब, मी काल सकाळी नागपूर-मुंबई वंदे भारत ट्रेनने मुंबईत आलो. माझा इम्पोर्ट-एक्सपोर्टचा व्यवसाय आहे. त्यासाठी मी काल मुंबईत आलो आणि आज बेंगळुरूला चाललो आहे," तो ऐटीत म्हणाला.

"असं! या मुलांच्या म्हणण्यानुसार तुम्ही बिल भरण्यासाठी दिलेल्या नोटांवर सेफ्टी पिनने पडलेली छिद्रे आहेत. त्याबद्दल आपले काय मत आहे?" हवालदार चव्हाणांनी विचारले.

"मला वाटते, तो कॅशिअरचा काहीतरी गैरसमज झाला असावा. पूर्वी नोटांची बंडले स्टेपल्ड केली जात असत. तसेच कुणीतरी आता केले असेल, असा माझा अंदाज आहे. बाकी मला या नोटा एटीएम मशीनमधून मिळाल्या आहेत," विठोबा लोखंडे म्हणाला.

"असे जर होते, तर तू हॉटेलमधून पळून जाण्याचा प्रयत्न का केलास? त्याहीपेक्षा मोठी गोष्ट म्हणजे तू या लहान मुलांवर चक्क चाकू उगारलास. हा काही लहानसहान अपराध नाही. कदाचित त्यामुळे कुणाला तरी गंभीर दुखापत होऊ शकली असती," हवालदार चव्हाण आता त्या बिलंदर भामट्यावर चांगलेच उखडले होते.

"साहेब, तुमचा काहीतरी गैरसमज होतो आहे. मी काही पळून-बिळून चाललो नव्हतो; उलट रितसर पैसे भरून निघालो होतो. माझी ट्रेन चुकू नये म्हणून मी थोडा घाईत होतो, इतकेच.

आणि चाकूचे म्हणाल, तर अहो, मी फक्त मुलांना घाबरवण्यासाठी गंमत केली. त्या सुरक्षारक्षकाने आपली बहादुरी दाखवण्यासाठी फार्स केला आणि त्यामुळेच 'पराचा कावळा' झाला," विठोबा लोखंडे सराईतपणे उत्तरे देत होता.

आता मात्र हवालदार चव्हाणांचा आवाज चढला होता. "बच्चंमजी, आम्हाला स्टेपल्ड केलेल्या नोटांच्या आणि सेफ्टी पिनमध्ये अडकवून एखाद्या कापडाला जोडलेल्या नोटांच्या छिद्रांतील फरक समजतो. मुकाट्याने खरे काय ते पटापट सांग; नाहीतर आम्हाला तुझ्याकडून सत्य कसे वदवून घ्यायचे, ते चांगलेच समजते."श्री

(हवालदार चव्हाणांनी भामट्यांची लबाडी बरोबर पकडली)

"मला असे घाबरवून बळजबरीने तुम्हाला हवे ते वदवून घेता येणार नाही. मुळात माझा गुन्हा काय, हे अजून तुम्ही सांगू शकत नाही; मग मला गुन्हेगार ठरवणे ही खूप लांबची गोष्ट झाली. मला आपल्याशी बोलण्यात वेळ घालवायचा नाही. तुमच्या मुख्य अधिकाऱ्यांना बोलवा. मी त्यांनाच काय तो जबाब देईन. मला ट्रेन गाठण्याची घाई आहे, तेव्हा लवकर आपल्या वरिष्ठांना बोलवा," आता विठोबा लोखंडे रागाने बोलत होता.

बाहेर चाललेल्या वादावादीचा आवाज वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैवल्य घाटपांडे साहेबांच्या केबिनमध्ये गेला. घाटपांडे साहेब एका महत्त्वाच्या केससंबंधी परगावहून आलेल्या आपल्या बॅचमेटबरोबर चर्चा करण्यात गढून गेलेले होते. मिटींग अर्धवट सोडून ते बाहेर आले; यांच्याबरोबर त्यांचे बॅचमेटही होते. हर्षवर्धनचे लक्ष त्या दोघांकडे गेले आणि तो आश्चर्याने त्यांच्याकडे पाहतच राहिला. घाटपांडे साहेबांच्या सोबत इन्स्पेक्टर प्रधान केबिनमधून तिकडेच येत होते. हर्षवर्धनच्या डोळ्यांसमोर पुन्हा एकदा 'कैरी प्रकरण' उभे राहिले आणि तो मनातून घाबरला, पण शेवटी आलेल्या प्रसंगाला तोंड देण्यासाठी सज्ज झाला.

"अरे, हर्षवर्धन, तू इथे कसा?" इन्स्पेक्टर प्रधानांनी आश्चर्याने विचारले.

एका पोलीस अधिकाऱ्याने आगावू कार्ट्याची दखल घेतलेली पाहून विठोबा लोखंडेचा चेहरा खर्रकन उतरला.

"साहेब, मी कालच महालक्ष्मी एक्स्प्रेसने मुंबईत आलो. पुणे सोडल्यानंतर मला गाढ झोप लागली. या सत्याप्पा तपकिरे उर्फ विठोबा लोखंडेने मला ट्रेनमध्ये चॉकलेट खायला दिले आणि ते खाल्यावर मला गरगरू लागले आणि डोळ्यांवर झापड येऊ लागली. एकप्रकारच्या गुंगीत मी गाढ झोपी गेलो. जाग आली तेव्हा मी कंपार्टमेंटमध्ये एकटा होतो आणि माझ्या खिशात ठेवलेले पैसे नाहीसे झाले होते. मला या माणसावर फक्त संशयच नाही तर, माझी खात्री आहे की यानेच माझे बत्तीसशे रुपये चोरले आहेत," हर्षवर्धनने एका दमात आपली फिर्याद मांडली. घाटपांडे साहेब त्या चुणचुणीत मुलाकडे पाहतच राहिले.

"काय म्हणालास, काल सकाळी तू महालक्ष्मी एक्सप्रेसने मुंबईत आलास? मला सांग तू कुठल्या स्टेशनवर उतरलास? दादर की छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवर?"

"खरेतर मला छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवरच उतरायचे होते, पण दादर स्टेशनवर गर्दीत मला हा भामटा दिसला आणि मी मागचा-पुढचा विचार न करताच दादर स्टेशनवर उतरलो," हर्षवर्धनने सांगितले.

"अरे दादर स्टेशनवर गर्दी काही नवीन गोष्ट नाही, तुला सवय नाही म्हणून तसे वाटले असेल," इन्स्पेक्टर प्रधान म्हणाले.

"तसे फर्स्ट क्लासच्या डब्यात समोरच्या प्लॅटफॉर्मवर बरेच लोक जमलेले होते. मी तिथे जाईपर्यंत तिथे रेल्वे पोलीसही आलेले दिसले. मला त्याच गर्दीतून वाट काढत याचा पाठलाग करावा लागला म्हणून मला ते चांगले लक्षात राहिले," हर्षवर्धन म्हणाला.

हवालदार चव्हाणांना या प्रश्नोत्तराचे नवल वाटत होते, पण घाटपांडे साहेब शांतपणे त्यांचे बोलणे ऐकत असल्याचे दिसून येत होते. का कुणास ठाऊक पण विठोबा लोखंडेचा चेहरा मात्र काळाठिक्कर पडला होता.

"बरे, मग आणखी काय काय तुला आठवते ते आठवून सांग," इन्स्पेक्टर प्रधानांनी हर्षवर्धनला सुचवले.

"खरे सांगू? मला प्लॅटफॉर्मवरून बाहेर पडेपर्यंत नाकी नऊ आले. माझ्या एका हातात सुटकेस होती आणि दुसऱ्या हातात भाजीची पिशवी, त्यामुळे मी पार दमून गेलो होतो; पण हा भामटा मात्र भरभर चालत होता," हर्षवर्धन म्हणाला.

"ते कसे काय? त्याच्याकडे काही सामान नव्हते?" इन्स्पेक्टर प्रधानांनी विचारले.

" सामान? हं, सामान होते ना. त्याच्या पाठीला सॅक होती—ही काय इथे हवालदार साहेबांच्या टेबलाजवळ ठेवली आहे; आणि हातात एक मोठी करड्या रंगाची सुटकेस होती. पण माझ्या सुटकेसारखे त्या सुटकेसला उचलून हातात धरावे लागत नव्हते. तिला चाके होती त्यामुळे ती घेऊन भरभर चालणे त्याला सहज शक्य होते," हर्षवर्धन म्हणाला.

"मग आता ती सुटकेस कुठे आहे?" इन्स्पेक्टर प्रधानांनी हवालदार चव्हाणांकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिले.

"साहेब, मला कल्पना नाही. हॉटेलमधून फक्त ही सॅक घेऊन हा माणूस बाहेर पडत होता," हवालदार चव्हाणांनी उत्तर दिले.

"बोल, ती सुटकेस कुठे आहे?" इन्स्पेक्टर प्रधानांनी विठोबा लोखंडेला दरडावून विचारले.

"कुठली सुटकेस? माझ्याकडे फक्त ही सॅकच आहे. साहेब हे पोरगं काय मनाला येईल ते सांगत सुटलंय, त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवू नका," विठोबा लोखंडे कुचेष्टेने म्हणाला.

हर्षवर्धन त्याचे ते बोलणे ऐकत असताना अचानक त्याच्या मेंदूत काहीतरी चमकले. 'कोणत्याही गुन्ह्यात पुरावाच सर्वात महत्त्वाचा असतो,' असे मोहसीन म्हणाल्यापासून हर्षवर्धन काहीतरी आठवण्याचा प्रयत्न करत होता—त्याला कसलीतरी

पुसटशी जाणीव होत होती पण ती नेमकी कोणत्या संदर्भात आहे, हे उमजत नव्हते. आता त्याच्या मनातील गोंधळ दूर झाला आणि त्याला त्या गोष्टीची आठवण झाली, जी त्याच्या आठवणीतून पुसली गेली होती किंवा त्याच्या मेंदूने त्यावर प्रक्रिया न करताच अडगळीत टाकली होती. त्याच्यासाठी हा 'युरेका' क्षण होता. एक लखलखीत सत्य त्याला गवसले होते. तो पुढे होऊन इन्स्पेक्टर प्रधानांना म्हणाला, "साहेब, मला आपल्याला एकट्याला काहीतरी सांगायचे आहे."

त्याचे हे बोलणे ऐकून सर्वच त्याच्याकडे आश्चर्याने पाहतच राहिले. इन्स्पेक्टर प्रधानांनी त्याला एकट्याला बाजूला बोलावले आणि 'बोल तुला काय सांगायचे आहे?' असा प्रश्न केला.

"इन्स्पेक्टर साहेब, जेव्हा मी हातकणंगले स्टेशनवर ट्रेनमध्ये चढलो, तेव्हा हा इसम माझ्यानंतर डब्यात चढल्याचे मला आता पक्के आठवत आहे. त्यावेळी त्याच्या पाठीवर फक्त सॅकच होती. मी माझी सुटकेस बाकाखाली ढकलून आत सरकवत असताना नंतर आलेल्या एका प्रवाशाने त्याची सुटकेस मलाच बाकाखाली ढकलून ठेवायला सांगितली होती म्हणून मी ओणवे होऊन ते काम करत होतो. त्यावेळीच हा इसम आला. मी सहज त्याला विचारले, 'काका, तुमचेही सामान खाली ठेवायचे असेल तर द्या, मी मदत करतो,' तेव्हा तो मोठ्याने हसत म्हणाला, 'थँक्स, पण

माझ्यापाशी या सॅकव्यतिरिक्त इतर सामान नाही आणि सॅक तर कायमच माझ्या मांडीवर किंवा पाठीवर असते,' त्याचे हे बोलणे आता मला आठवले आणि त्याचा संदर्भ लागला. तसेही दादर स्टेशनवरून तो बाहेर पडताना त्याच्याजवळ असलेली चाकाची सुटकेस डब्यात शिरताना असली असती, तर ती नक्कीच माझ्या लक्षात राहिली असती," हर्षवर्धनने एका दमात सर्व खुलासा केला. त्याच्या विचारांची तार तुटू नये म्हणून तो भरभर बोलत होता.

प्रधान साहेबांचे डोळे एकदम लकाकले. तेवढ्यात त्यांची आणि घाटपांडे साहेबांची नजरानजर झाली आणि ते दोघे पुन्हा घाटपांडे साहेबांच्या केबिनमध्ये गेले. कॅशिअर आणि हॉटेलच्या मॅनेजराना त्यांनी केबिनमध्ये बोलावून घेतले आणि चौकशी केली. घाटपांडे साहेबांच्या सांगण्यावरून मॅनेजरनी आपल्या हॉटेलमध्ये फोन केला आणि विठोबा लोखंडे हॉटेलमध्ये आल्यापासून बाहेर पडेपर्यंतचे सर्व सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे आणि काही महत्त्वाचे आढळल्यास ताबडतोब पोलीस स्टेशनमध्ये फोन करण्याचे आदेश दिले.

अर्ध्या तासात विठोबा लोखंडे हॉटेलमध्ये शिरताना पाठीवर सॅक आणि हातात करड्या रंगाची एक मोठी सुटकेस ओढत घेऊन येताना सीसीटीव्हीवर दिसल्याचा निरोप आला. संध्याकाळी एक

इसम त्याला भेटायला त्याच्या रुमवर येऊन गेल्याचे सीसीटीव्हीत दिसले. येताना त्याच्या हातात काही दिसत नव्हते. मात्र तो इसम परत जाताना त्याच्याकडे ज्युटची एक मोठी पिशवी होती, त्यात बराच मोठा माल असावा असे पिशवीच्या आकारावरून वाटत होते. मात्र पिशवीचे तोंड झिप ओढून बंद केलेले होते. याचा अर्थ ती सुटकेस हॉटेलमधून बाहेर गेल्याचे दिसत नव्हते.

हे समजल्यावर घाटपांडे साहेबांनी हॉटेलमध्ये आणि आजूबाजूला त्या सुटकेसचा कसून तपास करण्यासाठी मॅनेजरना सांगितले. मॅनेजर आणि कॅशिअर यांची चौकशी पूर्ण झाली. त्यांना हॉटेलमध्ये परत जाण्यास परवानगी दिली गेली. त्यांना सुटकेसचा शोध तातडीने घेऊन तसे पोलीसांना लगेच कळवण्याची सूचना केली. जप्त केलेले पैसे पोलीसांच्या ताब्यात राहणार होते.

मॅनेजर आणि कॅशिअर हॉटेलमध्ये परतण्यापूर्वीच सुटकेसची शोधाशोध सुरू झाली होती. विठोबा लोखंडे राहिलेल्या रुममध्ये अथवा इतर कुठल्याही कानाकोपऱ्यात सुटकेस दिसून आली नाही.

मॅनेजर पोलीस स्टेशनमधून परत आल्यावर त्यांनी मल्हारला मुद्दाम थांबवून घेतले आणि त्याला तातडीने सुटकेस शोधण्याचे काम हाती घेण्यास सांगितले. मल्हारने हॉटेलची लाँड्री, स्टोअर

रूम इतकेच नव्हे, तर कॉमन टॉयलेटमध्ये सुटकेसचा शोध घेतला; तिथेही सुटकेस सापडली नाही. मात्र कॉमन टॉयलेटमध्ये शोध घेताना मल्हारला एक गोष्ट खटकली. अधिक बारकाईने पाहिल्यावर टॉयलेटमधील खिडकीच्या काचा कोणीतरी काढून पुन्हा बसवल्यासारख्या वाटत होत्या. एक काच अर्धवट बाहेर आलेली होती, तर दुसरीला तडा गेलेला दिसत होता. ती खिडकी हॉटेलच्या मागच्या बाजूला उघडत होती. बरोबर त्या खिडकीखाली एक रिकामी जागा होती. आजूबाजूच्या इमारतींमधील रहिवासी अनेकदा रात्रीच्या वेळी नको असलेल्या वस्तू तिथे गुपचूप टाकून जात असत.

मल्हारला संशय आला आणि तो हॉटेलच्या मागच्या बाजूला गेला. तशी ती गल्ली नसून एक निमुळता बोळ होता. तिथे त्याला मोडकळीस आलेली एक सुटकेस दिसली. बहुधा रात्रीच्या वेळी टॉयलेटच्या खिडकीच्या काचा काढून विठोबा लोखंडेने ती सुटकेस खाली टाकली असावी.

मल्हार सुटकेस घेऊन हॉटेलमध्ये आला. सुटकेस जरी मोडकळीस आलेली असली तरी करडा रंग आणि इतर गोष्टींवरून ती विठोबा लोखंडेने आणलेली सुटकेस असावी असे वाटत होते. मॅनेजरनी ताबडतोब ती सुटकेस पोलीस स्टेशनमध्ये पाठवण्यास

सांगितले. मॅनेजरनी ती जबाबदारी मल्हारवर सोपवली. मल्हार आपल्या स्कूटरवरून पोलीस स्टेशनमध्ये ती सुटकेस घेऊन गेला.

पोलीस स्टेशनमध्ये शिरल्यावर बाहेर व्हरांड्यात एका बाकावर त्याला हर्षवर्धन आणि मित्रमंडळी बसलेली दिसली. त्यांच्याशी जुजबी बोलून मल्हार आतमध्ये गेला. त्याला सरळ वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैवल्य घाटपांडेसाहेबांच्या केबिनमध्ये बोलावून घेतले गेले. मल्हार ती मोडकी सुटकेस घेऊन आत गेला.

एव्हाना विठोबा लोखंडेची हर्षवर्धनच्या चोरलेल्या पैशांसाठी सुरू असलेली चौकशी संपली होती. संपूर्ण पोलीस स्टेशनमध्ये आता त्या करड्या रंगाच्या सुटकेसबाबत चर्चा सुरू झाली होती.

इन्स्पेक्टर प्रधानांनी त्या सुटकेसची तपासणी केली आणि तिचे फोटो काढून कोणालातरी व्हॉट्सॲपवर पाठवून दिले. 'त्या मोडक्या सुटकेसमागे काय रहस्य असेल?' मल्हार विचारात पडला होता. पाच मिनिटांत प्रधान साहेबांचा मोबाईल वाजला. पलीकडून बहुतेक कोणीतरी महिला बोलत असावी. त्यांच्या बोलण्यातून ते एखाद्या नातेवाईक महिलेशी बोलत असावेत, असा मल्हारचा अंदाज होता.

इन्स्पेक्टर प्रधानांनी मोबाईल बंद केला तेव्हा त्यांचे लक्ष मल्हारकडे गेले. मल्हार अजून उभाच होता. इन्स्पेक्टर प्रधानांनी त्याला बसायला सांगितले आणि नंतर घाटपांडे साहेबांकडे पाहून

म्हणाले, "आपला संशय खरा ठरला. मी पाठवलेले फोटो माझ्या मेहुणीने—नीनाने ओळखले. घाईघाईने त्यावरचे स्टीकर काढले असले तरी शेवटची 'र्णिक' ही अक्षरे अजून ओळखता येतात, आणि हँडलला लावलेली चेन तुटली असली तरी ओळखण्यासाठी पुरेशी आहे. आता संशयित इसम आणि पुरावा आपल्याला मिळालेला आहे. आता सुटकेसमधील माल कोठे आहे? हे पाहणे महत्त्वाचे आहे."

"ते तू आमच्या स्टाफवर सोड. एकदा चौकशीला आत घेतला म्हणजे पोपटासारखा बोलायला लागेल," असे बोलून घाटपांडे साहेब बाहेर गेले.

केबिनमध्ये इन्स्पेक्टर प्रधान आणि मल्हार दोघेच होते. इन्स्पेक्टर प्रधानांनी मल्हारशी बोलायला सुरुवात केली, "हॅलो, यंग मॅन! आज तू मोठीच कामगिरी केली आहेस. त्याबद्दल तुझे अभिनंदन!" असे म्हणून त्यांनी हस्तांदोलनासाठी हात पुढे केला. मल्हारनेही आपला हात पुढे केला आणि त्यांनी हस्तांदोलन केले.

"सर, आपण माझे कशासाठी अभिनंदन करत आहात? मी काही समजलो नाही," मल्हार गोंधळून म्हणाला.

"तू आजचे वर्तमानपत्र वाचले आहेस का? त्यात दादर रेल्वे स्टेशनवर काल झालेल्या सुटकेस चोरीची बातमी आली आहे," प्रधानांनी विचारले.

"हो, सर, मौल्यवान वस्तू असलेली सुटकेस भामट्याने हातोहात लंपास केल्याची बातमी मी वाचली आहे," मल्हार म्हणाला.

"आता तू जी मोडकी सुटकेस घेऊन आलास ना, तीच सुटकेस चोरीला गेली होती," इन्स्पेक्टर प्रधान म्हणाले.

"अरे बापरे! म्हणजे हॉटेलवर उतरलेल्या भामट्यानेच ती सुटकेस पळवली होती की काय?" मल्हार म्हणाला.

"अगदी बरोबर. त्याने त्या बिचाऱ्या हर्षवर्धनचे पैसे ट्रेनमध्ये चोरले आणि स्टेशनवर उतरल्यावर जाताजाता गर्दीचा फायदा घेऊन ती सुटकेस पळवली," इन्स्पेक्टर प्रधानांनी खुलासा केला.

"असे असेल तर तुमच्या अभिनंदनास मी नाही, तर हर्षवर्धन पात्र आहे," मल्हार नम्रपणे म्हणाला.

"अरेच्चा! तू त्याला कसा ओळखतोस? तो तर मुंबईत अगदी नवखा आहे," इन्स्पेक्टर प्रधान म्हणाले.

"त्याची आणि त्याच्या मित्रांच्या 'बी. एन. ग्रुप'ची कालच माझ्याशी ओळख झाली," मल्हारने उत्तर दिले.

"हा 'बी. एन. ग्रुप' काय प्रकार आहे? मी तर प्रथमच ऐकत आहे," प्रधान म्हणाले.

"मी सांगतो. 'बी. एन. ग्रुप' म्हणजे बहिर्जी नाईक ग्रुप. इथल्या शाळकरी मुलांनी बहिर्जी नाईकांचा आदर्श समोर ठेवून या ग्रुपची स्थापना केली आहे. कालचेच उदाहरण घ्या—त्या भामट्याला घेरण्याची सर्व योजना या ग्रुपचीच होती. आता बाहेर हर्षवर्धनबरोबर त्यातील तीन प्रमुख सदस्य उपस्थित आहेत. जुनैद अन्सारी हा संस्थापक सदस्य आहे. नील मुजुमदार हा पैशांचा हिशोब ठेवतो. विवेक शहाणे हा गटप्रमुख म्हणून योजना बनवतो. त्यापैकी मोहसीन मुलाणी हा मात्र इथला नसून रत्नागिरीचा आहे. तो जुनैदचा मामेभाऊ असून सुट्टीसाठी त्याच्या घरी आला आहे. याशिवाय किमान पंचवीस-तीस सर्वसाधारण सदस्य आहेत. जुनैदकडे जुन्या रिक्षाचा एक हॉर्न आहे. हॉर्नचा आवाज ऐकताच सगळे सदस्य लगेच जमा होतात."

इन्स्पेक्टर प्रधान कुतूहलाने ऐकत होते. "अरेच्चा! असे असले तर त्या सर्वांना आत बोलावून आण. त्यांनाही या प्रकरणातील प्रगती समजायला हवी," इन्स्पेक्टर प्रधान म्हणाले.

मल्हार लगबगीने बाहेर गेला आणि सर्वांना घेऊन आत आला.

"हर्षवर्धन, अरे हे मी काय ऐकत आहे? आताच हा मल्हार सांगत होता की 'बी. एन. ग्रुप'च्या मदतीने सत्याप्पा तपकिरे उर्फ विठोबा लोखंडेची चांगलीच नाकेबंदी केलीस आणि त्याचा हॉटेल

सुखसागर सोडून पळून जाण्याचा प्रयत्न यशस्वी होऊ दिला नाहीस. तुमच्या या धाडसाबद्दल मी तुमचे अभिनंदन करतो."

"धन्यवाद साहेब. या मोहिमेत आमच्यासोबत अजून दोन मुली सामील होत्या. त्या म्हणजे माझी मावस बहीण मयुरी आणि तिची मैत्रीण वैष्णवी—जी मल्हारदादाच्या चाळीत राहते. तिथेच मल्हारदादाने आमच्या पाच जणांच्या राहण्याची सोय केली होती. म्हणूनच तर आम्ही सकाळी लवकर हॉटेल सुखसागरवर थडकू शकलो. शिवाय बी. एन. ग्रुपचा अजून एक सदस्य चैतन्य देशमुखही यात सहभागी होता. मोहसीनबरोबर तोच सायकलवर डबलसीट बसून भायखळ्याला माझ्या मावशीकडे माझे सामान आणि माझे खुशालीचे पत्र पोहोचवून आला होता. त्याला घरून रात्री बाहेर राहण्याची परवानगी मिळाली नव्हती," हर्षवर्धन म्हणाला.

"मला या सर्व गोष्टींची काहीच कल्पना नव्हती. असो, तुमची मोहीम तर फत्ते झाली आहे. फक्त तुला तुझे पैसे लगेच देता येणार नाहीत. त्या भामट्याविरुद्ध जेव्हा खटला उभा राहील तेव्हा ते पुरावा म्हणून कोर्टात सादर करावे लागतील. मात्र मी तुला आत्ता माझ्याकडून बत्तीसशे रुपये देऊ शकतो," असे म्हणत इन्स्पेक्टर प्रधानांनी खिशात हात घातला.

"साहेब, नको. सध्या मला त्यांची गरज नाही. मी महिनाभर मुंबईत राहणार आहे. हातकणंगल्याला परत जाताना मला आईच्या पार्लरसाठी काही आवश्यक गोष्टी विकत घ्यायच्या होत्या. म्हणून मी तिला न सांगता माझ्या बक्षिसांच्या रक्कमेतून तीन हजार रुपये आणले होते आणि दोनशे रुपये आईने खर्चासाठी मला दिले होते," हर्षवर्धन म्हणाला.

"ठीक आहे. तू म्हणतोस तर आपण त्यावर नंतर विचार करू. सध्या आपण दुसऱ्याच एका कामगिरीवर काम करत आहोत. संशयित पकडला गेला आहे, मात्र अजून चोरीचा माल पोलीसांच्या हाती लागायचा आहे," इन्स्पेक्टर प्रधान म्हणाले.

"काय? ही दुसरी चोरी म्हणजे पेपरमध्ये प्रसिद्ध झालेली दादर स्टेशनवरील सुटकेस चोरी तर नव्हे?" विवेकने विचारले.

"तुझा अंदाज अगदी बरोबर आहे," इन्स्पेक्टर प्रधान म्हणाले.

"आताच मल्हारदादा हॉटेलमधून मोडकी सुटकेस घेऊन आला. म्हणजे यात त्या भामट्याचा हात दिसतोय," जुनैद सहज म्हणाला.

"अरे व्वा! तुम्ही तर खरोखरचे गुप्तहेर शोभत आहात," इन्स्पेक्टर प्रधान म्हणाले.

तेवढ्यात घाटपांडे साहेब आत आले आणि केबिनमध्ये मुलांची गर्दी झालेली पाहून आश्चर्यचकित झाले. इन्स्पेक्टर प्रधानांनी त्यांना थोडक्यात सर्व गोष्टींची माहिती दिली. त्यांनाही मुलांचे कौतुक वाटले, पण त्यांचे कौतुक करत बसण्याची वेळ नव्हती; ते इन्स्पेक्टर प्रधानांना एक महत्त्वाची माहिती देण्यासाठी केबिनमध्ये आले होते.

घाटपांडे साहेब मुलांना म्हणाले, "मुलांनो, आता आमची एक महत्त्वाची बैठक सुरू होणार आहे. तुमचे पोलीस स्टेशनमधील काम झालेले आहे. मिस्टर मल्हार आणि तुमच्यापैकी एक-दोघांना खटला सुरू झाल्यावर साक्षीदार म्हणून साक्ष द्यायला यावे लागेल. मि. मल्हार, आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद. आपल्यामुळेच आम्हाला तपासासाठी एक दिशा मिळाली."

मल्हारला हॉटेलमध्ये जाऊन मॅनेजरना घडलेल्या गोष्टींचा वृत्तांत सांगायचा होता. त्यानंतरच तो मोकळा होणार होता. काल संध्याकाळपासून त्याला खूप दगदग झाली होती, तरीही त्याला एक प्रकारचे समाधान वाटत होते. जी पोलीसांची नोकरी मिळवण्यासाठी त्याचे प्रयत्न चाललेले होते, त्या नोकरीत त्याला अनौपचारिकपणे काम करण्याची संधी मिळाली होती आणि त्याने त्या संधीचे सोने केले होते. त्याचे मन समाधानाने भरून गेले होते.

मॅनेजरना रिपोर्टिंग करून मल्हार शीळ घालतच बाहेर आला. समोरच्या टपरीवजा वाचनालयात हर्षवर्धन आणि बी. एन. ग्रुपचे सदस्य त्याची वाट पाहत उभे होते. त्याचा निरोप घेऊन घरी परतण्याचा त्यांचा विचार होता. मल्हारने त्यांना घराकडे येण्याचा आग्रह केला आणि सर्वांनी त्याला होकार दिला.

सगळेजण आनंदाने मल्हारच्या घरी जाण्यासाठी निघाले. चाळीत पोहोचल्यावर मुले आपल्या सायकली पार्किंगमध्ये लावत असताना तिथे त्यांना मयुरीची इलेक्ट्रिक स्कूटर पार्क केलेली दिसली. सर्वांनाच खूप आनंद झाला.

मयुरी वैष्णवीकडे आली होती. तिथे इतक्या सनसनाटी गोष्टी घडत असताना तिला एकटीला आपण दूर असल्याची खंत वाटत होती, म्हणूनच ती वैष्णवीला भेटायला आली होती.

वैष्णवीने सर्वांना आपल्या घरी चहासाठी बोलावले. मल्हार मात्र एका अटीवर येण्यास तयार झाला. ती अट म्हणजे आतापर्यंत मिळवलेल्या यशाचे सेलिब्रेशन म्हणून त्याने सर्वांना पार्टी द्यायची होती. सर्वांनी 'हुर्रे!' म्हणून मान्यता दिली.

मल्हारने पिझ्झा आणि केकची ऑर्डर दिली आणि अर्ध्या तासात वैष्णवीच्या घरी त्याची डिलिव्हरी मिळाली. तोपर्यंत मुलांच्या गप्पा सुरू होत्या. वैष्णवीच्या आईला एव्हाना मुलांच्या

पराक्रमाची आणि साहसाची माहिती मिळाली होती. त्या चहाची तयारी करत होत्या.

गप्पागोष्टींमध्ये पार्टी रंगात आली होती. एका प्रकारच्या ऊर्जेने वातावरण भरून गेले होते. शेवटी विवेकला सगळ्यांना आपापल्या घरी जाण्याची आठवण करून द्यावी लागली.

मयुरी तिथे आली असल्याने हर्षवर्धनला भायखळ्याला सोडण्याचा प्रश्न उरला नव्हता. सर्वांनी एकमेकांचा निरोप घेतला.

तसे पाहायला गेले तर 'मिशन' अजून पूर्ण झालेले नव्हते. अजून त्या मोडक्या सुटकेसच्या प्रकरणाचा निकाल लागायचा होता. सर्व गुंता जोवर सुटत नाही, तोवर व्हॉट्सॲप ग्रुप सुरूच असणार होता.

प्रकरण 15: अकल्पित आनंद

हर्षवर्धन मयुरीताईच्या स्कूटरवरून भायखळ्याला माया मावशीच्या घराकडे निघाला. स्कूटरवर मागे बसून तो कुतूहलाने आजूबाजूला निरखून पाहत होता. मुंबईच्या अथांग गर्दीतून वाट काढत शेवटी ते एकदाचे मावशीच्या घराजवळ पोहोचले.

माया मावशीचा फ्लॅट तिसऱ्या मजल्यावर होता. लिफ्टमधून वर जाताना हर्षवर्धनला खूप गंमत वाटली. तसा तो कोल्हापूरला एका मॉलमध्ये लिफ्टमध्ये बसला होता, पण एखाद्याच्या घरी लिफ्टने जाण्याचा त्याचा हा पहिलाच प्रसंग होता. लिफ्ट तिसऱ्या मजल्यावर थांबली. समोरच मावशीचा '३०१' क्रमांकाचा फ्लॅट होता. दारात पोहोचताच मयुरीने उत्साहाने बेल वाजवली आणि माया मावशीने हसतमुखाने दार उघडले.

हर्षवर्धन आत पाऊल टाकणार, तितक्यात आतून आजीचा आवाज आला, "अगं मयुरी, थांब! त्याला आधी दारातच उभा राहू दे."

(आजी हर्षवर्धनला ओवाळण्यासाठी बाहेर येत आहे)

आजी हातात पाण्याचा तांब्या आणि वाटीत मूठभर तांदूळ घेऊन दारात आली. तिने हर्षवर्धनच्या पायावर थोडे पाणी ओतले आणि त्याच्या डोळ्यांवर पाण्याचा थंडगार हात फिरवला. मग उजव्या मुठीत तांदूळ घेऊन, ती मूठ तिने हर्षवर्धनच्या चेहऱ्यावरून उजवीकडून गोलाकार फिरवून डाव्या बाजूच्या कोपऱ्यात फेकली; आणि डाव्या मुठीतील तांदूळ उजव्या कोपऱ्यात फेकले. शेवटी औक्षण करून आजीने त्याच्या

चेहऱ्यावरून मायेने हात फिरवला आणि आपली बोटे कपाळाच्या दोन्ही बाजूंना कडाकडा मोडत त्याची 'अलाबला' घेतली. त्यानंतरच हर्षवर्धनला घरात प्रवेश मिळाला.

"हुश्श!" करत हर्षवर्धन पंख्याखाली बसला. आजी आणि मावशी त्याच्याकडे कौतुकाने पाहत होत्या.

"अरे हर्षवर्धन, काल सकाळपासून आमचा जीव पार टांगणीला लागला होता रे! आम्ही तर तू हरवल्याची तक्रार करायला पोलिसांतच निघालो होतो. बरं झालं, तुझ्या त्या नवीन मित्रांनी तुझं सामान वेळेत घरी आणून दिलं, म्हणून मनाला थोडा दिलासा मिळाला. नंतर मयुरीने तुझ्या मित्रांच्या त्या 'बी. एन. ग्रुप'बद्दल माहिती दिली, तेव्हा कुठे आमचा जीव भांड्यात पडला. तुझी आजी तर काळजीपोटी गणपती पाण्यात घालून बसली होती! तू सुखरूप आहेस हे कळल्यावरच गणपतीबाप्पाची सुटका झाली. आता जास्त बोलू नको, हातपाय धुवून घे आणि सरळ जेवायलाच बस," मावशी एका दमात बोलून गेली.

"हो मावशी, अजून तुम्ही सगळे जेवायचे थांबलेले असणार. आपण एकत्रच जेवायला बसू या," हर्षवर्धन म्हणाला.

तोपर्यंत आजीने वाढायची तयारी केली होती. मयुरीचे बाबा सकाळी लवकर ऑफिसला गेलेले होते. जेवणाचा बेत अगदी फक्कड होता. वरण, भात, चपात्या, उकडलेल्या बटाट्याची

भाजी, डाळिंब्यांची उसळ, ओल्या नारळाची चटणी, काकडीची कोशिंबीर आणि गोड म्हणून हर्षवर्धनच्या आवडीचे उकडीचे मोदक केलेले होते. आयत्यावेळी हॉटपॉटमधून आजीने मोदक काढून वाढले आणि त्यावर साजूक तुपाची धार सोडली. हर्षवर्धन अगदी मनापासून जेवत होता आणि आजी आग्रह करून वाढत होती. काल गणपतीबाप्पाला पाण्यात ठेवल्याबद्दल आज त्याच्यासाठी तिने स्वतः नैवेद्याचा स्वयंपाक बनवला होता.

सगळ्यांची जेवणे आटोपली. आज तसा सगळ्यांच्या जेवणाला उशीरच झाला होता. माया ताई मागची आवराआवर करून हॉलमध्ये आल्या, तेव्हा हर्षवर्धन आजीला आईची खुशाली सांगत होता; पण त्याला मनातून आईची काळजी वाटत होती. ठरल्याप्रमाणे काल तो मावशीच्या घरी पोहोचला नसल्याचे तिला समजले असेल, तर ती नक्कीच मुंबईला यायला निघाली असेल, असे त्याला वाटत होते. न राहवून त्याने आजीला विचारले, "आजी, काल मी घरी आलो नाही, ही गोष्ट आईला समजली आहे का?"

"अरे, आम्हालाच तुझी खूप काळजी वाटत होती. तिला फोन करून सांगावे, असे मला वाटत होते. पण मयुरीच्या बाबांनी, 'आपण अगोदर इथे चौकशी करून पाहूया आणि नंतरच निर्मलाला फोन करूया,' असे म्हटल्याने आम्ही तिला काही

कळवले नाही. मयुरीचे बाबा चौकशीसाठी बाहेर पडतच होते, त्याच वेळी मोहसीन आणि चैतन्य अगदी देवासारखे तुझे सामान आणि पत्र घेऊन आले, म्हणून पुढची चौकशी टळली. तरीही तू परत घरी येईपर्यंत तिला याबाबत काहीही सांगायचे नाही, असे आम्ही ठरवले होते. आज सकाळी तिचा फोन आला होता. तिला तुझ्याशी बोलायचे होते; पण तू मयुरीबरोबर बाहेर गेला आहेस, असे सांगून वेळ निभावून नेली," आजी म्हणाली.

माया ताईंनी त्याला, रेल्वे प्रवासात नेमके काय काय घडले? असा प्रश्न केला आणि मग हर्षवर्धनने रेल्वेत पैशांची चोरी झाल्यापासून पोलिस स्टेशनमध्ये झालेला सर्व वृत्तांत सांगितला.

बोलण्याच्या ओघात मोडक्या सुटकेसचा विषयही निघाला; पण हर्षवर्धनला त्याविषयी फारशी माहिती सांगता आली नाही. बहुतेक त्या मोडक्या सुटकेसचा संबंध CSMT स्टेशनवरून चोरीला गेलेल्या सुटकेसशी असावा, असे त्याला वाटत होते; पण त्यासंबंधी तपासात इन्स्पेक्टर प्रधान कसे सहभागी झाले आहेत, हा प्रश्न त्याला पडला होता. मात्र त्याने तो बोलून दाखवला नाही.

अचानक त्याला इन्स्पेक्टर प्रधानांनी त्या सुटकेसचे फोटो व्हॉट्सॲपवर कोणाला तरी पाठवून दिले होते, असे मल्हारने सांगितल्याचे आठवले. कदाचित त्यांच्या परिचितांपैकी कोणाची

तरी ती सुटकेस असावी, असा मल्हारप्रमाणेच त्याचाही समज झाला होता; पण त्याबद्दल त्याला खात्री नव्हती.

हर्षवर्धनला गेले दोन दिवस शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या खूपच त्रासाचे गेले होते, म्हणून मावशीने त्याला जबरदस्तीने विश्रांती घेण्यासाठी बेडरूममध्ये पाठवले. जेमतेम तासभर तो झोपण्यासाठी गेला, पण झोप येईना, म्हणून तो हॉलमध्ये परत आला.

मयुरीने त्याच्याजवळ दिलेला आजीचा फोन त्याने घरी आल्यावर परत केला होता. आजीने तो तसाच टेबलावर ठेवला होता. इतक्यात आजीच्या फोनची रिंग वाजू लागली. माया ताईंनी पाहिले तर लँडलाइन नंबरवरून फोन येत होता. माया ताईंनी फोन उचलला. "हो, हो, नंबर बरोबर आहे... असे आहे का?... नक्की, अगदी नक्कीच आम्ही येऊ... किती वाजता?... काय, सहा वाजता सुरू होणार?... हो, हो, तोपर्यंत आम्ही पोहोचतो. धन्यवाद."

मावशीने फोन खाली ठेवला. मयुरी आणि हर्षवर्धन एकमेकांकडे प्रश्नार्थक नजरेने पाहत होते.

"ए आई, कोणाचा फोन होता? आणि नुसते 'हं-हं' काय करत होतीस? सहा वाजता काय सुरू होणार आणि कुठे

पोहोचायचे आहे? धड एक गोष्ट समजली नाही," मयुरी वैतागून म्हणाली.

हर्षवर्धनलाही मावशीचे फोनवरचे बोलणे ऐकून काहीच अर्थबोध झाला नव्हता.

माया ताई, मयुरीच्या प्रश्नाचे उत्तर न देता, आजी झोपलेल्या ठिकाणी गेल्या आणि त्यांना उठवत म्हणाल्या, "ए आई, अगं उठ लवकर आणि देवासमोर साखर ठेव. आपल्याला बाहेर जायचे आहे."

आजी उठल्या आणि म्हणाल्या, "अगं, झाले तरी काय? ते आधी सांग तरी! मला तर बाई काहीच समजेनासे झाले आहे."

"अगं, आता पोलीस उपायुक्तांच्या कार्यालयातून फोन आला होता. संध्याकाळी सहा वाजता तिथे पत्रकार परिषद भरणार आहे आणि उपायुक्तांच्या हस्ते आपल्या हर्षवर्धनचा आणि त्याला मदत करणाऱ्या बी. एन. ग्रुपच्या सदस्यांचा सत्कार केला जाणार आहे. आपण सर्वांनी तिथे उपस्थित राहावे, असे फोनवरून आमंत्रण दिले आहे. आता चार वाजत आले आहेत. यांना ऑफिसमध्ये फोन करून लवकर घरी या म्हणून सांगायला हवे," मावशी गडबडीने म्हणाल्या.

हे ऐकून हर्षवर्धन आणि मयुरीला आश्चर्याचा धक्काच बसला; पण सर्वांत अगोदर मयुरी धक्क्यातून सावरली आणि हर्षवर्धनला मिठी मारत म्हणाली, "हर्षा! भावा, तुझे मनापासून अभिनंदन! तू तर अगदी कमालच केलीस! असा माझ्याकडे बघत बसू नकोस, आपल्याला घाई करायला हवी. बाबा ऑफिसमधून आले की आपल्याला लगेच निघायला हवे. ए, आई! मी कार्यक्रमाला जाताना कुठला ड्रेस घालू? तू आणि आजी दोघी छानपैकी तयार व्हा. तिथे उगाच गबाळ्यासारखे गेलो तर आपल्याला सगळे हसतील बरं," मयुरी सर्वांना लौकर आटोपून तयार होण्यासाठी गडबड करत होती.

मायाताईंनी मयुरीच्या बाबांना फोन केला आणि पोलीस उपायुक्तांच्या हस्ते हर्षवर्धनचा सत्कार होणार असल्याची बातमी सांगितली. कार्यक्रम सहा वाजता असल्याने ऑफिसातून लवकर येण्यासाठी बजावून सांगितले.

मयुरीने आजीचा फोन घेऊन बी. एन. व्हॉट्सॲप ग्रुपवर मेसेज पाहिले तर ग्रुपवर या कामगिरीत भाग घेतलेल्या सर्व सदस्यांना त्यांच्या पालकांसह आमंत्रण मिळाले होते. प्रत्येकजण उत्साहात कार्यक्रमाला जाण्यासाठी तयारी करत होता.

मयुरीचे बाबा माया ताईंच्या अपेक्षेपेक्षा लवकर आले. त्यांच्या ऑफिसमध्ये कालपासून हर्षवर्धनची चर्चा सुरू होती, आणि

आता त्याचा सत्कार होणार असल्याचे समजल्यावर त्यांच्या वरिष्ठांनी त्यांना आनंदाने लवकर जाण्याची परवानगी दिली, मात्र उद्या येताना न विसरता पेढे आणण्याची सूचना केली.

हर्षवर्धनच्या आईने बाहेर जाताना घालण्यासाठी दोन चांगले ड्रेस इस्त्री करून सुटकेसमध्ये व्यवस्थितपणे ठेवले होते. त्यापैकी निळसर रंगाचा ड्रेस घालावा, असे मयुरीने सुचवले आणि त्यालाही तिची सूचना आवडली. तिने स्वतःसाठी तिचा आवडता मोरपंखी रंगाचा अनारकली ड्रेस निवडला होता. कार्यक्रमाची वेळ सहाची होती, निदान पंधरा मिनिटे अगोदर तिकडे पोहोचणे अपेक्षित होते. अखेर सर्वजण घाईगडबडीत तयार होऊन भायखळा येथील मुंबई पोलीस परिमंडळ–3 च्या कार्यालयातील सभागृहात पोहोचले. तिथे पत्रकार परिषदेसाठी पत्रकारांची नेहमीप्रमाणे गर्दी झालेली होतीच; पण आज बी. एन. ग्रुपचे म्हणजे बहिर्जी नाईक ग्रुपचे छोटे शिलेदार आपल्या पालकांसह आलेले होते. मल्हारची आई गावी गेल्यामुळे त्याच्यासोबत वैष्णवी आणि तिची आई आली होती. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद, उत्कंठा, उत्साह आणि अभिमान ओसंडून वाहत होता.

कार्यक्रम सुरू होण्यास अजून थोडा वेळ होता. तोपर्यंत एकमेकांशी ओळख करून घेणे सुरू होते. विशेषतः मुलांच्या

हसण्या-बोलण्याच्या आवाजाने एरवी गंभीर असणाऱ्या सभागृहातील वातावरण एकदम खेळीमेळीचे झाले होते.

विशेष अतिथींसाठी स्वतंत्र आसनव्यवस्था केली होती. हर्षवर्धनला तिथे इन्स्पेक्टर प्रधानांची पत्नी आणि मुलगी मिताली बसलेली दिसली; पण त्याने पुढे जाऊन भेट घेण्याचे टाळले.

"शांतता, शांतता! थोड्याच वेळात कार्यक्रमाची सुरुवात होत आहे," व्यासपीठावरून घोषणा होताच सभागृहात शांतता पसरली. सर्वजण उत्सुकतेने व्यासपीठाकडे पाहू लागले. काही क्षणांतच पोलीस उपायुक्त मा. ज्ञानेश्वर नेवासेकर यांचे आगमन झाले. त्यांच्या पाठोपाठ घाटपांडे साहेब, इन्स्पेक्टर प्रधान आणि इतर मान्यवर व्यासपीठावर स्थानापन्न झाले. इन्स्पेक्टर प्रधानांना कार्यक्रमाचे विशेष अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

मंजिरी देसाई मॅडम यांनी मान्यवरांची ओळख करून दिली आणि कार्यक्रमाची प्रस्तावना करण्यासाठी घाटपांडे साहेबांना विनंती केली.

घाटपांडे साहेब उभे राहिले आणि त्यांनी आपल्या भाषणास सुरुवात केली.

"मित्रहो, आजची ही पत्रकार परिषद आमच्या पोलिस खात्याच्या दृष्टीने विशेष महत्त्वाची आहे. आजच्या या यशामध्ये

आमच्या कर्मचाऱ्यांबरोबरच काही जागरूक नागरिकांचाही मोलाचा सहभाग आहे. त्यामध्ये मुंबईत पूर्णपणे नवखा असलेला हर्षवर्धन मोहिते, त्याला प्रथमच भेटलेला जुनैद अन्सारी आणि त्याचे मित्र यांचा विशेष उल्लेख करावा लागेल.

याशिवाय हॉटेल सुखसागरचे सुरक्षारक्षक मल्हार दळवी यांचेही आम्हाला बहुमोल सहकार्य लाभले. त्यांनी केवळ हर्षवर्धन आणि त्याच्या मित्रांना मदत केली असे नाही, तर त्यांच्या दक्षतेमुळे आम्हाला एक महत्त्वाचा पुरावा मिळाला. त्या पुराव्यामुळे संशयित सत्याप्पा तपकिरे उर्फ विठोबा लोखंडे याच्याविरुद्धचा गुन्हा सिद्ध करण्यास मदत झाली. इतकेच नव्हे, तर आणखी एका गुन्ह्याच्या तपासासाठीही महत्त्वाचे धागेदोरे मिळाले.

या संपूर्ण तपासाची माहिती आणि त्यामागील रंजक घडामोडी आपले विशेष अतिथी इन्स्पेक्टर शत्रुंजय प्रधान आपल्यासमोर मांडतील. इन्स्पेक्टर प्रधान हे हातकणंगले पोलीस स्टेशनचे प्रमुख अधिकारी असून माझे बॅचमेटही आहेत. त्यामुळे अधिक वेळ न घेता मी त्यांना बोलण्याची विनंती करतो.

धन्यवाद."

यानंतर मंजिरी देसाई मॅडम यांनी इन्स्पेक्टर प्रधानांना बोलण्याची विनंती केली.

इन्स्पेक्टर प्रधान बोलण्यासाठी उठून उभे राहिले. मा. पोलीस उपायुक्त श्री. ज्ञानेश्वर नेवासेकर साहेब, घाटपांडे साहेब, व्यासपीठावर उपस्थित असलेले मान्यवर, सहकारी पोलीस अधिकारी व कर्मचारी, उपस्थित पत्रकारबंधू आणि या मोहिमेत सहभागी झालेले बालमित्र तसेच त्यांचे कुटुंबीय, या सर्वांना मी मनापासून धन्यवाद देतो.

या पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यामागचे कारण जाणून घेण्यास आपण सर्वजण उत्सुक असाल, याची मला कल्पना आहे. त्याबरोबरच इथे ज्यांचा सत्कार करण्यात येणार आहे, त्यांनाही त्यामागचे आणखी एक महत्त्वाचे कारण अद्याप माहिती नाही.

असो, मी आपल्याला जास्त प्रतीक्षा करायला न लावता सरळ मुद्द्यावर येतो.

आपल्याला नुकतेच घाटपांडे साहेबांनी सांगितले की, मी कोल्हापूर विभागातील हातकणंगले पोलीस स्टेशनचा प्रमुख आहे. आपल्या चाणाक्ष पत्रकारबंधूंना असा प्रश्न पडला असेल की, दुसऱ्या विभागातील अधिकाऱ्याचे या परिषदेत काय काम असावे? खरोखरच हा एक चमत्कारिक योगायोग म्हणावा लागेल.

दोन दिवसांपूर्वी आमच्या हातकणंगले गावातील मुलगा— हर्षवर्धन मोहिते सुट्टीसाठी महालक्ष्मी एक्सप्रेसने एकट्याने मुंबईला येण्यास निघाला. त्याच्याजवळ त्याच्या सांगण्याप्रमाणे

बत्तीसशे रुपये इतकी रक्कम होती आणि त्याने ती शर्टच्या खिशात सेफ्टी पिनने टोचून त्यावर जर्कीन ओढले होते, जेणेकरून ती कुणाला लंपास करता येणार नाही याची त्याने पुरेपूर काळजी घेतली होती.

त्याच्या डब्यात पुणे स्टेशनवर फक्त एक व्यक्ती सोडल्यास इतर सर्व प्रवासी उतरून गेले आणि नवीन कोणीही प्रवासी चढला नाही. त्या एकमेव सहप्रवासी सत्याप्पा लोखंडेला बहुधा त्याच्याकडे पैसे असावेत असा संशय आला होता. त्याने हर्षवर्धनला प्रेमाने चॉकलेट खायला दिले आणि त्याने ते नकळत खाऊन टाकले.

चॉकलेट खाल्ल्यानंतर त्याला गरगरायला लागले आणि काही वेळातच त्याला गुंगी येऊन गाढ झोप लागली. जाग आली तेव्हा त्याचा सहप्रवासी गायब झाला होता. त्याने घाबरून आपला खिसा चाचपून पाहिला, तर त्याने इतक्या काळजीपूर्वक ठेवलेले पैसे गायब झाले होते.

खरे तर हर्षवर्धनला CSMT स्टेशनवर उतरायचे होते; पण दादर स्टेशनवर ट्रेन थांबल्यावर त्याला गर्दीत त्याचा सहप्रवासी सत्याप्पा तपकिरे दिसला. तो गर्दीतून वाट काढत बाहेर निघत होता. विजेच्या चपळाईने हर्षवर्धन दादर स्टेशनवर उतरला आणि त्याचा पाठलाग करत स्वामीनारायण मंदिराजवळील

बसस्टॉपपर्यंत पोहोचला. तो भामटा एका बसमध्ये चढला, तसा हर्षवर्धनही त्याच बसमध्ये चढला. त्याच्यापाशी बसचे तिकीट काढण्यासाठी पैसे नव्हते. एका दयाळू प्रवाशाने त्याचे तिकीट काढून दिले. सिद्धिविनायक मंदिराच्या थांब्यावर भामटा उतरला आणि त्याच्या मागोमाग हर्षवर्धनही उतरला. हर्षवर्धन त्याच्या हालचालींवर दूरून लक्ष ठेवून होता. थोडे अंतर गेल्यावर तो भामटा एका रेस्टॉरंटमध्ये गेला आणि रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला लपून हर्षवर्धन त्याच्यावर नजर ठेवून उभा होता.

यावेळी जुनैद अन्सारी या मुलाने त्याला गंमत म्हणून घाबरवण्यासाठी त्याच्या पाठीमागे जाऊन रिक्षाचा हॉर्न वाजवला. सुरुवातीला त्यांची वादावादी झाली; पण नंतर जुनैदला परिस्थितीचे गांभीर्य समजले. त्याने हर्षवर्धनला धीर दिला आणि आपल्या ग्रुपच्या मुलांना बोलावून घेत त्या भामट्याचा पाठपुरावा करण्यासाठी हर्षवर्धनला मदत करण्याचे ठरवले. त्यासाठी त्यांना पैशांची गरज लागणार होती. मुलांनी स्वतःकडे असलेले पैसे एकत्र केले आणि त्यातून लागेल तो खर्च करण्याचे ठरवले.

भामटा नाश्ता झाल्यावर टॅक्सीतून लालबागच्या दिशेने निघाला. मुलांनी दुसरी टॅक्सी करून त्याचा पाठलाग केला. सुदैवाने मुलांना भेटलेले टॅक्सीवाले काका सहृदय होते. त्यांचाही मुलांना उपयोग झाला. दरम्यान, हर्षवर्धनचे सामान मोहसीन

आणि चैतन्य नावाच्या मुलांनी हर्षवर्धनच्या मावशीच्या घरी सायकलवरून भायखळ्याला पोहोचवले आणि हर्षवर्धनची चिठ्ठी दिली. मावशीच्या कुटुंबाला दिलासा मिळाला. त्याची मावसबहीण मयुरी खात्री करून घेण्यासाठी त्या मुलांबरोबर हर्षवर्धनला भेटली.

दरम्यान, भामट्याने लालबागमधील एका हॉटेलमध्ये खोली घेतली होती. मुले रात्रभर एका टपरीवजा वाचनालयात थांबून त्याच्यावर नजर ठेवणार होती. यावेळी त्यांच्या मदतीला मल्हार गायकवाड आला. तो मयुरीच्या मैत्रिणीचा शेजारी असून हॉटेल सुखसागरमध्ये सुरक्षा रक्षक म्हणून कामाला आहे. त्याने मुलांना आपल्या खोलीत झोपायला सांगितले आणि स्वतः रात्रपाळीसाठी हॉटेलवर गेला.

भामटा सकाळी लवकर हॉटेल सोडणार असल्याचे समजल्याने मल्हारने मुलांना सावध केले. मुले सकाळी लवकर हॉटेलजवळ जमली. सत्याप्पा तपकिरेने बिल भरण्यासाठी हर्षवर्धनच्या चोरलेल्या नोटा दिल्या. ते पाहून हर्षवर्धनने कॅशिअरला त्या नोटा आपल्या असून त्यांवर सेफ्टी पिनची छिद्रे आहेत, असे सांगून त्याची खात्री पटवली. आता आपली सुटका होणे शक्य नाही हे पाहून भामट्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र बाहेर मुलांनी त्याची वाट अडवली होती. शेवटचा प्रयत्न

म्हणून भामट्याने मुलांना चाकूचा धाक दाखवून पळ काढण्याचा प्रयत्न केला. पण अत्यंत चपळाईने मल्हारने मागून भामट्याला घट्ट पकडले आणि त्याच्या हातातील चाकू खाली पाडला. यानंतर हॉटेलच्या मॅनेजरने लालबाग पोलीस स्टेशनला फोन करून कळवले आणि आरोपी आमच्या ताब्यात आला. सत्याप्पा तपकिरेची चौकशी सुरू केल्यानंतर त्याने आपण सत्याप्पा तपकिरे नसून 'विठोबा लोखंडे' आहोत असा दावा केला. तरीही हर्षवर्धनचे पैसे चोरणारा इसम तोच आहे, ही गोष्ट खरी ठरली.

यासाठी हर्षवर्धनला जुनैद आणि त्याच्या मित्रांची मोलाची मदत झाली. या मोहिमेसाठी मुलांनी आपल्या पॉकेट मनीतून फंड उभा केला. नील मुजुमदार हा मुलगा पैशांचा चोख हिशोब ठेवण्याचे काम करतो. विवेक शहाणे हा या ग्रुपचा मेंदू असून निर्णय प्रक्रियेत त्याची महत्त्वाची भूमिका असते. मोहसीन मुलाणी हा रत्नागिरीचा राहणारा असून सुट्टीसाठी तो आपल्या आत्याकडे आला आहे. जुनैद आणि तो आतेमामे भाऊ आहेत. मोहसीन आणि चैतन्य चिटणीस हर्षवर्धनचे सामान आणि निरोप भायखळ्याला हर्षवर्धनच्या मावशीकडे पोहोचवायला गेले होते.

या मुलांच्या बाबतीतली एक अतिशय हृद्य गोष्ट मला सांगितली पाहिजे—ती म्हणजे त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या गुप्तहेर खात्याचे प्रमुख बहिर्जी नाईक यांचा आदर्श

समोर ठेवत आपल्या ग्रुपचे नाव ठेवले आहे. जुनैद अन्सारी हा संस्थापक सदस्य असून त्याने स्नेहसंमेलनात बहिर्जी नाईकांची भूमिका केली होती. तेव्हापासून त्याने बहिर्जी नाईकांना आपला आदर्श मानायला सुरुवात केली आणि आपल्या मित्रमंडळींना एकत्र करून बी. एन. ग्रुपची स्थापना केली.

मल्हार गायकवाडने सुरक्षारक्षक म्हणून आरोपीला अडवण्याचे काम आपल्या जीवावर उदार होऊन केले. शिवाय या मुलांना स्वतःच्या घरी राहण्याची व्यवस्था करून त्यांचीही काळजी घेतली.

'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात,' या उक्तीप्रमाणे मला या मुलांमध्ये उद्याचे 'रॉ एजंट', शेरलॉक होम्स अथवा व्योमकेश बक्षी दिसतात.

असो, आपली उत्सुकता जास्त ताणून न धरता या यशस्वी मोहिमेमुळे दुसऱ्या एका मोठ्या गुन्ह्याची उकल होण्यासाठी मदत कशी झाली, हे मी आता आपणास सांगणार आहे.

खरे सांगायचे झाले तर मी काल तातडीने दुसऱ्याच एका महत्त्वाच्या कामासाठी मुंबईत आलो होतो. काल सकाळी कोल्हापूर-मुंबई महालक्ष्मी एक्स्प्रेसने—ज्या ट्रेनने हर्षवर्धन मुंबईला आला, त्याच ट्रेनने माझी मेहुणी नीना कर्णिक आपल्या कुटुंबासह प्रवास करत होती. दादर स्टेशनवर तिच्या सामानातील

एक सुटकेस कोणीतरी हातोहात लांबवली. घरातील एका विवाहसमारंभासाठी ती येत असल्याने दागदागिने आणि इतर मौल्यवान ऐवज असलेली सुटकेस चोरीला गेली होती. तिच्या पतीने रितसर रेल्वे पोलिसांत तक्रार नोंदवली आणि लगेच तपास सुरू झाला. त्यावेळी प्लॅटफॉर्मवर अतिशय गर्दी असल्याने गुन्हेगार शोधण्यासाठी सीसीटीव्हीचे फुटेज पुरेसे नव्हते. शिवाय जर का भामटा रेल्वे स्टेशनमधून बाहेर पडला असला, तर पुराव्याअभावी या अफाट मुंबईत त्याचा शोध घेणे अशक्यप्राय गोष्ट होती.

मला ही बातमी समजल्यावर मी तातडीने मुंबईला आलो. रेल्वे पोलिसांशी माझी चर्चा झाली; त्यांचे प्रयत्न सुरूच होते. आज सकाळी मी लालबाग पोलीस स्टेशनमध्ये माझे सहकारी घाटपांडे साहेबांना भेटायला आलो होतो. त्यांच्याकडून काही मदत होते का, हे पाहण्याचा माझा हेतू होता. आम्ही त्यांच्या केबिनमध्ये याच विषयावर बोलत असताना बाहेर मोठमोठ्याने वादावादी सुरू होती, ती ऐकून आम्ही दोघे बाहेर आलो. मला तिथे हर्षवर्धन दिसला. मी त्याला चांगलाच ओळखतो. माझ्या मुलीच्याच वर्गात तो शिकत आहे. त्याचे पैसे चोरीला गेल्याचे समजल्यावर मी त्याच्याकडे प्राथमिक चौकशी सुरू केली.

दादर स्टेशनवर माझ्या मेहुणीची सुटकेस चोरीला गेली, त्यावेळी नेमका हर्षवर्धन तिथे होता हे मला त्याच्या बोलण्यावरून समजले. त्यासंदर्भात काही धागेदोरे मिळतात का, हे पाहण्यासाठी मी त्याच्याकडे चौकशी केली. त्यातून एक निसटलेला धागा सापडला. तो म्हणजे, त्याचे पैसे चोरलेल्या इसमाकडे हातकणंगले येथे ट्रेनमध्ये चढताना फक्त पाठीवरची सॅक होती; मात्र दादर स्टेशनच्या बाहेर पडताना त्याच्याकडे करड्या रंगाची, चाके असलेली एक मोठी सुटकेस होती, असे त्याने खात्रीपूर्वक सांगितले.

त्याच्या आधारे मी संशयित आरोपी ज्या हॉटेलमध्ये उतरला होता, तिथे चौकशी करायला सांगितले. सीसीटीव्ही फुटेजमध्ये तो हॉटेलमध्ये चेक-इन करताना हर्षवर्धनने सांगितल्याप्रमाणे त्याच्याकडे सुटकेस असल्याचे दिसत होते. मात्र चेक-आऊट करताना त्याच्याकडे फक्त सॅक होती, अशी माहिती मिळाली. त्याच्याकडे रूमवर भेटायला एक व्यक्ती येऊन गेली होती. त्या वेळच्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये तो व्यक्ती परत जाताना त्याच्याकडे ज्युटची एक मोठी पिशवी होती. पिशवीच्या आकारावरून त्यात बराच मोठा माल असावा, असे वाटत होते. मात्र पिशवीचे तोंड झिप ओढून बंद केलेले होते.

याचा अर्थ ती सुटकेस हॉटेलच्या बाहेर गेलेली नव्हती, हे उघड होते. म्हणून आम्ही हॉटेलमध्ये सुटकेसचा कसून शोध घेण्यास सांगितले. खूप शोध घेतल्यानंतरही सुटकेस हॉटेलमध्ये सापडली नाही. मल्हार गायकवाड त्याची रात्रपाळीची ड्युटी संपल्यानंतरही सुटकेस शोधण्याचे काम करत होता. कॉमन टॉयलेटमधील खिडकीची काच अर्धवट उघडी असल्याचे त्याच्या लक्षात आले. म्हणून त्याने शोध घेतला असता ती सुटकेस हॉटेलच्या मागच्या बाजूला कचऱ्याच्या ढिगात मोडक्या अवस्थेत सापडली. ताबडतोब तो सुटकेस घेऊन पोलीस स्टेशनमध्ये हजर झाला.

दादर स्टेशनवरून चोरीला गेलेली सुटकेस तीच आहे का, याची खात्री करण्यासाठी मी सुटकेसचे फोटो माझ्या मेहुणीला पाठवले आणि तिने ती तिचीच सुटकेस असल्याचे सांगितले. घाटपांडे साहेब संशयित आरोपीची स्वतः चौकशी करत होते. शेवटी आरोपीने गुन्हा कबूल केला आणि सुटकेसमधील ऐवज त्याच्या साथीदाराकडे दिल्याचे सांगितले. ते दोघे दुपारी दोनच्या मुंबई-बेंगळुरू वंदे भारत ट्रेनने बेंगळुरूला निघाले होते. आमच्याकडे वेळ अतिशय कमी होता; पण एक गोष्ट मात्र आमच्या दृष्टीने चांगली होती. ती म्हणजे त्या दोघांचे तिकीट क्रमांक संशयित आरोपीकडून मिळवण्यात घाटपांडे साहेबांना यश मिळाले.

त्या माहितीच्या आधारे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे सापळा रचून त्याच्या साथीदाराला अटक करण्यात आली. त्याच्याकडून चोरीस गेलेला मुद्देमाल जप्त करण्यात आला. पुढील तपासासाठी रेल्वे पोलिसांशी समन्वय साधण्यात आला आहे.

मला विशेष आनंद होत आहे की हर्षवर्धन, त्याचे मित्र आणि मल्हार गायकवाड यांच्या धाडसामुळे व सहकार्यामुळे या तपासाला महत्त्वाची दिशा मिळाली. त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठीच आपण आज येथे जमलो आहोत. मी माझे मनोगत येथे संपवतो.

धन्यवाद.

टाळ्यांच्या कडकडाटात इन्स्पेक्टर प्रधान आपल्या जागेवर जाऊन बसले.

मंजिरी देसाई मॅडम सूत्रसंचालनासाठी उभ्या राहिल्या आणि म्हणाल्या, 'इन्स्पेक्टर प्रधान यांनी अत्यंत रोचक पद्धतीने संपूर्ण घटनाक्रम आपल्यासमोर मांडला. त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

आता मी या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. पोलीस उपायुक्त श्री. ज्ञानेश्वर नेवासेकर साहेब यांना आपले मनोगत व्यक्त करण्याची विनंती करते.'

उपायुक्त ज्ञानेश्वर नेवासेकर उभे राहिले आणि त्यांनी सभागृहाला संबोधून आपले विचार मांडायला सुरुवात केली.

आज या सभागृहात उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांचे, पत्रकारबंधूंचे, आमच्या मोहिमेत सहाय्य करणाऱ्या हर्षवर्धन तसेच बहिर्जी नाईक ग्रुपच्या सदस्यांचे आणि अर्थातच त्यांच्या कुटुंबीयांचे मी मनापासून आभार मानतो.

गुन्हे उघडकीस आणण्याचे काम केवळ पोलिसांचे नसते. जागरूक नागरिक आणि समाजाच्या सहकार्यामुळे अनेक वेळा तपासाला नवी दिशा मिळते. आज त्याचेच उत्कृष्ट उदाहरण आपल्या समोर आहे.

हर्षवर्धनने प्रसंगावधान राखून दाखवलेले धाडस, जुनैद आणि त्याच्या मित्रांनी निभावलेली मैत्री, आणि मल्हार गायकवाड यांनी दाखवलेली तत्परता या सर्वच गोष्टी अत्यंत कौतुकास्पद आहेत. विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे या मुलांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे पराक्रमी गुप्तहेर बहिर्जी नाईक यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवला आहे.

या गुन्ह्याच्या तपासात महत्त्वाची मदत करून सराईत आंतरराज्यीय गुन्हेगाराच्या अटकेस हातभार लावल्याबद्दल हर्षवर्धनला 50000/- रुपयांचे विशेष बक्षीस पोलीस खात्याकडून देण्यात येत आहे.

हर्षवर्धनला त्याच्या धाडसाबद्दल नीना कर्णिक मॅडम यांच्याकडून विशेष शैक्षणिक शिष्यवृत्ती जाहीर करण्यात येत आहे.

तसेच 'बी. एन. ग्रुप' अर्थात 'बहिर्जी नाईक ग्रुप'च्या उपस्थित सदस्यांना प्रशस्तीपत्र आणि 5000/- रुपयांचे सामूहिक बक्षीस जाहीर करण्यात येत आहे.

मल्हार गायकवाड यांची हर्षवर्धनच्या पैसे चोरीच्या प्रकरणात मोलाची मदत झाली. अत्यंत धाडसाने त्यांनी हातात शस्त्र घेतलेल्या आरोपीला, स्वतः निःशस्त्र असतानाही, पकडून पुढे घडू शकणारा अनर्थ टाळला. याशिवाय त्यांनी अत्यंत चाणाक्षपणे मोडक्या सुटकेसचा माग काढल्याने आम्हाला संशयित आरोपीकडून गुन्ह्याची कबुली मिळवणे शक्य झाले आणि त्याच्या साथीदाराला मुद्देमालासह अटक करण्यात यश आले. या त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीसाठी मुंबई पोलिसांतर्फे त्यांचा विशेष सन्मान करण्यात येत आहे. अशा धाडसी आणि प्रसंगावधान राखणाऱ्या तरुणांसाठी पोलीस खात्यात नेहमीच संधी उपलब्ध असतात, असे मी याप्रसंगी नमूद करू इच्छितो.

आता मी व्यासपीठावर हर्षवर्धन, जुनैद, नील, विवेक, मोहसीन, चैतन्य आणि मल्हार यांना, तसेच नीना कर्णिक मॅडम यांना व्यासपीठावर येण्याची विनंती करत आहे.

टाळ्यांच्या कडकडाटात सर्वजण व्यासपीठावर येऊन उभे राहिले. त्यांना बसण्यासाठी व्यासपीठावर मागील ओळीत खुर्च्या मांडलेल्या होत्या, त्यावर सर्वजण स्थानापन्न झाले.

'आता मी सौ. नीना कर्णिक यांना त्यांचे मनोगत व्यक्त करण्याची विनंती करते,' असे मंजिरी देसाई मॅडम जाहीर केले.

नीना कर्णिक मॅडम मनोगत व्यक्त करण्यासाठी उभ्या राहिल्या.

सभागृहात उपस्थित पोलीस खात्यातील अधिकारी व कर्मचारी, इतर मान्यवर, पत्रकार बंधू-भगिनी, हर्षवर्धन मोहिते, मल्हार गायकवाड, बहिर्जी नाईक ग्रुपचे सदस्य आणि त्यांचे कुटुंबीय, या सर्वांना माझा मनःपूर्वक नमस्कार.

काल सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास दादर स्थानकावरून माझी सुटकेस चोरीला गेली आणि त्या क्षणी माझ्या पायाखालची जमीनच सरकली. माझ्या दोन वर्षांच्या मुलाच्या पायाला खरचटले होते. त्याच्यासाठी मलमपट्टीचे साहित्य शोधताना माझे क्षणभर लक्ष विचलित झाले आणि त्याचाच फायदा घेऊन कोणीतरी माझी सुटकेस लांबवली.

खरे तर, मी चार दिवसांवर आलेल्या माझ्या भावाच्या लग्नासाठी मुंबईत आले होते. त्या सुटकेसमध्ये दागिने आणि इतर

मौल्यवान वस्तू होत्या. त्यामुळे माझी चिंता आणखी वाढली होती. मात्र रेल्वे पोलिसांनी तात्काळ हालचाली सुरू केल्या. इन्स्पेक्टर प्रधान हे माझ्या बहिणीचे यजमान आहेत. मी त्यांना फोन करून घडलेली घटना सांगितली आणि तेही तातडीने मुंबईत दाखल झाले. त्यानंतर घडलेला संपूर्ण घटनाक्रम आपण सर्वजण जाणताच आहात.

मला माझ्या बहिणीकडून आणि भाचीकडून हर्षवर्धनबद्दल बरेच चांगल्या गोष्टी ऐकायला मिळाल्या होत्या. मात्र गेल्या चोवीस तासांत त्याने दाखवलेली हुशारी, प्रसंगावधान, धाडस आणि सामाजिक जाणीव पाहून मी खरोखर प्रभावित झाले आहे. इतक्या लहान वयात एवढी परिपक्वता क्वचितच पाहायला मिळते. त्याचे भविष्य उज्ज्वल आहे, हे सांगण्यासाठी कोणत्याही ज्योतिषाची गरज नाही.

हर्षवर्धनच्या या गुणांना प्रोत्साहन मिळावे आणि त्याच्या पुढील शिक्षणासाठी थोडा हातभार लागावा, या हेतूने मी त्याच्या नावाने दोन लाख रुपयांची मुदतठेव करण्याचा निर्णय घेतला आहे. या मुदतठेवीवरील व्याज त्याला आवश्यकतेनुसार वापरता येईल. अन्यथा वयाच्या अठराव्या वर्षी व्याजासह संपूर्ण रक्कम त्याच्या ताब्यात दिली जाईल. त्याच्या उच्च शिक्षणासाठी ही रक्कम उपयोगी पडेल, अशी मला आशा आहे.

या संदर्भातील आवश्यक कार्यवाही पूर्ण करण्यासाठी मी इन्स्पेक्टर प्रधान यांची मदत घेणार आहे.

शेवटी, रेल्वे पोलीस, मुंबई पोलीस, इन्स्पेक्टर प्रधान, मल्हार गायकवाड, हर्षवर्धन आणि बहिर्जी नाईक ग्रुपच्या सर्व सदस्यांचे मी मनःपूर्वक आभार मानते. त्यांच्या प्रयत्नांमुळे माझा मौल्यवान ऐवज परत मिळाला आणि न्यायव्यवस्थेवरील माझा विश्वास आणखी दृढ झाला.

आपण सर्वजण आता बक्षीस समारंभाची उत्सुकतेने वाट पाहत असाल. त्यामुळे मी माझे भाषण येथेच थांबवते.

धन्यवाद.

असे म्हणून नीना कर्णिक मॅडम आपल्या जागेवर जाऊन बसल्या.

यानंतर एक एक करून सर्वच मुलांना बोलावण्यात आले आणि मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

टाळ्यांच्या कडकडाटात सभागृह दणाणून गेले. फ्लॅशलाईट्सच्या चमचमाटात छायाचित्रकारांची लगबग सुरू झाली होती.

मंजिरी देसाई मॅडमनी थोडा वेळ तसेच जाऊ दिले आणि नंतर पत्रकारांशी संवाद साधण्याचा कार्यक्रम सुरू होणार असल्याची घोषणा केली. सत्कारानंतर पत्रकार परिषद सुरू झाली.

"हर्षवर्धनच्या पैशांच्या चोरीचा तपास सुरू असताना चोरीला गेलेल्या सुटकेसचा संबंध कसा जोडला गेला?" पहिल्याच पत्रकाराने प्रश्न विचारला.

घाटपांडे साहेबांनी या प्रश्नाचे उत्तर इन्स्पेक्टर प्रधान देतील असे सांगून त्यांना बोलण्याची विनंती केली.

"सुरुवातीला या दोन्ही स्वतंत्र घटना आहेत, याबद्दल मला जराही शंका नव्हती. मात्र हर्षवर्धनशी बोलताना माझ्या अंतर्मनाने काही वेगळाच कौल दिला आणि मी त्या दिशेने त्याच्या बोलण्याचा विचार करू लागलो. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे सीसीटीव्हीचे फुटेज पाहणे आणि त्या प्रसंगी प्रत्यक्ष उपस्थित असलेल्या व्यक्तीच्या नजरेतून तोच प्रसंग पाहणे, यात खूपच फरक असतो. सीसीटीव्ही फक्त प्रसंगाचे वास्तव चित्रण करते; तर तो प्रसंग अनुभवणारी व्यक्ती त्या घटनेचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न करत असते. आरोपीच्या हातात चाकांची सुटकेस असल्याचे ऐकल्यावर माझे सहावे इंद्रिय सक्रिय झाले. दैवयोगाने हर्षवर्धनला त्याच वेळी ट्रेनमध्ये शिरताना आरोपीकडे फक्त सॅक असल्याची महत्त्वाची गोष्ट आठवली. त्यामुळे हा गुंता त्याच वेळी सुटला, असे म्हणायला हरकत नाही. यापुढील घटनाक्रम आपण जाणताच," इन्स्पेक्टर प्रधान म्हणाले.

"संशयित आरोपीकडून मिळालेल्या माहितीवरून त्याच्या साथीदारापर्यंत पोहोचणे किती अवघड होते?" दुसऱ्या एका पत्रकाराने विचारले.

"मुख्य आरोपीने सुरुवातीला माहिती लपवण्याचा प्रयत्न केला; पण पुरावे आणि चौकशीच्या आधारे आम्ही त्याला बोलते केले. त्यातूनच आम्हाला महत्त्वाचा धागा मिळाला. आरोपीकडून मिळालेल्या रेल्वे तिकिटांच्या सॉफ्ट कॉपीमुळे पुढील तपास सोपा झाला. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे आमचा, रेल्वे प्रशासनाचा आणि रेल्वे पोलिसांचा समन्वय योग्य पद्धतीने साधला गेला. आरोपीच्या साथीदाराची योग्य वेळी झालेली अटक ही त्याचीच फलश्रुती आहे," घाटपांडे साहेबांनी मुद्देसूद उत्तर दिले.

"हर्षवर्धन, एवढ्या मोठ्या शहरात एकट्याने त्या चोराचा पाठलाग करताना तुला भीती वाटली नव्हती का?"

हर्षवर्धन क्षणभर हसला. "भीती तर वाटत होतीच; पण मला माझे पैसे परत मिळवायचे होते. नंतर मित्र मिळाले आणि आत्मविश्वास वाढला."

"जुनैद, एका अनोळखी मुलाला मदत करण्याचा निर्णय तुम्ही का घेतला?"

"कारण त्यावेळी त्याला आमची गरज होती. आणि एकदा मित्र म्हटले म्हणजे मदतीला धावून जाणे हे आमचे ब्रीद आहे."

"मल्हार, चाकू हातात असताना पुढे जाणे धोकादायक नव्हते का?"

"धोका होता; पण त्या मुलांचे काही बरेवाईट व्हायला नको, एवढाच विचार मनात होता."

"हर्षवर्धन, तुझे प्रसंगावधान आणि समयसूचकता वाखाणण्याजोगी आहे, यात शंकाच नाही. पण मला एक गोष्ट सांग, जेव्हा तू त्या चोराचा पाठलाग सुरू केलास, त्याच वेळी तू पोलिसांना का सांगितले नाहीस? दादर स्टेशनवर तुला पोलीस दिसले असतीलच." चष्मा घातलेले एक पत्रकार त्याला विचारत होते.

हर्षवर्धनने चमकून तिकडे पाहिले. त्यांच्या चेहऱ्यावर स्मितहास्य होते. हर्षवर्धनला त्यांचा चेहरा ओळखीचा वाटला. 'कसे शक्य आहे? इथे मुंबईत माझ्या ओळखीचे कोण असणार?' हळूच त्याने इन्स्पेक्टर प्रधानांकडे पाहिले. त्यांचीही नजर हर्षवर्धनकडेच होती.

आता त्याला उत्तर देणे भागच होते. खाली मान घालून तो हळू आवाजात म्हणाला, "इथे येण्यापूर्वी आमच्या गावात

नुकताच मी आणि माझ्या मित्रांनी एक पराक्रम केला. तसा तो सर्वांसमोर सांगण्यासारखा नाही; पण आता मला तो सांगणे भाग आहे. आमचा शेवटचा पेपर संपल्यावर माझे मित्र एका झाडाच्या कैऱ्या तोडत होते. मी त्यांना विरोध केला; पण कोणीच माझे ऐकले नाही. म्हणून मी बाहेर रस्त्यावर उभा होतो. महत्त्वाची गोष्ट अशी की, ते झाड आमच्या गावातील पोलीस स्टेशनच्या आवारात मागच्या बाजूला आहे! मुलांच्या गोंधळाचा आवाज ऐकून इन्स्पेक्टर प्रधान बाहेर आले आणि त्यांची चाहूल लागताच सगळ्यांनी तेथून धूम ठोकली. फक्त मी आणि झाडावर अडकलेला बाळकृष्ण आम्ही दोघेच पकडले गेलो. आम्हाला ठाण्यात बोलावून इन्स्पेक्टर प्रधानांनी आमची चांगलीच कानउघाडणी केली होती. म्हणून मला पोलिसांकडे मदत मागण्याची भीती वाटत होती. 'न जाणो आमचे कैरी प्रकरण जर इथल्या पोलिसांपर्यंत पोहोचले असेल तर; आणि म्हणून त्यांनी माझे काही ऐकून न घेता मला ठाण्यावरच अडकवून ठेवले, तर माझी काही खैर नाही,' असे मला वाटत होते," हर्षवर्धन एका दमात बोलून गेला आणि त्याने खाली मान घातली. त्याचे बोलणे ऐकून सभागृहात एकच हशा पिकला.

इन्स्पेक्टर प्रधान हसत म्हणाले, "असे करून तुझ्यासारख्या सर्वोत्तम गुप्तहेराला गमावणे आम्हाला परवडणारे नव्हते."

"खरंच? अरेच्चा! मी आपला उगाचच घाबरलो होतो!" त्याने सुटकेचा निःश्वास टाकला आणि वळून त्या पत्रकाराकडे पाहिले.

"तुम्हाला कुठेतरी पाहिल्यासारखे वाटतेय. हं... आता आठवले! काल तुम्ही बसमध्ये माझ्या तिकिटाचे पैसे दिले होते. तेव्हा मी ते परत करता यावेत म्हणून आपले नाव आणि पत्ता विचारला होता. आता माझ्याकडे पैसे आहेत." असे म्हणून हर्षवर्धनने खिशातून वीस रुपयांची नोट काढली आणि अदबीने त्यांच्यापुढे केली.

"छे, छे! तेव्हाच मी तुला सांगितले होते की मला पैसे परत करण्याची आवश्यकता नाही. पण आता मी तुला माझी ओळख करून देतो. माझे नाव मकरंद साठे. मी 'दै. लोकसत्ता'चा वार्ताहर आहे. आता मात्र मी एक गोष्ट तुझ्याकडे मागणार आहे. तुमच्या सर्वांचा एक फोटो मला हवा आहे. उद्याच्या वर्तमानपत्रात फोटोसह बातमी छापून येईल. उद्याचा 'लोकसत्ता' वाचायला विसरू नकोस," ते पत्रकार म्हणाले.

"आता शेवटचा आणि महत्त्वाचा प्रश्न. ज्या पैशांच्या शोधासाठी हर्षवर्धन आणि बी. एन. ग्रुपच्या सदस्यांनी एवढे प्रयत्न केले, ते पैसे फिर्यादीला अजून मिळाले आहेत की नाहीत?" एका पत्रकाराने हसत हसत प्रश्न केला.

तेवढ्यात हवालदार विनायक चव्हाण एक बंद पाकीट घेऊन आले आणि ते त्यांनी घाटपांडे साहेबांकडे सोपवले.

घाटपांडे साहेबांनी हर्षवर्धनला हाक मारून जवळ बोलावले आणि त्याच्या हाती ते पाकीट देत म्हटले, "हर्षवर्धन, हे तुझे चोरीला गेलेले बत्तीसशे रुपये! त्यावर सेफ्टी पिनच्या खुणा आहेत का, हे नीट पारखून घे. आणि एक महत्त्वाची गोष्ट — चलनी नोटांना सेफ्टी पिन लावणे, त्या स्टेपल करणे किंवा त्यांच्यावर खुणा करणे, याला कायद्याने बंदी आहे, हे विसरू नकोस. तसेच अनोळखी व्यक्तीने देऊ केलेल्या पेयांचे अथवा खाद्यपदार्थांचे सेवन कधीही करू नये, ही गोष्ट कायमची लक्षात ठेव."

यानंतर ते प्रश्न विचारणाऱ्या पत्रकाराकडे वळून म्हणाले, "मला वाटते आपल्या प्रश्नाचे उत्तर आपल्याला मिळाले असेल. आता ही पत्रकार परिषद आम्ही आटोपती घेतो; मात्र यानंतर अल्पोपहाराचा आस्वाद घेतल्याशिवाय कोणीही जाऊ नये."

मंजिरी देसाई मॅडमनी अल्पोपहार घेतल्याशिवाय कोणीही जाऊ नये, अशी उद्घोषणा केली आणि सभागृहात थोडी हालचाल सुरू झाली. विशेषतः 'बी. एन. ग्रुप'च्या सदस्यांच्या घरातील मंडळींना आज आपल्या मुलांची एक नवी, धाडसी बाजू समजली होती. पोलीस खात्यातील एवढ्या उच्च अधिकाऱ्यांकडून मुलांचे होणारे कौतुक पाहून त्यांचे उर अभिमानाने भरून आले होते

आणि त्यांना धन्य धन्य वाटत होते. हर्षवर्धनने आपल्या सर्व मित्रांची ओळख माया मावशीशी आणि आजीशी करून दिली. तेवढ्यात इन्स्पेक्टर प्रधान हर्षवर्धनला बोलावून कर्णिक फॅमिलीला भेटण्यासाठी घेऊन गेले. मितालीने हर्षवर्धनचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

याच वेळी हर्षवर्धनच्या मनात क्षणभर एक विचार चमकून गेला; आणि तो इन्स्पेक्टर प्रधानांना म्हणाला, "सर, मला अजून एक गोष्ट तुम्हाला सांगायची आहे. मी त्याबद्दल तुमच्याशी बोलू शकतो का?"

"बोल, तुला काय सांगायचे आहे?" इन्स्पेक्टर प्रधान त्याच्या पाठीवर थोपटत प्रेमाने म्हणाले.

"सर, मी जे बोलणार आहे ते कितपत योग्य आहे, हे मला माहीत नाही. जर माझे काही चुकत असेल, तर मला तसे सांगावे," हर्षवर्धन थोडा चाचरत म्हणाला.

"अरे, त्यासाठी अगोदर तुला बोलावे लागेल," इन्स्पेक्टर प्रधान हसत म्हणाले.

"सर, अजून पंधरा दिवसांनी कोल्हापूर जिल्ह्यातील पोलीस भरतीसाठी आमचा मल्हार दादा येणार आहे. त्याच्या ओळखीचे तिकडे कोणीच नसल्याने मी त्याला आमच्या घरीच उतरायला

सांगितले आहे. माझी आपल्याला एक विनंती आहे, आपण त्याला भरतीसाठी काही मार्गदर्शन करू शकाल का?" हर्षवर्धनने आशेने विचारले.

"अरे, व्वा! ही तर खूपच चांगली गोष्ट आहे. मी नक्कीच त्याला मदत करेन. मी त्याला माझा फोन नंबर देऊन ठेवतो; लेखी परीक्षेसाठी उपयुक्त पुस्तकांची माहिती मी त्याला देईनच, शिवाय फिजिकल फिटनेससाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टींची माहितीही समजावून सांगेन. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, त्याला अर्जासोबत जोडण्यासाठी इतर प्रमाणपत्रांसह आज मिळालेले प्रशस्तीपत्रही सोबत जोडण्याचा सल्ला देईन. एक गोष्ट नेहमी लक्षात ठेव, 'प्रयत्न करणाऱ्यांनाच दैव साथ देते!' आता इथून निघण्यापूर्वी त्याला मला एकदा भेटून जायला सांग. चला, आता गरम गरम समोसे, काजू कतली आणि चहा-कॉफीचा आस्वाद घेऊ या," इन्स्पेक्टर प्रधान म्हणाले.

हर्षवर्धन घाईघाईने तो आनंदाचा निरोप सांगण्यासाठी मल्हारकडे धावला.

अल्पोपहारानंतर कार्यक्रमाची सांगता झाली, आणि थोड्याच वेळात ते भव्य सभागृह रिकामे झाले.

प्रकरण 16: समज-गैरसमज

कार्यक्रम आटोपून घरी पोहोचायला रात्रीचे साडेआठ वाजून गेले होते. घरी आल्यावर आजीने सर्वप्रथम जे काम केले, ते म्हणजे देवापुढे दिवा लावला आणि नंतर मीठ-मोहऱ्या घेऊन हर्षवर्धनची दृष्ट काढली. दृष्ट काढताना ती तोंडातल्या तोंडात मंत्र म्हटल्याप्रमाणे पुटपुटत होती,

"आल्या-गेल्याची, भुताखेताची, झाडा-माडाची, कोणाच्या वाईट नजरेची दृष्ट लागली असेल तर उतरून जाऊ दे.

इडा-पीडा टळो, आमचा बाळ सुखरूप राहो."

आजी नंतर गॅलरीत गेली. एका पाणी भरलेल्या तांब्यात तिने मुठीतील मीठ-मोहऱ्या टाकल्या. मग हर्षवर्धनच्या कानशिलावरून हात फिरवला आणि आपल्या कानांजवळ दोन्ही हातांची बोटे कडाकडा मोडली. त्यानंतर तिने त्याला देवाचा अंगारा लावला.

मयुरी हे सगळे पाहत होती आणि आजीची चेष्टा करत हसत होती. तिचे लक्ष हर्षवर्धनच्या चेहऱ्याकडे गेले. त्याचा चेहरा तिला

उतरलेला दिसला. खरे तर आजचा दिवस फक्त त्याचाच आणि त्याचाच होता. आज संध्याकाळी तो अक्षरशः कित्येक लोकांच्या कौतुकाच्या नजरांनी न्हाऊन निघाला होता. मग त्याचा चेहरा असा हिरमुसलेला का बरे?

तिला जाणवले की त्याची आईच या कौतुकसोहळ्याला नुसती मुकलीच होती असे नव्हे, तर कधी नव्हे ते ती तिकडे एकटीही होती. तो जरी आज आपल्या आईपासून दूर आलेला असला, तरी तो आपल्या प्रेमाच्या माणसांसोबत होता. दिवसभर निरनिराळ्या व्यवधानांत गुंतल्यामुळे त्याला आईचा वेगळा विचार करायला जराशीही फुरसत मिळाली नव्हती. पण आता त्याला तिची आठवण झाली असावी.

तिकडे त्याची आई केवळ एकटीच नव्हती, तर ती त्याच्या काळजीतही होती. अठ्ठेचाळीस तास उलटून गेले होते; पण त्याचे आपल्या आईशी साधे फोनवरून बोलणेही झाले नव्हते.

वातावरणातील ताण हलका करण्याच्या हेतूने ती हर्षवर्धनला म्हणाली, "आज काय बाबा, एका मुलाची मज्जाच आहे! बक्षीस काय, प्रशस्तीपत्र काय आणि शिष्यवृत्ती काय! मला तर अगदी 'छप्पर फाड के' असे वाटायला लागले आहे. ए हर्षवर्धन, चल मावशीला फोन करायचा का? मघाशी कार्यक्रमाला जाण्याच्या गडबडीत तिला फोन करायचा राहून गेला. तशीही अचानक असा

सत्कार वगैरे झाल्याचे कळल्यावर ती गोंधळून गेली असती. मुळात आपल्या हर्षवर्धनने रेल्वेत चढल्यापासून काय काय पराक्रम केले आहेत, ते तिला कुठे ठाऊक आहे? चल, आधी मी तिला त्याची कल्पना देते आणि मग तू बोल."

हर्षवर्धनचा चेहरा खुलला आणि त्याने आनंदाने मान डोलावली.

मयुरीने लगेच निर्मला मावशीचा नंबर फिरवला आणि काही क्षणांतच यांत्रिक आवाज आला, "आपण लावलेला क्रमांक सध्या बंद आहे." तिने पुन्हा एक-दोनदा प्रयत्न केला; पण प्रत्येक वेळी तोच संदेश ऐकू आला आणि ती गडबडून गेली. हर्षवर्धन तिच्याकडेच पाहत उभा होता.

"ए आई, मावशीचा फोन लागत नाही आहे, जरा तू फोन लावून बघतेस का?" मयुरीने आईला मोठ्याने ओरडून विचारले. त्या स्वयंपाकघरात काहीतरी कामात गुंतलेल्या होत्या. लगबगीने त्या बाहेर हॉलमध्ये आल्या आणि त्यांनी आपल्या बहिणीला फोन लावला. पुन्हा तोच संदेश ऐकू आला. त्यांचे लक्ष हर्षवर्धनच्या चेहऱ्याकडे गेले. त्यावर निराशा स्पष्टपणे दिसून येत होती. त्यांनी पुढे एकदा प्रयत्न केला पण काही उपयोग झाला नाही.

"अग, आई माझ्या फोनवर आपण सत्कार समारंभात असताना निर्मला मावशीचे दोन-तीन कॉल्स दिसतात, मी फोन सायलेंट मोडवर ठेवल्याने ऐकू आला नाही," मयुरी म्हणाली.

"अग, हो माझ्याही फोनवर तिने कॉल केलेले दिसतात, शेवटाला कॉल आला तेव्हा आपण टॅक्सीने घरी येत होतो. आता काय करायचे?" मायाताई विचारात पडल्या.

"मावशी आता नऊ वाजत आले आहेत. इतक्या रात्री कोणाला फोन करून आईला निरोप सांगणे बरोबर दिसणार नाही. तरी मी शेजारच्या बनसोडे काकांना फोन करून बघतो, ते नक्कीच आईचा फोन का लागत नाही, याची चौकशी करून आपल्याला सांगतील. मावशी जरा तुझा फोन देतेस का?" हर्षवर्धनने मायाताईंना विचारले आणि त्यांच्या फोनवरून बनसोडे काकांना फोन केला.

त्यांनी लगेच फोन उचलला. हर्षवर्धनने फोनवर आईचा फोन बंद आहे असा मेसेज येत आहे असे सांगितले. पण त्यादिवशी बनसोडे कुटुंबातील सगळेजण कोल्हापूरला एका लग्नसमारंभासाठी गेले होते आणि दोन दिवसांनी परत येणार होते. त्यामुळे लगेच निर्मलाताईंना भेटून निरोप देणे त्यांना शक्य नव्हते. हर्षवर्धनने त्यांचे आभार मानले आणि फोन बंद केला.

सगळेजण चिंताक्रांत झाल्याचे पाहून मिलिंद काका म्हणजे मयुरीचे बाबा म्हणाले, "अरे एवढी काळजी करण्याचे कारण नाही. तिचा शेवटचा फोन आपण टॅक्सीमध्ये असताना आला होता म्हणजे तोपर्यंत फोन सुरू होता हे नक्की. त्यानंतर कदाचित

फोनला काहीतरी समस्या आली असेल. उगाच काळजी करून काही उपयोग नाही. उद्या सकाळी पुन्हा प्रयत्न करू. जर तिचा फोन खरोखरच बिघडला असेल तर फोन दुरुस्त करायला दुकाने दहानंतर उघडतील. त्याआधी आपण दुसऱ्या कोणाला तरी फोन करून प्रत्यक्ष काय घडले आहे, ते पाहून आपल्याला कळवायला सांगता येईल."

त्यांचे बोलणे अगदी तर्कसंगत होते; पण कधीकधी मनाला तर्कसंगत बोलणे पटत नाही. ते अगदी उलटाच विचार करत असते. हर्षवर्धनचेही असेच झाले. त्याची उल्हसित मनःस्थिती मावळून गेली आणि तो एकदम अबोल झाला.

तसेही बाहेर भरपूर खाणे झाल्यामुळे कोणालाच जेवायची इच्छा नव्हती. त्यामुळे सगळे झोपायला गेले. आजीच्या खोलीत हर्षवर्धनसाठी अंथरूण घातले होते. हर्षवर्धन झोपायला गेला तेव्हा आजी देवघरात तिचे संध्याकाळी ज्ञानेश्वरीचे चुकलेले वाचन पूर्ण करत होती. ती झोपायला आली तेव्हा हर्षवर्धनला झोप लागली होती. आजीने मायेने त्याच्या गालावरून हात फिरवला तेव्हा तिला अश्रूंचे सुकलेले ओघळ दिसले. त्याला हलकेच थोपटून आजी आपल्या पलंगावर झोपायला गेली.

आज निद्रादेवी तिच्यावर रुसली होती. बराच वेळ तिची आराधना करत असताना तिला हर्षवर्धन झोपेत हुंदके देत असल्याचे ऐकू येत होते.

तिकडे निर्मलाताईंची मनःस्थितीही फारशी वेगळी नव्हती. दोन दिवस झाले होते; पण अजून त्यांच्या लाडक्या हर्षवर्धनशी त्यांचे बोलणे झाले नव्हते. तशा त्यांचे मायाताईंशी बोलणे झाले होते, पण त्यामुळे त्यांच्या मातृहृदयाचे काही समाधान झाले नव्हते. हर्षवर्धन आपल्याशी अजून बोलला नाही, यामागे काही वेगळे कारण तर नसेल ना, अशी शंका राहून राहून त्यांच्या मनात येत होती.

संध्याकाळी अगदीच बेचैन झाल्याने त्यांनी मायाताईंना फोन केला. रिंग वाजत होती; पण फोन उचलला गेला नाही. कुणीतरी कामात असेल, आपला मिस्ड कॉल पाहिल्यावर फोन करेल, म्हणून त्यांनी थोडावेळ वाट पाहिली; पण परत फोन आला नाही. त्यांनी पुन्हा एकदा फोन केला; पण त्यालाही उत्तर मिळाले नाही. न राहवून शेवटी त्यांनी मयुरीच्या फोनवर दोनदा फोन केला. दोन्ही वेळा रिंग वाजत होती; पण फोन उचलला गेला नाही.

आता मात्र त्यांना रडू येऊ लागले. 'हर्षवर्धन बरा असेल ना? कुठे धडपडला तर नसेल ना? मी इथे एकटी आहे म्हणून सगळेजण

माझ्यापासून काही लपवत तर नसतील?' एक ना दोन, त्यांच्या मनात हजार शंका डोकावू लागल्या.

न राहवून शेवटचा एक प्रयत्न म्हणून त्यांनी रात्री आठच्या सुमारास मायाताईंना फोन केला; पण त्याचाही काही उपयोग झाला नाही. आता मात्र त्यांचा धीर सुटला. सतत विचार करून त्यांचे डोके ठणकायला लागले. फोन तसाच टेबलावर टाकून त्या ओक्साबोक्शी रडायला लागल्या आणि रडता रडताच त्यांचा डोळा लागला.

'ख्खळ्!' अशा आवाजाने त्यांना जाग आली. खिडकी उघडी राहिली होती आणि त्यातून शेजारच्या मांजराने घरात प्रवेश केला होता. ते टेबलावर उडी मारून पळून जात असतानाच त्याच्या धक्क्याने त्यांचा मोबाईल खाली पडला होता. उठून पाहतात तर काय, फोनच्या स्क्रीनवर असंख्य चिरा पडलेल्या होत्या. घाईघाईने त्यांनी फोन सुरू करण्याचा प्रयत्न केला; पण हाय रे दुर्दैवा! फोन पूर्णपणे बंद पडला होता.

आता मात्र निर्मलाताई मनातून पूर्णपणे कोलमडल्या आणि अधिकच चिंतीत झाल्या. काहीही करून त्यांना आपल्या लेकाची खुशाली त्याच्या तोंडून ऐकायची होती. मोबाईलचा आता दुरुस्ती होईपर्यंत काही उपयोग होणार नव्हता.

एक नवीनच विचार त्यांच्या मनात आला आणि लगेच त्यांनी त्याचा पाठपुरावा सुरू केला. त्यांनी घड्याळात पाहिले. पावणे नऊ वाजले होते. अजून त्यांचे जेवण व्हायचे होते.

हातकणंगलेहून कोल्हापूर बसस्थानकाकडे जाणारी शेवटची बस सव्वानऊला सुटणार होती. रात्री कोल्हापूरहून मुंबईला जाणाऱ्या बऱ्याच बस असतात, याची त्यांना कल्पना होती. शिवाय परगावहून मुंबईकडे जाणाऱ्या कित्येक बस कोल्हापूरला थांबत असल्याने बस मिळण्यात काही अडचण येणार नाही, अशी त्यांच्या मनाची खात्री पटली. आणि त्यांनी झटकन मुंबई गाठण्याचा निर्णय घेतला.

एकदा निर्णय झाल्यावर अक्षरशः पुढच्या वीस मिनिटांत त्यांनी जेवणखाण आटोपले, छोट्या बॅगेत आवश्यक सामान भरले आणि त्या बसस्टॉपवर हजर झाल्या. काही अनपेक्षित गरज भासल्यास उपयोगी पडावी म्हणून त्यांनी पर्समध्ये थोडी जास्तीची रक्कमही ठेवली होती. कोल्हापूरला जाणारी बस वेळेवर आली आणि अर्ध्या तासात त्या कोल्हापूर बस स्टॅण्डवर मुंबईला जाणाऱ्या बसची वाट बघत उभ्या होत्या. सुदैवाने त्यांना जास्त वेळ बसची वाट पहावी नाही. कोल्हापूर-मुंबई बसमध्ये कंडक्टरच्या शेजारी त्यांना बसायला जागा मिळाली तेव्हा कुठे त्यांना थोडे हायसे वाटले. आठ-दहा तासांचा तर प्रवास होता.

सकाळी आठ-नऊ वाजेपर्यंत त्या मायाताईंच्या घरी सहज पोहोचल्या असत्या. दिवसभराच्या दगदगीमुळे थोड्याच वेळात त्यांंचा डोळा लागला, त्यामुळे पहाटे जाग आली. तेव्हा स्वारगेट बसस्टँडला गाडी थांबली होती.

काही प्रवासी खाली चहासाठी उतरले. निर्मलाताई आपल्या जागेवरच बसून होत्या. त्यांच्या शेजारी बसलेला कंडक्टर नुकताच नोकरीला लागलेला दिसत होता, मोकळ्या स्वभावाचा आणि बोलका तरुण होता. मिळालेली नोकरी स्वीकारून अधिक चांगल्या नोकरीसाठी त्याचे प्रयत्न सुरू होते.

"ताई, खाली उतरणार नाही का?" असा प्रश्न त्यांनी निर्मलाताईंना विचारला तेव्हा त्यांनी नकारार्थी मान हलवली.

चहा घेऊन परत येताना त्यांनी ताजे वर्तमानपत्र आणि डिस्पोजेबल ग्लासमध्ये निर्मलाताईंसाठी चहा आणला होता. त्याने इतक्या आपुलकीने चहा आणलेला पाहून निर्मलाताईंना नकार देणे योग्य वाटले नाही. गरमागरम चहा प्यायल्यावर निर्मलाताईंना थोडी तरतरी आली.

कंडक्टरनी घंटा वाजवली आणि गाडी स्वारगेट बसस्टँडमधून बाहेर पडली. वर्तमानपत्र त्यांच्या शेजारी ठेवून नव्याने चढलेल्या प्रवाशांना तिकीट देण्यासाठी ते आपल्या जागेवरून उठले.

निर्मलाताईंनी सहज शेजारी ठेवलेले वर्तमानपत्र उचलले. तो 'दैनिक लोकसत्ता'चा ताजा अंक होता. मुखपृष्ठावर ठळक अक्षरांमध्ये एक बातमी झळकत होती:

"शालेय विद्यार्थ्यांच्या जागरूकतेमुळे एका मोठ्या आंतरराज्यीय गुन्हेगारी टोळीचा पर्दाफाश; मुंबई पोलिसांची यशस्वी कामगिरी"

संपूर्ण बातमी पान नंबर चार वर पहा. या मथळ्याखाली छापलेल्या छायाचित्राकडे त्यांची नजर गेली, आणि त्या क्षणभर स्तब्धच झाल्या. छायाचित्रात हर्षवर्धन आणि त्याच्याच वयाची काही मुले व्यासपीठावर उभी होती आणि त्यांचा सत्कार समारंभ सुरू होता.

(उपायुक्त ज्ञानेश्वर नेवासेकर यांच्या हस्ते सत्कार स्वीकारताना हर्षवर्धन मोहिते आणि बी.एन. ग्रुपचे विद्यार्थी.)

छायाचित्राखालील ती ओळ वाचताना चटकन निर्मलाताईंचे डोळे पाण्याने भरून आले, अंगाला कंप सुटला आणि क्षणभर 'हे काय चालले आहे?', असा त्यांना संभ्रम पडला...

त्यांनी छायाचित्राखालचा मजकूर वाचायला सुरुवात केली:

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई: मुंबई पोलीस परिमंडळ-३ यांनी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत उपायुक्त श्री. ज्ञानेश्वर नेवासेकर यांनी शालेय विद्यार्थ्यांच्या जागरूकतेमुळे एका मोठ्या आंतरराज्यीय गुन्हेगारी टोळीचा पर्दाफाश करण्यात मुंबई पोलिसांना यश आल्याची माहिती दिली.

मंगळवारी सकाळी साडेसातच्या सुमारास कोल्हापूर-मुंबई महालक्ष्मी एक्सप्रेसने प्रवास करणाऱ्या हर्षवर्धन मोहिते (वय 13) या विद्यार्थ्याचे पैसे चोरीला गेले. दादर स्थानकावर त्याला आपल्या सहप्रवाशांपैकी एका व्यक्तीबद्दल संशय आला. विशेष बाब म्हणजे हर्षवर्धन प्रथमच एकट्याने मुंबईत आला होता. शहर

त्याच्यासाठी पूर्णपणे अनोळखी होते. तरीही त्याने धैर्य न सोडता त्या संशयिताचा पाठलाग सुरू ठेवला आणि सिद्धिविनायक मंदिर परिसरापर्यंत त्याचा माग काढला.

सिद्धिविनायक मंदिर परिसरात त्याची काही शालेय विद्यार्थ्यांशी भेट झाली. 'बहिर्जी नाईक ग्रुप' अर्थात 'बी.एन. ग्रुप' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या विद्यार्थिगटाचा प्रमुख जुनैद अन्सारी याने हर्षवर्धनशी संवाद साधला. त्याची अडचण समजताच या विद्यार्थ्यांनी एकमताने त्याला मदत करण्याचा निर्णय घेतला.

संशयिताने हर्षवर्धनचे सर्व पैसे लंपास केल्याने तो पूर्णपणे अडचणीत सापडला होता. त्याची परिस्थिती लक्षात घेऊन बी.एन. ग्रुपच्या विद्यार्थ्यांनी आपापसांत वर्गणी गोळा केली. त्यानंतर त्यांनी संशयिताचा माग काढण्यास सुरुवात केली आणि लालबाग मार्केटलगतच्या एका हॉटेलपर्यंत त्याचा शोध घेण्यात यश मिळवले.

पुढील घडामोडींमध्ये या विद्यार्थ्यांनी दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे आणि पोलिसांना दिलेल्या महत्त्वपूर्ण माहितीद्वारे एका मोठ्या आंतरराज्यीय गुन्हेगारी टोळीपर्यंत तपासाची सूत्रे पोहोचली. या प्रकरणात अनेक धक्कादायक बाबी समोर आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

(सविस्तर वृत्त पान नंबर 4 वर)

तेवढ्यात प्रवाशांना तिकिटे देऊन कंडक्टर आपल्या जागेवर येऊन बसले. पैसे मोजून त्यांना हिशोब पूर्ण करायचा होता.

'परमेश्वरा! तुझी कृपा अगाध आहे! परक्या गावात माझ्या हर्षवर्धनवर किती बिकट प्रसंग ओढवला होता! त्या मुलांच्या रूपाने तूच त्याच्या मदतीला धावून आला असावास. असेच माझ्या बाळाचे रक्षण कर!' निर्मलाताई स्वतःशी मोठ्याने म्हणाल्या. त्यांचे डोळे डबडबले होते. त्यांनी डोळ्यांना पदर लावला. त्यांची चित्तवृत्ती भावविभोर झाली होती. अगदी स्थळकाळाचे भानही त्यांना उरले नव्हते.

कंडक्टर त्यांच्याकडे प्रश्नार्थक नजरेने पाहतच राहिले.

"ताई, तुम्ही ठीक आहात ना? काय झाले? वर्तमानपत्रात काही विशेष बातमी छापून आली आहे का?" कंडक्टरांनी काळजीने विचारले.

"हे, पहा! तो... तो माझा मुलगा आहे!" असे म्हणत निर्मलाताईंनी वर्तमानपत्राच्या पहिल्या पानावरील एका छायाचित्राकडे बोट दाखवले.

त्याखालील मजकुरावर नजर फिरवत कंडक्टर आश्चर्याने म्हणाले, "काय सांगता! म्हणजे तुम्ही हर्षवर्धन मोहितेच्या आई आहात?

तुमचा मुलगा किती हुशार आणि धाडसी आहे! खरोखरच तुम्ही भाग्यवान आहात!"

कंडक्टरांनी उत्सुकतेने त्यांच्याकडून वर्तमानपत्र घेतले आणि पहिल्या पानावरील बातमी वाचू लागले. त्यांच्या चेहऱ्यावर कौतुकाचे हास्य उमटले होते.

सविस्तर वृत्त वाचण्यासाठी त्यांनी चौथे पान उघडले. दादर रेल्वे स्थानकापासून भायखळा येथील मुंबई पोलीस परिमंडळ-3 च्या कार्यालयातील सभागृहापर्यंतच्या हर्षवर्धनच्या अनुभवांचा सविस्तर वृत्तांत त्यात छापून आला होता. निर्मलाताई आतुरतेने त्यांचे वाचन संपण्याची वाट पाहत होत्या, पण तो लेख खूप मोठा होता—त्याने जवळजवळ संपूर्ण पान व्यापले होते.

संपूर्ण लेख वाचून झाल्यावर कंडक्टरांनी पुन्हा एकदा मुखपृष्ठावरील हर्षवर्धनचे छायाचित्र पाहिले आणि वर्तमानपत्र निर्मलाताईंकडे देत म्हणाले, "पुन्हा एकदा अभिनंदन! तुमच्या मुलाने इतक्या लहान वयात खूप मोठी कामगिरी केली आहे. हा पेपर तुमच्याकडेच राहू दे. तो कायमचा जपून ठेवा. लोकसत्तासारख्या प्रख्यात वृत्तपत्रात साधे नाव छापून येणे देखील मानाचे असते. तुमच्या लेकाला तर मोठाच बहुमान प्राप्त झाला आहे."

शेवटी निर्मलाताईंनी त्या पेपरची नीट घडी करून आपल्या पिशवीत ठेवली आणि म्हणाल्या, "कसली कामगिरी नि कसले काय! खरे तर तो प्रथमच एकट्याने मुंबईसारख्या महानगरात जाणार होता; तेव्हा बरोबर असलेल्या पैशांची काळजी घे, असे मी त्याला अगदी बजावून सांगितले होते. तरीही हा इतका निष्काळजी कसा काय वागू शकतो? आपल्याजवळ पैसे आहेत आणि ते चोरीला जाऊ शकतात, याचे त्याला भानच राहिले नव्हते, असे मला वाटते."

"ताई, तुम्ही त्याच्या बाबतीत असे कसे म्हणू शकता? बहुतेक तो खूप दमला असेल किंवा त्या चोराने त्याला संमोहितही केले असेल. तरीही त्याने मुंबईसारख्या अनोळखी शहरात त्या चोराचा पाठलाग करून त्याने हे संपूर्ण प्रकरण तडीस नेले, हीच आश्चर्याची गोष्ट आहे. तुम्ही काहीही म्हणालात, तरी त्याच्या बुद्धिमत्तेला आणि धैर्याला खरोखरच दाद द्यायला हवी. हे सगळे प्रकरण विलक्षण आहे—अगदी विलक्षण!"

"हो, तुम्ही जे म्हणता आहात ते मी अजिबात नाकारत नाही. खरोखरच तो हुशार, धीट आणि मेहनती आहे. वर्गात तो नेहमीच पहिल्या क्रमांकाने पास होतो. पण जरा विचार करा, या सगळ्या प्रकरणात त्याचे काही बरे-वाईट झाले असते तर! मग सगळंच संपलं असतं. नुसत्या कल्पनेनेच माझ्या अंगावर काटा उभा

राहतो. ते काही नाही, आता पुन्हा मी त्याला कधीही एकट्याने बाहेरगावी पाठवणार नाही," निर्मलाताई निर्धाराने म्हणाल्या.

"तुमचा मुलगा खरोखरच फोटोत दिसतो तसाच देखणा आहे का?" कंडक्टरांनी विचारले.

"होय, हर्षवर्धन अगदी तसाच दिसतो — उंच, शिडशिडीत, उत्साहाने भारलेला! मुख्य म्हणजे त्याचे मन स्फटिकासारखे स्वच्छ आहे. ते त्याच्या डोळ्यांतून आणि हसऱ्या चेहऱ्यातून स्पष्टपणे दिसून येते," निर्मलाताई अभिमानाने म्हणाल्या.

"खरंच! तुमचा मुलगा किती चांगला आहे! भविष्यात तुम्ही त्याच्याकडून यापेक्षाही मोठ्या गोष्टींची अपेक्षा करू शकता," कंडक्टर म्हणाले.

"फक्त त्याआधी त्याने अजून नीटनेटके राहायला शिकणे गरजेचे आहे. या फोटोमध्ये बघा, त्याने अजून ताठ उभे राहायला हवे होते, आणि कपड्यांनाही खूप सुरकुत्या पडल्या आहेत. अंगात घालण्यापूर्वी त्यांना थोडी इस्त्री करायला हवी, हे त्याला कळायला हवे होते," निर्मलाताई तक्रारीच्या स्वरात म्हणाल्या.

"फक्त इतकेच ना? की अजून काही मोठे दोषही आहेत?" कंडक्टरांनी हसत विचारले.

"नाही, खरंच, माझ्या हर्षवर्धनमध्ये अजून काहीच दोष नाही," निर्मलाताई म्हणाल्या. त्यांच्या बोलण्यात मुलाबद्दलचे प्रेम आणि अभिमान ओथंबून भरला होता.

बस आता मुंबईत शिरत होती. त्यांनी वर्तमानपत्र अगदी जपून ठेवले होते; आपल्या लेकाच्या पराक्रमाची ती गाथा त्यांना पुन्हा पुन्हा वाचायची होती.

आता बस थोड्या थोड्या अंतरावर थांबत पुढे सरकत होती. कंडक्टरांनी पुकारा केल्यावर प्रवासी उतरत. शेवटी बस दादर बसस्थानकात शिरली. निर्मलाताईंनी आपले सामान एकत्र केले आणि कंडक्टरांचे आभार मानले.

"तुमच्या लेकाला त्याच्या या साहसाबद्दल अभिनंदन सांगा; आणि हो, तो भेटल्यावर त्याला लगेच रागावू नका," कंडक्टर हसत म्हणाले.

"नक्कीच, तुमचे बोलणे मी लक्षात ठेवेन," असे म्हणत निर्मलाताई बसमधून खाली उतरल्या. बाहेर आल्यावर भायखळ्याला जाण्यासाठी त्यांनी सरळ टॅक्सी केली...

इकडे मायाताईंच्या घरी मात्र एक निराळाच गोंधळ सुरू होता. सकाळी सगळेजण नेहमीपेक्षा लवकर उठले होते. हर्षवर्धनला तर चांगली झोपच लागली नव्हती. आजी उठल्याबरोबर तोही उठला.

त्याचे तोंड अजूनही उतरलेलेच होते, हे मिलिंद काकांच्या लक्षात आले.

ते म्हणाले, "हर्षवर्धन, अरे निर्मलाचा फोन रात्री लागला नाही. कदाचित काहीतरी नेटवर्कचा प्रश्न असेल. आता एकदा पुन्हा फोन करून बघू."

त्यांनी फोन लावला; पण कालचेच रेकॉर्डिंग पुन्हा एकदा ऐकायला मिळाले. आता मात्र हर्षवर्धन रडवेला झाला.

काकांनी घराजवळ राहणाऱ्या त्याच्या मित्राला फोन करून घरी जाऊन नेमके काय झाले आहे, ते पाहून यायला सांगितले. दहाच मिनिटांत त्याचे उत्तर आले, "घराला बाहेरून कुलूप आहे आणि निर्मलाताई कुठे गेल्या आहेत, याची शेजारच्या लोकांनाही काही माहिती नाही."

आता मात्र सर्वांचे धाबे दणाणले. काय करावे, हे कुणालाच सुचेना. आजीने पुन्हा एकदा गणपतीचा धावा सुरू केला. मायाताई आणि मिलिंदकाका पुढे काय करायचे, याविषयी चर्चा करू लागले. मयुरी हर्षवर्धनची समजूत काढत होती.

सर्वांनाच कालची आनंदी संध्याकाळ संपून कित्येक दिवस लोटल्यासारखे वाटत होते. एक एक मिनिट मोठे वाटू लागले होते.

अचानक मयुरीला काहीतरी सुचले. वातावरणातील ताण हलका करण्यासाठी आवाजात ओढूनताणून उत्साह आणत ती म्हणाली, "तुम्ही सगळे इतके गंभीर का झाला आहात? आपण जरा निर्मलामावशीच्या दृष्टीकोनातून या घटनेकडे पाहू. तिचे हर्षवर्धनशी बोलणे होऊन दोन दिवस उलटून गेले आहेत. कदाचित तिच्या फोनमध्ये काही बिघाड झाला असेल किंवा नेटवर्कचा प्रश्न असेल. शिवाय त्याआधी तिचे कॉल्स आपल्याकडून उचलले गेलेले नाहीत. मग अशा वेळी ती नेमके काय करेल?"

हर्षवर्धनचा चेहरा एकदम चमकला. "अग, कदाचित आई रात्रीच मुंबईला यायला निघाली असेल!" हर्षवर्धन ओरडला.

वातावरणातील ताण एकदम निवळला. आजी पुढे येऊन हर्षवर्धनला म्हणाली, "अगदी तुझ्या तोंडून देवच बोलला असेल. आपण थोडी वाट पाहू. रात्री सुटणाऱ्या बस साडेआठपर्यंत दादरला येतात. तिथून इथे यायला अर्धा-पाऊण तास तरी लागतोच. तेव्हा काळजी करू नका. उशिरात उशिरा दहा वाजेपर्यंत तरी ती घरी येईलच." आणि त्याच वेळी बोला-फुलाची गाठ पडल्यासारखी दारावरची बेल वाजली.

"आई आली!" असे म्हणत हर्षवर्धन धावला आणि त्याने घाईघाईने दार उघडले.

दारात त्याची आई उभी होती. ती घरात शिरण्याआधीच हर्षवर्धनने तिच्या कमरेला मिठी मारली आणि निर्मलाताईंनी त्याला आपल्या मिठीत गच्च कवटाळून धरले.

"अरे, हर्षवर्धन, तिला आत तरी येऊ दे," आजी दाराशी येत म्हणाली, आणि माय-लेकाची जोडगोळी एकदाची घरात आली.

"आई, मला काय खाऊ आणलास?" असे म्हणत लहान मुलाच्या उत्सुकतेने हर्षवर्धनने आईची पिशवी उलटीपालटी केली. त्यात आजचा लोकसत्ता होता. निर्मलाताईंच्या काळजीने सगळेच व्यग्र असल्यामुळे कोणाला आजचे वर्तमानपत्र पाहण्याचे सुचलेच नव्हते.

आधाशासारखी हर्षवर्धनने वर्तमानपत्रावर झडप घातली आणि कालची बातमी वाचून काढली. त्यानंतर मयुरीच्या हातात वर्तमानपत्र आले.

"अग मयुरी, मोठ्याने वाच म्हणजे सर्वांनाच ऐकता येईल," आजीने सूचना केली. सर्वजण जीवाचा कान करून ऐकत होते. बातमी वाचून संपली, आता फोटो पाहण्यासाठी वर्तमानपत्र प्रत्येकाच्या हातात आळीपाळीने फिरत होते. मिलिंद काकांना ऑफिसची वेळ होत असल्याची जाणीव झाली.

"बरं, माया, मी आता ऑफिसला निघण्यासाठी तयार होतो. तसा आज मला डबा नको आहे. ऑफिसमध्ये माझ्याकडून पार्टी घेतल्याशिवाय कोणी मला सोडणार नाही. काल निघतानाच मला येताना पेढे घेऊन येण्याची आठवण करून दिली होती. आज ही बातमी वर्तमानपत्रात आल्याने मला पार्टी तर द्यावीच लागणार," मिलिंद काका म्हणाले.

"निर्मला, आमच्या सगळ्यांचे फोन सत्कार समारंभाच्या वेळी 'सायलेंट मोड'वर होते. नेमके त्याच वेळी तुझे कॉल्स आले. आणि समारंभाचे आयोजन इतक्या घाईत झाले की त्याआधी तुला फोन करायचे सुचलेच नाही. पण नंतर जेव्हा आम्ही कॉल केला, तेव्हा तुझा फोन बंद असल्याचे रेकॉर्डिंग ऐकायला येत होते. आम्हाला तुझी काळजी लागून राहिली होती," मायाताई म्हणाल्या.

"अग, हर्षवर्धन इकडे आल्यापासून त्याच्याशी माझे फोनवरून बोलणे झाले नव्हते म्हणून मी थोडी नाराज होते. त्यात तुम्ही माझे कॉल उचलले नाहीत म्हणून मला काळजी वाटत होती. पुन्हा पुन्हा फोन करून मी थकले होते. टेबलावर फोन ठेवून जरा पडले, तेव्हा शेजारच्या मांजराने टेबलावर उडी मारली आणि धक्क्याने फोन खाली पडला; तेव्हापासून तो बंदच आहे. म्हणून तर मी रात्रीच स्वतः इकडे येण्याचा निर्णय घेतला," निर्मलाताई म्हणाल्या.

"ए मावशी, तुझा फोन आता जुना झाला आहे, आता तो बदल आणि नवीन फोन घे," मयुरीने सुचवले.

"आई, खरंच, आपण तुला माझ्या बक्षिसाच्या पैशांमधून नवीन फोन घेऊ," हर्षवर्धन म्हणाला.

"गधड्या! ते पैसे असे खर्च करण्यासाठी दिलेले नाहीत. मी तर पैसे हातात आले की सरळ मिलिंद काकांकडे देऊन पोस्टात राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रात गुंतवणूक करायला सांगायचे ठरवले आहे," निर्मलाताई म्हणाल्या.

"निर्मला, तू योग्य निर्णय घेतला आहेस. बरं, आता मी ऑफिसला निघतो. तुझा फोन दे, कुणाला तरी पाठवून दुरुस्त होतो का पाहू. आणि दुरुस्त होणार नसेल तर मात्र नवीन फोन घेणे आवश्यक आहे. कालच्या एका रात्रीने मोबाईल फोन किती अत्यावश्यक आहे, हे सर्वांना कळून चुकले आहे," मिलिंद काका म्हणाले.

निर्मलाताईंनी आपला फोन मिलिंद काकांच्या स्वाधीन केला आणि ते ऑफिसला निघून गेले. आता घाईगडबड करण्याची गरज उरली नव्हती. निर्मलाताईंच्या अचानक येण्याने आजीला आणि मायाताईंना खूप आनंद झाला होता. आजीने देवापुढे साखर ठेवून गणपतीचे आभार मानले. "देवा, तुझ्या कृपेने सारे काही सुरळीत पार पडले," असे म्हणत तिने देवाला नमस्कार केला.

गेले कित्येक दिवस निर्मलाताईंना पार्लरच्या कामातून जराही फुरसत मिळत नव्हती. म्हणूनच त्यांनी हर्षवर्धनला एकट्याने मुंबईला पाठवण्याचा निर्णय घेतला होता. आता इथे सगळे खुशाल आहे, हे समजल्यावर उद्याच हातकणंगल्याला परतलेले बरे असा विचार त्यांनी बोलून दाखवला. पण आता मुंबईला आलीच आहेस तर काही दिवस तरी इथेच थांबावे, असा आजी आणि मायाताईंचा त्यांना आग्रह होता.

मयुरी आणि हर्षवर्धन वर्तमानपत्रातील छायाचित्रे पुन्हा पुन्हा पाहण्यात दंग झाले होते. अधूनमधून आजीच्या आणि मयुरीच्या फोनवर बी. एन. ग्रुपच्या मुलांचे फोन आणि संदेश येत होते. निर्मलाताई त्या दोघांकडे कौतुकाने पाहत होत्या.

आजी आणि निर्मलाताई गप्पा मारत असताना मायाताईंनीही झटपट स्वयंपाक आटोपला आणि त्या त्यांच्या गप्पांमध्ये सामील झाल्या.

"ए, आई! आज काय गप्पांनीच पोट भरायचा तुमचा विचार आहे की काय? खूप भूक लागली आहे, काहीतरी खायला दे ना!" मयुरी लाडात येऊन आपल्या आईला म्हणाली.

"अग, जरा थांबा. सगळा स्वयंपाक तर झालाच आहे. दहा मिनिटांत जेवायलाच बसू," मायाताई म्हणाल्या.

"बापरे, दहा मिनिटे? आई, तू येताना काय खाऊ आणलास?" आता हर्षवर्धनलाही भूक लागली होती.

"मी खाऊ आणला? अरे, मी इथे कशी येऊन पोहोचले, ते फक्त देवाला आणि त्या बसमध्ये देवासारखे भेटलेल्या कंडक्टरलाच माहीत! बस थांबल्यावर बिचारा माझ्यासाठी न सांगता चहा घेऊन आला आणि तुझ्या हातात जो पेपर आहे, तोही त्यानेच दिला बरं का! अरे पण मी तुला इकडे येताना चिवडा-लाडवांचा डबा दिला होता. तो मावशीकडे दिलास की नाही?" निर्मलाताईंनी हर्षवर्धनला विचारले.

"खरंच की! मी डबा सुटकेसमधून काढायलाच विसरलो," असे म्हणत हर्षवर्धनने डबा काढून मावशीकडे दिला.

"मयुरी, हे बघ. तुम्हाला भूक लागली ना? तुला आवडतो म्हणून चिवडा पाठवला होता. तो खाऊन घ्या," निर्मलाताई म्हणाल्या.

"पण बेतानेच हं! नाहीतर जेवण तसेच उरेल," मायाताईंनी मयुरीला आठवण करून दिली.

चिवडा-लाडू खाऊन झाल्यावर मयुरी निर्मलाताईंना म्हणाली, "मावशी, चिवडा अगदी मस्त झाला आहे. तू मात्र लगेच हातकणंगल्याला जायची घाई करू नकोस. आम्ही हर्षवर्धनला

मुंबई दाखवणारच आहोत; पण त्याच्याबरोबर तूही असलीस तर त्यालाही खूप आनंद होईल."

"हो, आई. मयुरीताई बरोबर बोलत आहे," हर्षवर्धन म्हणाला.

"अरे, मी राहिले असते; पण तिकडे कामाचा खोळंबा होईल आणि शेवटी पैशांचाही प्रश्न आहे. तेव्हा लवकर गेलेले बरे," निर्मलाताई म्हणाल्या.

"मावशी, आता पैशांची काळजी करू नकोस. हर्षवर्धनला पन्नास हजार रुपयांचे बक्षीस मिळाले आहे आणि शिवाय नीना कर्णिक मॅडमनी त्याच्या शिष्यवृत्तीसाठी दोन लाख रुपयांचा निधी दिला आहे. तेव्हा तू निवांत राहायला काही हरकत नाही. आपण सगळे संजय गांधी नॅशनल पार्कला जाऊ. गेटवे ऑफ इंडिया आणि घारापुरीची लेणी—एलिफंटा केव्ह्ज—एका दिवसात पाहता येतील. बाकी नेहरू प्लॅनेटोरियम, जिजामाता उद्यान वगैरे ठिकाणी तर मी आणि हर्षवर्धन आम्ही दोघे जाऊ," मयुरी आग्रहाने सांगत होती.

मयुरीचा हा प्रेमळ आग्रह मोडणे निर्मलाताईंना अवघड झाले होते. त्या मयुरीला म्हणाल्या, "बरं बाई, तू म्हणत असशील तर आपण शनिवार-रविवारी दोन्ही ठिकाणी जाऊ. त्यानंतरच मी हातकणंगल्याला जाईन. आता तरी तुझ्या मनासारखे झाले का?"

"छे! अजून एक महत्त्वाची गोष्ट राहिली आहे," मयुरी हसत म्हणाली.

"महत्त्वाची गोष्ट? आणि ती कोणती?" मायाताईंनी विचारले.

"अगं आई, असे काय करतेस? हर्षवर्धनने इतका मोठा पराक्रम केला. अगदी पोलिसांनी त्याचा सत्कार केला, नीना कर्णिक मॅडमनी शिष्यवृत्ती दिली आणि कितीतरी वर्तमानपत्रांत सविस्तर बातम्या प्रसिद्ध झाल्या. तर मग 'एक पार्टी तो बनती है!'" मयुरी फिल्मी स्टाईलमध्ये म्हणाली.

"मयुरी, हे तू अगदी बरोबर बोललीस," आजीने दुजोरा दिला.

हर्षवर्धन काही बोलला नाही; पण तो आपली आई यावर काय म्हणते, या अपेक्षेने तिच्याकडे पाहत होता. नेहमीप्रमाणे निर्मलाताईंना तो काही न बोलताच त्याच्या मनातली गोष्ट समजली.

निर्मलाताई प्रसन्नपणे हसत म्हणाल्या, "खरं तर पार्टी द्यायला काहीच हरकत नाही. पण त्याचा मोठा व्याप होईल का? तेव्हा आधी तुम्ही दोघे सगळे नियोजन करा. आम्ही तुमच्या पाठीशी आहोतच."

मायाताईंनाही हा प्रस्ताव आवडला. त्यांनी हसत मान डोलावली.

"ठीक आहे, आम्ही दोघे प्लॅनिंग करतो. पण आधी तुमच्या काही सूचना असतील तर त्या आत्ताच सांगा, म्हणजे आम्हाला त्याप्रमाणे नियोजन करता येईल," मयुरी म्हणाली.

"आपल्याकडे तयारीसाठी फारसा वेळ नाही. कारण शनिवार-रविवारी तुम्ही नॅशनल पार्क आणि घारापुरीची लेणी पाहण्यासाठी जायचे ठरवले आहे. म्हणजे तयारीसाठी आपल्याकडे फक्त आजचाच दिवस आहे," मायाताई म्हणाल्या.

"मग आपण खाण्याचे पदार्थ बाहेरून मागवूया—पिझ्झा, केक आणि लिम्का!" मयुरी उत्साहाने म्हणाली.

तिची ही सूचना मात्र तिच्या आईला आणि मावशीला फारशी पसंत पडली नाही.

"एक तर त्यासाठी जास्त पैसे मोजावे लागतील, आणि आपल्या घरी पाहुण्यांना बोलावून खाण्याचे पदार्थ बाहेरून मागवणेही काही बरे दिसणार नाही," मायाताई म्हणाल्या.

"त्यापेक्षा आधी अंदाजे किती जण येतील, ते ठरवा. मग काय आणि कसे करायचे, ते आपण ठरवू," निर्मलाताईंनी सुवर्णमध्य काढला.

निमंत्रितांची यादी करण्यासाठी मयुरी आणि हर्षवर्धन मयुरीच्या खोलीत गेले. त्यासाठी हर्षवर्धनने मयुरीकडे वही आणि पेन मागितले.

"त्याची गरज नाही. आपण मोबाईलच्या नोट्समध्ये यादी तयार करू. म्हणजे काम लवकर होईल आणि ती लगेच आईला शेअर करता येईल. एकदा यादी पक्की झाली की मेन्यूसुद्धा त्यातच ठरवू," मयुरी म्हणाली.

हर्षवर्धन विचार करत म्हणाला, "घरचीच मंडळी धरली तर आपण सहा जण आहोत. बाहेरचे लोक मोजले तर—बी. एन. ग्रुपची आपल्या मोहिमेत सहभागी झालेली पाच मुले, मल्हारदादा आणि वैष्णवीताई, रिक्षावाले सदा काका आणि ओळख नसतानाही बसमध्ये माझे तिकीट काढणारे पत्रकार मकरंद साठे. असे एकूण नऊ जण झाले. तसे मला इन्स्पेक्टर प्रधानांनाही बोलवायला आवडले असते; पण ते कदाचित त्यांच्या पाहुण्यांच्या लग्नसमारंभात गुंतले असतील. हातकणंगल्याला गेल्यावर त्यांना एकदा घरी बोलवता येईल."

निमंत्रितांचा नऊ आकडा नक्की झाला. आता पुढे काय करायचे ठरवण्यासाठी दोघेही मायाताईंकडे गेले.

"तर घरची मंडळी धरून एकूण पंधरा लोक होतील. माझ्या अंदाजाप्रमाणे आपण घरीच पार्टी देऊ, तशी थोडी अडचण होईल

पण तेच जास्त सोईस्कर होईल. तुम्हा मुलांना इथे हॉलमध्ये सोफ्यावर बसून गप्पा गोष्टी करत जेवण करता येईल आणि मोठ्या माणसांना डायनिंग टेबलवर वाढता येईल," मायाताई म्हणाल्या.

निर्मलाताईंना मायाताईंचे बोलणे पटले. आता मेनू ठरवायचे काम उरले होते. नुसती मुलेच असती तर अल्पोपहार चालला असता पण मोठी माणसेही असल्याने जेवणाचाच बेत ठेवायला हवा होता. बरीच चर्चा झाल्यानंतर सर्वांना मान्य होईल असा— वरण-भात, श्रीखंड-पुरी, मसाले भात, पनीर मसाला, चटणी, कोशिंबीर अगदी साग्रसंगीत जेवणाचा बेत ठरला.

हर्षवर्धनने नेहमीप्रमाणे आपण पुऱ्या लाटून देण्याचे मान्य केले, मयुरी पनीर मसाला आणि चटणी, कोशिंबीर बनवणार होती. निर्मलाताई मसालेभात अगदी सुंदर बनवत, त्यामुळे त्यांनी स्वतः ती जबाबदारी उचलली. बाकी सगळे मायाताई करणार होत्या. शेवटी आजीने मयुरीला जवळ बोलावून तिच्या कानात काहीतरी सांगितले आणि तिने हसून होकार भरला. त्या दोघींचे काय गुपीत होते, ते त्यांनी अगदी हर्षवर्धनलाही कळू दिले नव्हते.

मायाताईंनी लागणाऱ्या सामानाची यादी बनवली आणि मुले आमंत्रणासाठी फोन करण्याच्या कामात गुंतली. मयुरीने वैष्णवीला स्नेहभोजनाचे आमंत्रण दिले, तर हर्षवर्धनने मल्हार,

जुनैद, मोहसीन, चैतन्य, विवेक आणि नील यांना फोन करून दुसऱ्या दिवशी संध्याकाळी भायखळ्यात येण्यास सांगितले. सर्वांनी आनंदाने आमंत्रण स्वीकारले.

टॅक्सीवाल्या सदाकाकांनी वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेली बातमी वाचली होती. हॉटेल सुखसागर येथे मुलांना सोडल्यानंतर त्यांची बी. एन. ग्रुपमधील कोणाशीही भेट झाली नव्हती. मुलांना पुन्हा भेटण्याची त्यांचीही इच्छा होती. त्यांनी स्नेहभोजनाला येण्याचे कबूल केले.

शेवटी हर्षवर्धनने पत्रकार मकरंद साठे यांनाही आमंत्रित केले. त्यांना हर्षवर्धनचे मोठे कौतुक वाटत होते. त्यांनीही आनंदाने येण्याचे कबूल केले.

संध्याकाळी हर्षवर्धन मयुरीबरोबर सोसायटीच्या आवारात फेरफटका मारायला गेला होता. बहुधा त्या दोघांत काहीतरी गुप्त खलबते सुरू होती, असे वाटत होते.

रात्री बराच उशीरपर्यंत हर्षवर्धन आणि मयुरी दुसऱ्या दिवशीच्या स्नेहभोजनाच्या तयारीत मायाताईंना मदत करण्यात गुंतले होते.

प्रकरण 17: शेवट गोड, तर सर्वकाही गोडच!

सकाळी लवकर उठून मयुरीने हर्षवर्धनच्या मदतीने घरातील आवराआवर केली. दुसरीकडे, मायाताई आणि निर्मलाताई संध्याकाळच्या मेजवानीसाठी पूर्वतयारी करत होत्या, तर मिलिंद काका बाजारातून वाणसामान खरेदी करण्यासाठी गेले होते. घरातील कामे आटोपल्यावर मयुरी मायाताईंना म्हणाली, "ए आई, मी आणि हर्षवर्धन जरा बाहेर जाऊन येतो. आम्हाला परतायला थोडा उशीर होईल."

"अगं, घरात अजून इतकी कामे पडली आहेत. तुमचं आताच बाहेर जाणे इतके गरजेचे आहे का?" मायाताईंनी विचारले.

"हो गं आई, आम्ही शक्य तितक्या लवकर परत येऊ. आणि कामाचं म्हणत असशील, तर मी आल्यावर उरलेली सगळी कामं पूर्ण करेन," मयुरीने आईची समजूत काढत म्हटले.

त्यानंतर मयुरी हर्षवर्धनला आपल्या स्कूटरवर घेऊन बाहेर पडली. खरं तर त्याचं असं झालं होतं की, हर्षवर्धनने आपल्या आईला पार्लरमध्ये उपयोगी पडेल म्हणून मुंबईहून इलेक्ट्रिक

केटल आणि इलेक्ट्रिक हेअर ड्रायर आणायचे ठरवले होते. त्यासाठी तो घरून गुपचूप पैसे घेऊन निघाला होता; पण दुर्दैवाने वाटेतच त्याचे ते पैसे चोरीला गेले आणि घरात मोठे रामायण घडले. इतके सगळे होऊनही त्याची आईला भेट देण्याची इच्छा अपूर्णच राहिली होती. याबद्दल त्याने आदल्या दिवशी संध्याकाळी मयुरीबरोबर चर्चा केली होती आणि म्हणूनच ते दोघे आज खरेदीसाठी बाहेर पडले होते.

मयुरीने आधीच इंटरनेटवरून चांगल्या दुकानांची माहिती काढली होती. पहिल्या एका दुकानात त्यांनी फक्त 'विंडो शॉपिंग' केले, ज्यामुळे त्यांना वस्तूंच्या किमतीचा साधारण अंदाज आला. त्यानंतर एका मोठ्या शोरुममध्ये त्यांना दोन्ही वस्तू खूप पसंत पडल्या.

हर्षवर्धनला त्याचे चोरीला गेलेले 3200 रुपये परत मिळाले होते. परंतु, त्याने पसंत केलेल्या दोन्ही वस्तूंची एकूण किंमत 4200 रुपये होती. म्हणजेच हिशोबात बरोबर 1000 रुपये कमी पडत होते. दोन्ही वस्तू हर्षवर्धनच्या मनात भरल्या होत्या, हे मयुरीने त्याच्या चेहऱ्यावरून चटकन ओळखले. तिने न रेंगाळता दुकानदाराला दोन्ही वस्तूंचे बिल बनवायला सांगितले. हर्षवर्धन आश्चर्याने तिच्याकडे पाहतच राहिला.

त्याच्याकडे पाहून मयुरी अधिकारवाणीने म्हणाली, "अरे, तुला इतके आश्चर्य वाटायला काय झाले? माझ्याकडे माझे साठवलेले पैसे आहेत, त्यातले एक हजार रुपये मी देतेय. आणि निर्मला मावशी तुझी आई असण्यापूर्वी माझी मावशी आहे, हे विसरू नकोस!"

मनासारखी खरेदी करून मयुरी आणि हर्षवर्धन आनंदाने घरी आले. मयुरीने मोठ्या शिताफीने प्रेझेंटचा बॉक्स आपल्या कपाटात लपवून ठेवला. स्नेहभोजनाचे आमंत्रण देताना मयुरीने बी. एन्. ग्रुपची मुले, वैष्णवी आणि मल्हार यांना संध्याकाळी जरा लवकरच बोलावले होते, म्हणजे निवांतपणे गप्पागोष्टी करता येतील.

बरोबर संध्याकाळी सहा वाजता दारावरची बेल वाजली. मयुरीने दार उघडले बी. एन. ग्रुपचे सदस्य हजर होते. सर्वजण घरात येऊन बसले, इतक्यात अचानक रिक्षाच्या हॉर्नचा आवाज ऐकू आला. घरातील मंडळी चमकून तिकडे पाहू लागली आणि एकदम हास्यकल्लोळ उसळला. जुनैद रिक्षाचा हॉर्न वाजवत होता.

मयुरीची आजी हॉलमध्ये बसली होती. सर्वप्रथम मयुरीने आजीला प्रत्येकाची ओळख करून दिली. मुलांनी आजीला वाकून नमस्कार केला.

आजीने कौतुकाने त्यांची पाठ थोपटली आणि म्हणाली, "शाब्बास रे माझ्या बहादूर मुलांनो! तुम्ही तर कमाल केलीत. आता तुम्ही खरेखुरे गुप्तहेर शोभताय. बहिर्जी नाईकांचा वारसा चालवणारे बालशिलेदार शोभत आहात; मला तुमचा अभिमान वाटतो. पोलिसांनी म्हणूनच तुमचा जंगी सत्कार केला आणि पत्रकारांनी तर अक्षरशः तुमच्या कामगिरीला डोक्यावरच घेतले. काल सगळ्याच वर्तमानपत्रांत तुमच्या यशस्वी कामगिरीची बातमी छापून आली आहे. तेव्हापासून माझ्या फोनची रिंग सारखी वाजत आहे. आमच्या भजनी मंडळाच्या बायका, ओळखीची माणसे, नातेवाईक फोन करून आमच्या हर्षवर्धनचे आणि तुमचे अभिनंदन करत आहेत. मला तर अगदी धन्य झाल्यासारखे वाटत आहे."

"अरे जुनैद, ते जर्सी आणि फुटबॉलचे सांगायचे राहूनच गेले," मोहसीनने त्याला आठवण करून दिली.

"अरे हो, ते महत्त्वाचेच आहे. सगळ्यांनी जरा इकडे लक्ष द्या. काल मला आमच्या भागातील एका स्पोर्ट्सच्या वस्तू विकणाऱ्या दुकानातून फोन आला होता," जुनैद म्हणाला.

"स्पोर्ट्स शॉपमधून? कशासाठी?" नीलने उत्सुकतेने विचारले.

"त्यांनी त्यांच्या दुकानाच्या जाहिरातीसाठी आपल्याला एक ऑफर दिली आहे," जुनैद म्हणाला.

"म्हणजे नेमके आपल्याला करायचे तरी काय?" विवेकने विचारले.

"फार काही नाही. आपल्या 'बी. एन्. ग्रुप'चा लोगो असलेल्या जर्सी ते आपल्याला देणार आहेत. त्या जर्सी घालून आपण फुटबॉल खेळतानाचे फोटो काढायचे आणि ते फोटो त्यांच्या दुकानात तसेच होर्डिंग्जवर लावायचे. त्याबदल्यात आपल्याला त्या जर्सी आणि एक फुटबॉल मोफत मिळणार आहे," जुनैदने खुलासा केला.

"मग तू त्यांना काय सांगितलेस?" चैतन्यने विचारले.

"मी त्यांना सांगितले की, आधी आमच्या ग्रुपमधील सगळ्यांशी चर्चा करतो आणि मग निर्णय कळवतो. तर आता सांगा, तुमचे काय मत आहे?" जुनैदने सर्वांकडे पाहत विचारले.

"तत्त्वतः मला हे योग्य वाटत नाही. आपण खरोखरच त्यांच्या दुकानाचे ग्राहक असतो, तर गोष्ट वेगळी होती. पण केवळ त्यांच्या दुकानात गिऱ्हाईक आकर्षित व्हावे म्हणून असा लुटुपुटीचा फुटबॉल खेळणे मला चुकीचे वाटते," विवेक म्हणाला.

"मलाही विवेकचे म्हणणे योग्य वाटते," हर्षवर्धनने त्याला दुजोरा दिला.

"खरे सांगायचे तर माझेही तेच मत होते. पण आधी तुमचे मत जाणून घ्यायचे होते म्हणून मी हा विषय काढला. आता मी त्यांना आपला नकार कळवतो," जुनैद म्हणाला.

"शाब्बास! आता तुम्ही खरेखुरे बहिर्जी नाईकांचे शिलेदार शोभलात! नेकीने राहणारे आणि खोट्या प्रलोभनांना बळी न पडणारे!" आजी कौतुकाने म्हणाल्या.

"अहो आजी, आमचे कसले कौतुक करता? आम्ही तर हर्षवर्धनला फक्त थोडीफार मदत केली. खरे कौतुक तर मल्हार दादाचे करायला हवे. त्यानेच त्या मोडक्या सुटकेसचा शोध लावला आणि हत्यारबंद गुन्हेगाराचा सामना केला," विवेक नम्रपणे म्हणाला.

"अरे हो, अगदी बरोबर बोललास!" आजी म्हणाल्या. "मल्हारचे कौतुक करावे तितके थोडेच आहे. त्या सुटकेसचा शोध त्याने लावला आणि म्हणूनच पुढे या सगळ्या प्रकरणाचा उलगडा झाला. एवढेच नव्हे, तर हातात धारदार चाकू घेऊन मुलांना घाबरवणाऱ्या त्या दुष्टाला त्याने पाठीमागून घट्ट मिठी मारून त्याच्या हातातील चाकू जमिनीवर पाडला. हे काही साधेसुधे धाडस नव्हते!

कदाचित त्या माथेफिरू माणसाने तुम्हा मुलांना इजा केली असती किंवा मल्हारच्या जीवाला धोका निर्माण झाला असता. खरोखरच आपली वेळ चांगली होती आणि देवानेच तुम्हा सर्वांचे रक्षण केले.

"मल्हार बाळा, तुझ्या या सत्कृत्याचे फळ तुला मिळाल्याशिवाय राहणार नाही," आजी अगदी मनापासून म्हणाल्या.

"आजी, तू तर सर्वांचा कौतुकसोहळाच सुरू केला आहेस; फक्त मला आणि वैष्णवीला तेवढी विसरलीस!" मयुरी फुरंगटून म्हणाली.

"अगं, मी तुम्हा दोघींना कशी विसरेन? या मोहसीन आणि चैतन्यने हर्षवर्धनचे सामान त्याच्या घरी आणून दिल्यावर तू लगेच त्यांच्याबरोबर हर्षवर्धनकडे गेलीस. पुढे मदत करण्यासाठी तू वैष्णवीला जाऊन भेटलीस. वैष्णवीने सगळी हकीकत समजून घेतल्यावर मल्हारची मदत घ्यावी, असा जो अचूक सल्ला दिला, तीदेखील खूप मोठी आणि मोलाची मदत होती," आजी मायेने म्हणाल्या.

"आजी, मी थोडे बोलू का?" चैतन्यने पुढे येत विचारले.

"बोल बाळा, तुला काय म्हणायचे आहे?" आजींनी विचारले.

"मला वाटते की, ही मोहीम कोणा एकट्यामुळे यशस्वी झाली नसून ती यशस्वी होण्यासाठी आपल्या सर्वांचाच हातभार लागला आहे. अगदी हॉटेलमधील कॅशिअर साहेबांचाही सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे. त्यांनी हर्षवर्धनच्या बोलण्यावर विश्वास ठेवून नोटांवरील सेफ्टी पिनच्या खुणा तपासल्या आणि त्या भामट्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवला नाही. ही गोष्टही खूप महत्त्वाची होती. एखादा लहान मुलगा काहीतरी सांगतो आहे, असे समजून त्यांनी त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले असते, तर तो भामटा 'हॉटेल सुखसागर'मधून कधीच पळून गेला असता," चैतन्य प्रत्येक गोष्ट विचारपूर्वक मांडत होता.

"होय रे बाबा! तू अगदी शंभर टक्के खरे बोललास!" आजींनी दुजोरा दिला.

मुलांच्या गप्पागोष्टींत वेळ कसा गेला, हे कोणाच्या लक्षातच आले नाही. साधारण आठच्या सुमारास मकरंद साठे आणि सदा काका आले. तोपर्यंत मयुरी आणि वैष्णवीने मुलांच्या जेवणाची व्यवस्था केली होती.

हॉलमध्ये पंगती बसवून वाढण्याचे काम त्यांनी स्वतः हौसेने स्वीकारले होते. मिलिंद काका, मल्हार दादा, मकरंद साठेसाहेब आणि सदा काका यांची डायनिंग टेबलवर पाने मांडली होती.

मुलांचे जेवण खेळीमेळीत पार पडले, तर मोठ्यांचे जेवण अगदी शिस्तीत चालले होते.

जेवणे आटोपल्यावर मोठ्या माणसांच्या गप्पा सुरू झाल्या. अगदी नुकत्याच पार पडलेल्या मोहिमेपासून ते थेट इस्रायल-इराण युद्धापर्यंतच्या सर्व विषयांची उजळणी झाली. मकरंद साठे एक उत्कृष्ट पत्रकार तर होतेच, पण त्याहीपेक्षा ते एक उत्तम माणूस होते. अडचणीत असलेल्या एका अनोळखी मुलाचे तिकीट काढून त्यांनी केवळ त्या मुलालाच नव्हे, तर त्याच्या संपूर्ण कुटुंबाला आणि पर्यायाने समाजालाच मोठी मदत केली होती. त्यांची ती खारीची मदत पुढे एका आंतरराज्यीय गुन्हेगाराचा शोध घेण्यासाठी मोलाची ठरली.

आता राहिले सदा काका! प्रवाशांना इच्छित स्थळी सुरक्षित पोहोचवणे ही त्यांची जबाबदारीच होती; पण त्यासोबतच त्यांनी त्या लहान मुलांवर विश्वास ठेवला आणि स्वतःहून 'हॉटेल सुखसागर'मध्ये जाऊन त्या भामट्याचा रात्री तिथेच मुक्काम करण्याचा बेत असल्याची महत्त्वाची माहिती मुलांना दिली. त्यांची ही सहृदयता मुलांच्या मोहिमेसाठी विशेष उपयोगी पडली.

मोठ्या माणसांच्या गप्पा सुरू असताना आजी, निर्मलाताई आणि मायाताईंची जेवणे आटोपली. मयुरी आणि वैष्णवीने

सर्वांना वाढून स्वतःही जेवून घेतले होते. नंतर आग्रहाने वाढण्यासाठी निर्मलाताई पदर खोचून तयार उभ्या होत्या.

"मसालेभात एकदम झकास झाला आहे!" मल्हार दादाने दिलखुलास दाद दिली.

"अरे दादा, माझ्या आईच्या हातच्या मसालेभाताचे सगळेच कौतुक करतात. पण माझ्या आईच्या हातचा तांबडा-पांढरा रस्सा तर एकदमच खास असतो! आता तू कोल्हापूरला पोलीस भरतीसाठी येशील, तेव्हा तुझ्यासाठी खास बेत करायला सांगतो," हर्षवर्धन खट्याळपणे म्हणाला.

"हर्षवर्धन, हे काही बरोबर नाही. तू फक्त मल्हार दादाचाच पाहुणचार करणार आहेस काय?" जुनैदने विचारले.

"मी तसे कुठे म्हणालो? मल्हार दादा कामानिमित्ताने येणार आहे, पण तुम्ही सगळे सुट्टीत आमच्याकडे या. आमच्याकडे पाहण्यासारखी खूप पर्यटनस्थळे आहेत; आणि मुख्य म्हणजे, बहिर्जी नाईकांच्या शिलेदारांना पन्हाळगड तर पाहायलाच हवा! तेव्हा तुम्ही फक्त केव्हा येणार ते सांगा. पुढचे सगळे—अगदी तांबड्या-पांढऱ्या रस्स्यासकट—आमच्यावर सोपवा," हर्षवर्धन उत्साहाने म्हणाला.

"ते ठीक आहे रे, पण आम्हाला एकट्याने इतक्या लांबच्या प्रवासासाठी घरून परवानगी मिळणे कठीण आहे," नील मुजुमदार म्हणाला.

"अरे व्वा! माझी आई जर तुमच्या या महानगरीत मला एकट्याला पाठवू शकते, तर तुम्हा सर्वांना एकत्र कोल्हापूरला जाण्यासाठी घरून परवानगी का बरे मिळणार नाही? तुम्ही नुसते घरी विचारण्याचे धाडस करा, पुढचे सर्व आपोआप होईल," हर्षवर्धन बढाई मारत म्हणाला.

अशा प्रकारे मुलांच्या आणि मोठ्यांच्या गप्पा छान रंगल्या होत्या. वेळ कसा निघून गेला, हे कोणाच्याच लक्षात आले नाही. शेवटी मुलांना घरी जायला उशीर होत आहे, याची मोठ्यांना आठवण करून द्यावी लागली.

तेवढ्यात मयुरी उठून उभी राहिली आणि तिने जाहीर केले, "लक्ष द्या, लक्ष द्या! आपल्या आजच्या स्नेहभोजनाची सांगता एका खास पदार्थाने होणार आहे. आजच्या आईस्क्रीम पार्टीच्या प्रायोजक आहेत—सौ. कमल देसाई अर्थात आमच्या लाडक्या आजी!"

मयुरीचे बोलणे ऐकताच सगळ्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला. आजी फक्त हसत बसल्या होत्या. काल संध्याकाळी त्यांनी आणि मयुरीने मिळून हे सरप्राइज देण्याचे ठरवले होते.

थोड्याच वेळात आजी स्वतः सर्वांसाठी आईस्क्रीम घेऊन आल्या. मुलांनी आनंदाने आईस्क्रीमचा आस्वाद घेतला. काहींनी तर दुसऱ्या कपाची मागणीही केली आणि त्यामुळे पुन्हा एकदा हशा पिकला.

आईस्क्रीम संपल्यावर मात्र सर्वांची निघण्याची तयारी सुरू झाली. वैष्णवी आणि मल्हार एकत्र घरी जाणार होते. नील, विवेक आणि चैतन्य यांना सदा काका आपल्या टॅक्सीतून सोडणार होते. मकरंद साठेसाहेबांनी आपली गाडी आणली होती. त्यांनी वाटेत जुनैद आणि मोहसीन यांना सोडायचे ठरवले होते.

एकामागून एक सगळेजण निरोप घेऊ लागले. घरभर आनंद आणि समाधान भरून राहिले होते. तरीही मागची झाकपाक करायला मायाताईंना जवळजवळ तासभर वेळ लागला. तशा निर्मलाताई त्यांच्या मदतीला होत्याच; तोवर मयुरीने आणि मिलिंद काकांनी अंथरुणे घातली.

सर्व आटोपल्यावर सगळेजण हॉलमध्ये बसून गप्पा मारत होते. मयुरी आणि हर्षवर्धन मात्र मयुरीच्या खोलीत काहीतरी वेगळ्याच कामात गुंतलेले दिसत होते. दहा मिनिटांनी ते दोघे हसऱ्या चेहऱ्याने बाहेर आले. त्या दोघांच्या हातात एक-एक बॉक्स होता.

त्यांनी निर्मलाताईंच्या हातात ते दोन्ही बॉक्स ठेवले आणि एकदम म्हणाले, "आम्ही तुझ्यासाठी खास भेट आणली आहे!"

मग त्यांनी निर्मलाताईंना बॉक्स उघडण्यास सांगितले. आत इलेक्ट्रिक केटल आणि हेअर ड्रायर पाहून निर्मलाताईंना आश्चर्याचा सुखद धक्काच बसला.

(हर्षवर्धन आणि मयुरी निर्मलाताईंना सरप्राइज गिफ्ट देताना)

"तरीच तुम्ही सकाळी बराच वेळ गायब होता! पण तुम्ही इतके पैसे कोठून आणलेत?" मायाताईंनी विचारले.

"अगं आई, हर्षवर्धनकडे बत्तीसशे रुपये होते; त्याला कमी पडणारे फक्त हजार रुपये मी माझ्या साठवलेल्या पैशांतून दिले," मयुरी म्हणाली.

"हर्षवर्धन, तू उगाच एवढे पैसे खर्च केलेस," निर्मलाताई म्हणाल्या.

"आई, मी त्यासाठीच तुला न सांगता पैसे घेऊन आलो होतो. मी इकडे येताना तू म्हणालीस ना की, माझ्या साठवलेल्या पैशांतून काय खरेदी करायचे हे ठरवण्याइतका आता मी मोठा झालो आहे.

मला वाटले की, तुझ्या पार्लरमध्ये गरम पाणी करण्यासाठी इलेक्ट्रिक केटल उपयोगी पडेल; आणि तुझा हेअर ड्रायर जुना झाल्यामुळे नीट काम करत नाही, असे तू पाटील काकूंना सांगताना मी ऐकले होते.

"नेमकी त्याच पैशांची चोरी झाली होती आणि शेवटी ते पैसे सुखरूप परत मिळाले. म्हणूनच त्या पैशांचा योग्य विनियोग करायचे मी ठरवले. दोन्ही वस्तूंसाठी माझ्याकडील पैसे कमी पडत होते, तेव्हा मयुरीताईने आग्रहाने तिच्याकडील पैसे मला घ्यायला लावले. ती म्हणाली, 'निर्मला मावशी तुझी आई असण्यापूर्वी माझी मावशी आहे, हे विसरू नकोस!' मग माझा नाईलाज झाला," हर्षवर्धनने आपली बाजू मांडली.

"सर्व वडिलधाऱ्या मंडळींनी जरा इकडे लक्ष द्या! हर्षवर्धनने अत्यंत प्रेमाने आपल्या आईला उपयोगी पडतील अशा वस्तू आणल्या आहेत. त्याचे सर्वस्व असणाऱ्या त्याच्या आईला, त्याला काहीतरी चांगली भेटवस्तू देता आली, याचा आनंद त्याच्या चेहऱ्यावर तुम्हाला दिसत नाही का? उगाच त्याने जणू काही

एखादी मोठी चूक केल्यासारखी त्याची उलटतपासणी करू नका," मयुरी म्हणाली.

"मयुरी, तू अगदी बरोबर बोलत आहेस. खरे तर निर्मलानेच, 'तू आता मोठा झाला आहेस. त्यामुळे तुझ्या पैशांचा विनियोग कसा करायचा, याचा निर्णय तू स्वतः घेऊ शकतोस,' असे सांगून हर्षवर्धनच्या निर्णयक्षमतेवर विश्वास दाखवला आहे. तरीही आता निर्मला काय किंवा तुझी आई काय, त्या फक्त हर्षवर्धनच्या काळजीपोटी बोलत आहेत; त्याच्या निर्णयावर अविश्वास म्हणून नव्हे.

शिवाय, नुकतेच याच पैशांमुळे त्याच्यावर एक मोठे संकट ओढवले होते. अर्थात, त्याच्या प्रसंगावधानाने, धाडसाने आणि समयसूचकतेने त्यातून त्याची सुखरूप सुटका झाली; पण आई जरी सिंहाच्या काळजाची असली, तरी मुलांच्या बाबतीत भावनिक विचार करताना कधीकधी ती सश्याच्या काळजाची होऊ शकते! आणि त्याला निर्मला किंवा तुझी आई अपवाद नाहीत," मिलिंद काका वातावरण हलके करण्यासाठी हसत हसत म्हणाले.

"म्हणूनच मला राहून राहून वाटत आहे की, मी त्याला एकट्याला मुंबईला पाठवायलाच नको होते. आता यापुढे मी अशी चूक करणार नाही," निर्मलाताई गंभीरपणे म्हणाल्या.

"निर्मला, खरेतर असा निर्णय घेणे म्हणजे दुसरी एक मोठी चूक केल्यासारखे होईल. संकट ओढवेल म्हणून घाबरून काहीच न करण्याचा निर्णय घेणे चुकीचे आहे. तू त्याला एकट्याला मुंबईला पाठवलेस, यात कोणतीही चूक नव्हती, हे आधी स्वतःच्या मनाला ठामपणे समजावून सांग; कारण तुझ्या स्वतःच्या निर्णयावरील अविश्वासाचा भविष्यात हर्षवर्धनच्या निर्णयक्षमतेवर विपरीत परिणाम होऊ शकतो. शिवाय तो तुझा तो निर्णय त्यावेळच्या परिस्थितीवरही अवलंबून होता. तुला शक्य असते तर तू त्याच्याबरोबर नक्कीच आली असतीस. आणि तशी परिस्थिती आल्यावर तू एकटीने सर्व अडचणी बाजूला सारून मुंबईला रात्रीबेरात्री धावत आलीसच, तेव्हा असा विचार करू नकोस.

तरीही असे संकट हर्षवर्धनवर का ओढवले, याचा विचार केल्यावर मला त्याच्या संभाव्य दोन चुका दिसतात. त्यातील पहिली आणि महत्त्वाची चूक म्हणजे अनोळखी माणसाने दिलेला खाऊ खाणे अथवा पेय पिणे..."

आजी पुढे काही बोलणार, तोच हर्षवर्धनने त्यांना अडवत म्हटले, "आजी थांब! दुसरी फक्त एकच नाही, तर माझ्याकडून अजून दोन चुका घडल्या आहेत."

"तुझ्या आणखी दोन चुका? आणि त्या कोणत्या बरे?" मयुरीने विचारले.

"माझी एक मोठी चूक म्हणजे, मला माझे पैसे चोरीला गेल्याचे समजल्यावर मी लगेच तिथे तैनात असलेल्या सुरक्षाव्यवस्थेची मदत घ्यायला हवी होती. रेल्वे पोलीस, मुंबई पोलीस अथवा खाजगी सुरक्षारक्षक जे कोणी प्रथम समोर आले असते, त्यांना ही गोष्ट सांगून संशयित गुन्हेगाराकडे बोट दाखवून द्यायला हवे होते. दुसरी मोठी चूक दिसायला लहान वाटली, तरी खूप मोठी होती; आणि ती म्हणजे मी पत्रकार परिषदेत सांगितलेले 'कैरी प्रकरण'! जरी सर्वांनी ती गोष्ट हसण्यावारी घेतली असली, तरी मला माझी चूक समजली आहे. मला माझ्या वर्गमित्रांचे वर्तन पसंत नव्हते हे खरे, पण मी त्यांना समजावून सांगण्यात कमी पडलो; कारण मी माझे मत अधिक ठामपणे मांडायला हवे होते—त्यांना विरोध करायला हवा होता. मी भीड बाळगून गप्प बसलो, ही माझी चूक होती. कदाचित माझ्या ठाम विरोधाने त्यांचेही मत बदलले असते," हर्षवर्धन म्हणाला.

"हर्षवर्धन, तुझे हे बोलणे शंभर टक्के खरे आहे. आता तुला तुझ्या चुका समजल्या आहेत आणि त्या चुकांतून तू शिकला आहेस. आता पुन्हा त्या चुका न करणे, हाच शहाणपणाचा मार्ग आहे," मिलिंद काका म्हणाले.

"बाबा, मीही हर्षवर्धनच्या चुकांमधून धडा घेण्याचे ठरवले आहे. मीच काय, प्रत्येकाने आपल्या मनाला न पटणाऱ्या गोष्टी

स्पष्टपणे बोलून दाखवल्या पाहिजेत; आणि कधी हातून एखादी चूक घडलीच, तर ती पुन्हा घडणार नाही याची मात्र काळजी घ्यायला हवी," मयुरी म्हणाली.

"काका, तरीही एखादी नवीन चूक घडली, तरी घाबरायचे कारण नाही; कारण चुकांमधूनच शिकायला मिळते, खरे ना?" हर्षवर्धन खट्याळपणे हसत म्हणाला.

"एका दृष्टीने तू म्हणतोस ते बरोबर आहे. चुकांमधून शिकायला मिळते हे खरेच आहे आणि चुका टाळण्यासाठी निर्णयच न घेणे ही त्याहून मोठी चूक आहे. कधीकधी आपल्या अंतर्मनाचा कौल आपल्याला योग्य दिशा दाखवतो. तुझ्या 'कैरी प्रकरणा'सारखी एखादी चूक नक्कीच चालून जाईल; कारण हेच तुमचे खेळण्याबागडण्याचे, मस्ती करण्याचे दिवस आहेत, हे विसरून चालणार नाही—तुलाही आणि आम्हा मोठ्यांनाही!" मिलिंद काका म्हणाले.

"चला, आता झोपायला चला! उद्या बोरिवलीच्या नॅशनल पार्कमध्ये जायचे आहे, हे लक्षात आहे ना?" मायाताईंनी विचारले.

"हो मावशी! तिथे आपल्याला कान्हेरी गुंफाही पाहायच्या आहेत ना?" हर्षवर्धनने आठवण करून दिली.

सगळे झोपायला गेले. निर्मलाताईंना मात्र बराच वेळ झोप लागली नाही. हर्षवर्धनच्या जन्मापासूनचा संपूर्ण काळ एखाद्या चलचित्रासारखा त्यांच्या डोळ्यांसमोरून येत-जात होता. करोनाच्या महाभयंकर साथीत हर्षवर्धनच्या बाबांचा झालेला अकाली मृत्यू... त्या आठवणीने त्यांचा गळा दाटून आला.

साहजिकच त्यांची नजर शेजारी शांत झोपलेल्या हर्षवर्धनाकडे गेली. त्याचा तो निरागस चेहरा पाहून त्यांच्या मनावरचे मळभ क्षणार्धात दूर झाले.

हर्षवर्धन झोपेतच काहीतरी पुटपुटत होता, "जंगल सफारी... कान्हेरी गुंफा..."

"बहुधा स्वारी स्वप्नातच आधी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात पोहोचली असावी!" निर्मलाताई स्वतःशीच म्हणाल्या.

त्यांनी त्याच्या अंगावरचे पांघरूण सरळ केले आणि त्याला थोपटता थोपटता रात्री कधी झोप लागली, हे त्यांचे त्यांनाच समजले नाही.

— समाप्त —

गायत्री गिरीश साळवणकर यांची यापूर्वीची चार पुस्तके.

पुस्तकाच्या कव्हरवर क्लिक करताच ते उघडेल व वाचता येईल.





पुस्तक परिचय

मुंबईत प्रथमच आलेल्या तेरा वर्षांच्या हर्षवर्धनचे पैसे चोरीला जातात. नव्या मित्रांच्या साथीने तो आपले पैसे परत मिळवतानाच एका मोठ्या गुन्ह्याचाही उलगडा करतो. मैत्री, धैर्य आणि साहसाची ही रोमांचक कथा जगप्रसिद्ध Emil and the Detectives या कादंबरीवर आधारित आहे.